# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १८ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे/प्रतिनिधी** : राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफी जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. राज्य सरकारची कर्जमाफी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कॅबिनेट उपसमितीची बैठकही पार पडली आहे. काही जिल्ह्यांकडून अतिरिक्त तांत्रिक माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त होताच प्रक्रिया पूर्ण करून कर्जमाफीची घोषणा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

पुण्यात आयोजित 'पुणे ?ग्रो हॅकॅथॉन २०२६'च्या समारोप कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. राज्यात वीजटंचाई नसल्याचा दावा करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रात आवश्यकतेपेक्षा अधिक वीज उपलब्ध आहे. काही भागात तांत्रिक बिघाडांमुळे तात्पुरत्या अडचणी निर्माण होत असल्या तरी राज्यात ऊर्जा संकटाची परिस्थिती नाही.

ड्रग्जविरोधी मोहिमेबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थांचे संकट हे संपूर्ण देशासमोरील मोठे आव्हान आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली देशभर मोहिम राबवली जात असून महाराष्ट्र या कारवाईत अग्रस्थानी आहे. महाराष्ट्राची तुलना 'उडता पंजाब'शी करणे चुकीचे असून राज्याची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न योग्य नसल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान पार्थ पवार यांनी घेतलेल्या भेटीबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट हा महायुतीतील मित्र पक्ष आहे. त्यामुळे पार्थ पवार यांनी भेट घेणे ही मोठी राजकीय घटना नसून विविध प्रशासकीय आणि राजकीय विषयांवर चर्चा झाल्याचे ☞(पान २ वर)

# विदर्भ होरपळला ! अमरावती-वर्ध्यात पारा ४६ अंशांवर

## नागपुरातही उष्णतेचा तडाखा कायम

**नागपूर/प्रतिनिधी** : :विदर्भात उष्णतेचा कहर दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे. शनिवारी अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांनी 'हॉटस्पॉट'ची नोंद केली. या दोन्ही जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान तब्बल ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिक अक्षरशः होरपळून निघाले. सलग वाढणाऱ्या तापमानामुळे विदर्भातील जनजीवन विस्कळीत झाले असून दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडल्याचे चित्र अनेक शहरांत पाहायला मिळाले.

हवामान विभागाच्या नोंदीनुसार, अकोला येथे ४५.४ अंश सेल्सिअस, यवतमाळ आणि ब्रह्मपुरीतही ४५.२ अंश तापमानाची नोंद झाली. नागपुरात कमाल तापमान ४३.८ अंश सेल्सिअसवर पोहोचले, जे सरासरीपेक्षा ०.३ अंशांनी अधिक होते. उष्ण वाऱ्यांचा मारा आणि अंगाची लाही लाही करणारी कडक उन यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला.

विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमान सरासरीपेक्षा अधिक असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. सकाळच्या वेळेत वातावरणात आर्द्रता तुलनेने अधिक होती; मात्र दुपारपर्यंत हवा पूर्णपणे कोरडी झाल्याने उकाडा आणि उमस दोन्ही वाढले. त्यामुळे घराबाहेर पडणाऱ्यांची अक्षरशः



घालमेल उडाली.

दरम्यान, रात्रीच्या तापमानात किंचित घट नोंदविण्यात आली असली तरी उष्णतेची तीव्रता कायम आहे. नागपुराचे किमान तापमान २७.६ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. शनिवारी विदर्भातील कोणत्याही जिल्ह्यात पावसाची अधिकृत नोंद झाली नाही. तथापि, नागपूर शहरातील काही भागांमध्ये शनिवारी दुपारी ४ नंतर पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. यामुळे काही काळ वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी उष्णतेच्या तीव्रतेत फारसा फरक पडला नाही.

उष्णतेची लाट कायम राहणार

हवामान विभागाने पुढील काही दिवस विदर्भात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली असून नागरिकांनी दुपारच्या वेळेत अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि उष्माघातापासून काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रमुख शहरांचे तापमान (अंश सेल्सिअस)**

| | |
|---|---|
| वर्धा | - ४६ |
| अमरावती | - ४६ |
| अकोला | - ४५.४ |
| यवतमाळ | - ४५.२ |
| ब्रह्मपुरी | - ४५.२ |
| नागपूर | - ४३.८ |
| चंद्रपूर | - ४३.६ |
| वाशिम | - ४३.२ |
| गडचिरोली | - ४२.६ |
| गोंदिया | - ४२.२ |
| भंडारा | - ४२ |
| बुलडाणा | - ४१.६ |

## इंधनाच्या तुटवड्यावरून पेट्रोल पंपांवरच पोलीस समोरच जोरदार हाणामारी

**बुलढाणा /प्रतिनिधी** : देशात आणि राज्यात सुरू असलेल्या इंधन तुटवड्याचे आता अत्यंत गंभीर आणि हिंसक पडसाद उमटू लागले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांगरा येथील एका पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यावरून मध्यरात्रीच्या सुमारास जोरदार राडा झाला. धक्कादायक बाब म्हणजे, बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांसमोरच २०-२५ जणांच्या टोळीने एका



व्यक्तीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला- जात आहे. इंधनाचा तुटवडा असल्याने मलकापूर पांगरा येथील पेट्रोल पंपावर वाहनधारकांची मोठी गर्दी झाली होती. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून दोन पोलीस कर्मचारी तिथे उपस्थित होते आणि त्यांच्या देखरेखीखालीच पेट्रोल-डिझेलची विक्री सुरू होती. मात्र, रांगेत उभे ☞(पान २ वर)


## भारत-नेदरलँडमध्ये १७ द्विपक्षीय करार

### संरक्षण, दुर्मीळ खनिजे यांसारख्या क्षेत्रांतील सहकार्याला गती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेदरलँड दौऱ्यादरम्यान भारत आणि नेदरलँड यांच्यातील संबंध धोरणात्मक भागीदारीपर्यंत उंचावले आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी आणि त्यांचे डच समकक्ष रॉब जेटन यांनी संरक्षण आणि दुर्मीळ खनिजे यांसारख्या क्षेत्रांतील सहकार्याला गती देण्यासाठी १७ करारांवर स्वाक्षऱ्या केल्या.

पंतप्रधान मोदी आणि जेटन यांच्यातील चर्चेनंतर भारत आणि नेदरलँड यांनी व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण, सेमीकंडक्टर्स, अंतराळ, एआय आणि क्वांटम कॉम्प्युटिंगसह तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंधांना चालना देण्यासाठी सामरिक भागीदारी आराखडा जाहीर केला.

**या दौऱ्यातील मुख्य करार-** १. धोरणात्मक भागीदारी आराखडा २०२६-२०३०. याद्वारे व्यापार, संरक्षण, सेमीकंडक्टर्स, एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सागरी सुरक्षेवर विशेष लक्ष.



२. चोल कालखंडातील ऐतिहासिक वस्तू भारताला परत केल्या जाणार. यामुळे सांस्कृतिक जतन आणि ऐतिहासिक संशोधनाला बळ मिळण्याची अपेक्षा

३. भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी व्हिसाचे नियम सुलभ होणार. इंटर्नशिप, शिक्षण आणि दीर्घकालीन रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होणार.

४. गुजरातमधील धोलेरा येथील सेमीकंडक्टर फॅब प्रकल्पासाठी टाटा इलेक्ट्रॉनिक्स आणि एएसएमएल सहकाय. 'भारताच्या सेमीकंडक्टर निर्मितीला पाठबळ मिळणार. ५. दुर्मीळ खनिजांच्या क्षेत्रात सहकाय. 'पुरवठा साखळी मजबूत करणे आणि गुंतवणूक आकर्षित करणे हे यामागचे उद्दिष्ट. ६. गुजरातमधील कल्पसर प्रकल्पासाठी डच तंत्रज्ञांचे सहकार्य लाभणार.७. ग्रीन हायड्रोजन आराखडा. युरोपमध्ये भारताच्या ग्रीन हायड्रोजन निर्यातीची व्याप्ती वाढणार. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि उच्च-कौशल्याचे रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा.

८. नवीकरणीय ऊर्जेवरील संयुक्त कार्य गट. स्वच्छ ऊर्जेचा विस्तार ☞(पान २ वर)

## गुंजाळवाडीजवळ एस.टी.बसचा भीषण अपघात

### दोन वेळा बस उलटली: दोन ठार, १७ जखमी

**बेल्हे /वृत्तसंस्था-**: जुन्नर तालुक्यातील गुंजाळवाडी या ठिकाणी एस टी.बस उलटून झालेल्या अपघातात दोन जण ठार झाले तर १७ जण जखमी झाले. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी आगाराची एस.टी.बस (एम.एच.१४ बी.टी ४०२३) शेगाव - कल्याण ही बस रविवारी( दि.१७) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास कल्याणला जात होती.



गुंजाळवाडी (ता.जुन्नर) गावच्या हद्दीत आल्यानंतर समोरून आलेल्या एक अज्ञात वाहनाला वाचविण्याच्या नादात बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या ओढ्यात जाऊन बस दोन ते तीन वेळा उलटली या ☞(पान २ वर)

## अवैध वाळू चोरी करणाऱ्यांवर होणार कडक कारवाई : चंद्रशेखर बावनकुळे



**नागपूर/प्रतिनिधी** : - नागपूर जिल्ह्यात नियमबाह्य वाळू वाहतूक आणि वाळू चोरीच्या घटना लक्षात आल्यानंतर पोलीस आणि महसूल विभागाला तत्काळ कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज रविवारी माध्यमांशी बोलताना दिली.

नागपूरसह भंडारा आणि राज्यातील विविध जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात जिल्हाधिकारी सौ. मित्तल यांनी केलेल्या कारवाईचेही त्यांनी कौतुक केले. राज्यात चुकीच्या पद्धतीने वाळूचे उत्खनन आणि वाहतूक चालू देणार नाही. यासंदर्भात महाराष्ट्रभर कडक कारवाईचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या विकासासाठी आणि पायाभूत सुविधांसाठी वाळू आवश्यक आहे. मात्र, वाळू वाहतूक ही नियमांच्या चौकटीत आणि रॉयल्टीनुसारच झाली पाहिजे. पाच-सहा ब्रासची रॉयल्टी भरून वीस ब्रास वाळूची वाहतूक केली जात असल्याचे प्रकार ☞(पान २ वर)






## नीट पेपरफुटी प्रकरणी बॉटनीच्या प्राध्यापिका मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी

नवी दिल्ली : NEET-UG २०२६ पेपर फूटीप्रकरणी पुण्यातील बॉटनीच्या (वनस्पतीशास्त्र) प्राध्यापिका मनीषा गुरुनाथ मांढरे हिला केंद्रीय अन्वेषण विभागाने शनिवारी (दि. १६) अटक केली होती. तिला आज (दि. १७) दिल्लीच्या विशेष सीबीआय कोर्टात हजर करण्यात आले. न्यायालयाने तिला १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे.



मांढरेचे मुख्य सूत्रधारांशी थेट कनेक्शन

मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयने या पेपर फुटीच्या कटाचा सखोल तपास करत आहे. मनीषा मांढरे या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांशी तिचे थेट कनेक्शन असल्याचे तपासात समोर आले आहे. मनीषा मांढरे NEET-UG २०२६ च्या परीक्षा प्रक्रियेत सहभागी होती. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने तिची 'तज्ज्ञ' म्हणून नियुक्ती केली होती. यामुळे तिला बॉटनी (वनस्पतीशास्त्र) आणि झूलॉजी (प्राणिशास्त्र) च्या प्रश्नपत्रिका पाहण्याची परवानगी मिळाली होती.

बॉटनी आणि झूलॉजीचे अनेक प्रश्न आधीच उघड केल्याचा आरोप सीबीआयने स्पष्ट केले आहे की, एप्रिल २०२६ दरम्यान त्यांनी मनीषा मांढरे यांच्या माध्यमातून NEET परीक्षेला बसणाऱ्या संभाव्य विद्यार्थ्यांशी संपर्क साधला होता. त्यांनी त्यांच्या पुण्याच्या निवासस्थानी विद्यार्थ्यांसाठी विशेष कोचिंग क्लासेस घेतले होते. या क्लासेसदरम्यान त्यांनी बॉटनी (वनस्पतीशास्त्र) आणि झूलॉजी (प्राणीशास्त्र)चे अनेक प्रश्न आधीच उघड केले. हे प्रश्न विद्यार्थ्यांना त्यांच्या वह्यांमध्ये व पाठ्यपुस्तकात नोंदवून घेण्यास ☞(पान २ वर)

## 'दर्जे'दार! पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला 'अ' वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा

**पुणे/प्रतिनिधी** : जगभरातील कोट्यावधी गणेश भक्तांचे आराध्य दैवत आणि महाराष्ट्राचे वैभव असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराला महाराष्ट्र शासनाने अधिकृतपणे 'अ' वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा बहाल केला आहे. याची अधिकृत घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या निर्णयामुळे पुण्याच्या सांस्कृतिक आणि धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.



याबाबत ट्रस्टचे सरचिटणीस व आमदार हेमंत रासने यांनी अथक प्रयत्न करून पाठपुरावा केला होता.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दररोज ५० ते ५५ हजार भाविक, दर संकष्टी चतुर्थीला २ ते ३ लाख भाविक आणि गणेशोत्सवात दीड कोटी भाविक दर्शनासाठी येतात. तर, दर महिन्याला जगभरातून तब्बल दोन हजार पर्यटक ☞(पान २ वर)

## नागपुरात केस उगवण्याचा दावा करणाऱ्या हेअर ट्रीटमेंट सेंटरचा भांडाफोड, साहित्य जप्त

नागपूर : '१००३ केस उगवण्याचे आयुर्वेदिक उपचार' या नावाखाली सुरू असलेल्या एका संशयास्पद आणि बेकायदेशीर शिबिराचा आज भारतीय जनता पार्टी वैद्यकीय आघाडीने भांडाफोड केला. यामुळे अनेक नागरिकांची संभाव्य आर्थिक फसवणूक आणि आरोग्याचा मोठा धोका टळला आहे.

सोशल मीडियावर संबंधित व्यक्ती देशातील विविध राज्यांमध्ये अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत होती.



नागपुरातील धरमपेठ येथील सुगंध सभागृह परिसरात या शिबिराचे आयोजन करून '१००३ आयुर्वेदिक इलाज' अशा जाहिरातींद्वारे नागरिकांकडून मोठे शुल्क आकारले जात होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत भाजप वैद्यकीय आघाडी नागपूर महानगरचे अध्यक्ष डॉ. विनोदजी दाढे, डॉ. प्रणय चांदेकर, डॉ. अजय सारंगपुरे आणि ☞(पान २ वर)




## आ. बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यश

# अचलपूर येथे स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हालचालींना वेग

### 'अमरावती शहर' आणि 'अमरावती ग्रामीण' असे स्वतंत्र RTO क्रमांक देण्याची मागणी

**अचलपूर:** बच्चू कडू यांच्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्यामुळे अचलपूर परिसरातील नागरिकांशी अत्यंत महत्त्वाचा ठरणारा विषय आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. अचलपूर येथे स्वतंत्र उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याच्या मागणीला अखेर शासन स्तरावर गती मिळाली असून परिवहन विभागाने यासंदर्भातील प्रशासकीय हालचाली सुरू केल्या आहेत.

ग्रामीण भागातील नागरिकांना वाहन परवाना, वाहन नोंदणी, फिटनेस, परमिट तसेच इतर वाहनविषयक कामांसाठी तब्बल १०० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर कापत अमरावतीला जावे लागत होते. यामुळे सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंडासोबतच मोठा मानसिक त्रासही सहन करावा लागत होता. जनतेच्या या अडचणी ओळखून बच्चू कडूंनी हा प्रश्न थेट शासन दरबारी लावून धरला.

परिवहन मंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात बच्चू कडूंनी अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यातील नागरिकांच्या समस्या सविस्तर मांडल्या होत्या. त्यांच्या या पाठपुराव्याची दखल घेत परिवहन विभागाने आता अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सविस्तर अहवाल मागविला आहे. त्यामुळे अचलपूर येथे स्वतंत्र ऊध कार्यालय सुरू होण्याच्या आशा अधिक बळावल्या आहेत.



विशेष म्हणजे, बच्चू कडूंनी यापूर्वीच 'अमरावती शहर' आणि 'अमरावती ग्रामीण' असे स्वतंत्र वाहन क्रमांक देण्याची मागणी शासनाकडे केली होती. नागपूर शहर आणि नागपूर ग्रामीणच्या धर्तीवर अमरावतीलाही स्वतंत्र ओळख मिळावी, अशी त्यांची भूमिका आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रशासनिक विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी वारंवार अधोरेखित केले आहे.

अचलपूर हा भविष्यात स्वतंत्र जिल्हा म्हणून विकसित होऊ शकणारा सक्षम भाग असून येथे आवश्यक प्रशासकीय सुविधा, विस्तृत जागा आणि वाहन प्रशिक्षणासाठी ट्रॅक उभारणीची क्षमता उपलब्ध असल्याचेही बच्चू कडूंनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

अचलपूर येथे स्वतंत्र उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू झाल्यास अचलपूर, चांदूर बाजार आणि परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सरकारी सेवा अधिक वेगवान, सुलभ आणि लोकाभिमुख होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### ३० जूनपूर्वी कर्जमाफी

त्यांनी स्पष्ट केले. कांदा उत्पादकांना दिलासा कांद्याच्या घसरत्या दरांवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे बांगलादेश आणि आखाती देशांमध्ये कांद्याची निर्यात कमी झाली आहे. उत्पादन वाढले असताना मागणी घटल्याने बाजारभाव कमी झाले आहेत. यावर उपाय म्हणून केंद्र सरकारने साडेबारा रुपये प्रतिकिलो दराने कांदा खरेदी सुरू केली असून त्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मराठा समाजासाठी सरकार कटिबद्ध

मराठा आरक्षण आणि विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा उपोषणाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री म्हणाले की, मराठा समाजासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात योजना राबवल्या आहेत. शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृह, निर्वाह भत्ता आणि उद्योजकता विकासासाठी अनेक उपक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो तरुण उद्योजक घडले असल्याचे नमूद करत त्यांनी स्पष्ट केले की, कोणतीही योजना बंद करण्यात आलेली नाही. जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रियाही सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार सुरू असून सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

### इंधनाच्या तुटवड्यावरून पेट्रोल

राहण्यावरून किंवा डिझेलच्या प्रमाणावरून काही जणांमध्ये अचानक वाद उफाळून आला. या वादाचे रुपांतर काही वेळातच तुंबळ हाणामारीत झाले. पोलिसांच्या उपस्थितीतच एका व्यक्तीला जमिनीवर पाडून बेदम मारहाण होत असताना इतर नागरिक कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते. त्यावर, '२०० लोकांचा आक्रमक जमाव आणि आम्ही केवळ दोन पोलीस, आम्ही तरी काय करणार?' अशी हतबलता संबंधित पोलीस कर्मचारी व्हिडिओमध्ये व्यक्त करताना दिसत आहे. या हतबलतेमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही आता बोट ठेवले जात आहे.

हिंसेकडे वळणारे इंधन संकट

मलकापूर पांगरा येथील या मारहाणीची पोलीस दखल घेतील आणि दोषींवर कारवाई करतीलच; पण एकंदरीतच पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्यामुळे सर्वसामान्यांचा संयम सुटत चालला असून परिस्थिती हिंसेकडे वळत असल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत आहे.

वाशिम-अकोल्यात डिझेलसाठी पेट्रोल पंपावर राडा

वाशिम: मान्सून तोंडावर आला असतानाच राज्यातील ग्रामीण भागात इंधन टंचाईचे अत्यंत गंभीर संकट उभे ठाकले आहे. वाशिम आणि अकोला परिसरातील पेट्रोल पंपांवर डिझेल मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना तासनतास, नव्हे तर कित्येक दिवस ताटकळत उभे राहावे लागत आहे. या अनिश्चिततेमुळे निर्माण झालेल्या तणावातून वाशिम येथील एका पेट्रोल पंपावर वाहनधारक आणि शेतकऱ्यांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे.

### भारत-नेदरलँडमध्ये १७

आणि तंत्रज्ञान देवाणघेवाण यावर लक्ष.

९. नीती आयोगासोबत ऊर्जा सहकाय. 'अधिक स्वच्छ आणि वैविध्यपूर्ण ऊर्जा प्रणालींवर संयुक्त प्रकल्प. १०. पश्चिम त्रिपुरामध्ये फुलांसाठी केंद्र. फूलशेती आणि निर्यातीच्या संधींना प्रोत्साहन मिळणार. ११. बंगळूर येथे इंडो-डच डेअरी प्रशिक्षण केंद्र. आधुनिक दुग्ध व्यवसाय पद्धती आणि कौशल्य विकासावर भर. १२. पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्रात सहकाय. 'जनावरांचे आरोग्य आणि दुधाची गुणवत्ता सुधारण्याची अपेक्षा. १३. सार्वजनिक आरोग्य संशोधन आणि वैज्ञानिक देवाणघेवाणीवर भर. १४. सीमा शुल्क परस्पर प्रशासकीय सहाय्य करारातून द्विपक्षीय व्यापार अधिक सुलभ आणि सुरक्षित होण्याची अपेक्षा. शिक्षणविषयक करार... १५. उच्चशिक्षण क्षेत्रात सहकाय. 'शैक्षणिक देवाणघेवाण वाढवणार. संशोधन आणि कौशल्य विकास सुधारण्याची अपेक्षा. १६. नालंदा विद्यापीठ आणि ग्रोनिंगन विद्यापीठ यांच्यात सहकाय. 'विद्यार्थ्यांची देवाणघेवाण आणि संयुक्त संशोधनावर भर. १७. लायडेन युनिव्हर्सिटी लायब्ररीज आणि भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांच्यात सहकाय. 'चोल इतिहासाचे संशोधन आणि सांस्कृतिक जतनावर लक्ष केंद्रित.

### गुंजाळवाडीजवळ एस.टी.

अपघातात दोन जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

अपघातातील जखमी याप्रमाणे कोंडीभाऊ कारभारी वाकचौरे (वय ७० ) कमल कोंडीभाऊ वाकचौरे (व ६७ दोघे रा बेल्हे) शंकर शिवाजी शेजाळ (वय ५०) वैशाली शंकर शेजाळ (वय २३ दोघे रा देवडे पंढरपूर) मगन सुखदेव पाटोळे (वय ४८) शोभा मगन पाटोळे (वय ३० दोघे रा बुलढाणा) शारदा बन्सी मेंगळे (वय५९ रा आणे) अश्विनी गणेश बहिरट (वय ४८ रा आणे) अलका नामदेव गायकवाड (वय ५८ रा संगमनेर) अरुण शंकर गुंजाळ (वय ५१ रा बेल्हे) दिपाली बबन डोंगरे (वय ३३ रा डोंगरवाडी) उल्हास तांबे (वय ७० रा ओतूर) यमुना यादव पावसे (वय ६० रा हिवरगाव पावसा संगमनेर) दिव्या संजय पवार (वय २१ रा मानवडी सिन्नर) सिद्धेश नितीन काळे (वय १०) आशा नितीन काळे वय ३५) नितीन सिद्धार्थ काळे (वय ३८ सर्व रा पाथर्डी) जखमी झाले आहेत. दरम्यान या ठिकाणी झालेला अपघाताची तीव्रता पहाता स्थानिक नागरिकांनी तसेच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सर्व जखमींना आळेफाटा येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.अपघात स्थळी नागरिकांनी मोठे गर्दी केली होती तसेच अहिल्यानगर- कल्याण महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे प्रवाशांना काहीसा त्रास सहन करावा लागला तपास आळेफाटा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अमोल पन्हाळकर करत आहेत.

### अवैध वाळू चोरी

समोर आले आहेत. अशा अवैध प्रकारांना आळा घालण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पार्थ पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली कोणतेही मतभेद असल्याचे त्यांना वाटत नाही. पार्थ पवार यांनी कोणत्या कारणासाठी भेट घेतली, याची माहिती माझ्याकडे नाही.

राज्यात मंत्री फेरबदलाच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ,यांच्या स्तरावर होणारा हा विषय आहे. 'या संदर्भात मला कोणतीही माहिती नाही.

प्रधान यांच्या राजीनाम्याची गरज नाही

नीट परीक्षा प्रकरणावर बोलताना बावनकुळे यांनी पेपरफोडीच्या प्रकाराचा तीव्र निषेध केला. विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या समाजविघातक प्रवृत्तीला सोडता कामा नये. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या प्रकरणात तातडीने कारवाई केली असून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे,' असे ते म्हणाले. काँग्रेसकडून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत असल्याबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, 'अशा प्रकारच्या घटना काँग्रेसच्या काळातही घडल्या आहेत. या विषयावर राजकारण करण्याची गरज नाही. कमी कालावधीत हे प्रकरण उघडकीस आणल्याबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे आभार मानतो. विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे असेही बावनकुळे म्हणाले.

### नीट पेपरफुटी प्रकरणी बॉटनीच्या

सांगितले होते. त्यांनी दिलेले बहुतांश प्रश्न ३ मे रोजी घेतलेल्या (आणि आता रद्द झालेल्या) मुख्य ऱ्ऊ-ळउ २०२६ च्या प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळणारे होते.

पुढील १४ दिवस कसून चौकशी होणार

सीबीआयने आरोपीच्या कोठडीची मागणी करताना न्यायालयास सांगितले की, नीट पेपर फुटीच्या मागे खूप मोठे रॅकेट असून, अनेक बड्या नावांचा यात समावेश असण्याची शक्यता आहे. न्यायालयाने सीबीआयचा हा युक्तिवाद मान्य करत मनीषाला १४ दिवसांची सीबीआय कोठडी मंजूर केली आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी गेल्या २४ तासांत सीबीआयने देशभरात सहा ठिकाणी छापे टाकले असून अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे, लॅपटॉप, बँक स्टेटमेंट आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. जप्त केलेल्या साहित्याचे सविस्तर विश्लेषण सुरू असल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर येथून नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाच आरोपींना आधीच चौकशीसाठी सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, पुण्यात अटक करण्यात आलेल्या इतर दोन आरोपींना स्थानिक न्यायालयात हजर केले असता, त्यांना ट्रान्झिट रिमांडवर दिल्लीला हलवण्यात आले आहे.

### 'दर्जे'दार! पुण्याच्या श्रीमंत

विविध देशातून मंदिराला भेट देतात. मंदिराला 'अ' वर्ग दर्जा मिळाल्यामुळे आसपासच्या परिसराचा विकास आणि भाविकांच्या सोयी- सुविधांसाठी सरकारकडून विशेष निधी उपलब्ध होईल. याशिवाय व्हीलचेअर रॅम्प, उत्तम सुरक्षा यंत्रणा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अधिक बळकट केली जाणार आहे.

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा

या ऐतिहासिक निर्णयामुळे आता जागतिक स्तरावर पुण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परदेशी पर्यटकांची संख्या वाढण्यास आणखी मदत होणार आहे. तसेच २० ते २५ हजार रोजगार निर्मिती या माध्यमातून पुढील पाच वर्षात होणार आहे , अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

### नागपुरात केस उगवण्याचा

राकेश कोंटमवार यांनी पुढाकार घेऊन ही माहिती प्रशासन व शासनापर्यंत पोहोचवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी सुनील मित्रा, मनपा आरोग्य समितीचे उपसभापती श्रीकांत आगलावे व सभापती मनीषा अतकरे यांनी तात्काळ दखल घेत मनपा आरोग्य अधिकाऱ्यांना त्वरित चौकशी व कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार मनपाचे आरोग्य अधिकारी आणि सीताबर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले.

### दर्यापूरात भर दिवसा युवकाची निर्घृण हत्या

पोलिस प्रशासनाने गुन्हेगारी प्रवृत्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या घटनेमुळे मृतकाच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण शहर शोकमग्न झाले आहे. दर्यापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी पोलिस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा आता सर्वसामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत. या प्रकरणी अमरावती येथील फॉरेन्सिक टीम दर्यापुरात दाखल झाली असून दर्यापूर पोलीस या गुन्ह्याचा सखोल तपास करीत आहेत.

### कत्तलीसाठी आणलेल्या ११ गोवंशांना

कत्तलीसाठी गोवंश आणून ठेवण्यात आले आहेत. माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाड टाकली. पाहणीदरम्यान गोठ्यात लहान-मोठे ११ गोवंश अत्यंत आखूड दोरीने बांधून ठेवलेले आढळून आले. पोलिसांनी पंचासमक्ष सर्व गोवंश ताब्यात घेत त्यांची सुरक्षित देखभाल आणि संगोपनासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने दस्तुरनगर येथील गौरक्षण संस्थेत दाखल केले. या प्रकरणी शुएब अहमद अब्दुल आहद (वय ३३, रा. अलमास नगर, जुनी वस्ती, बडनेरा) याला अटक करण्यात आली आहे. तर अब्दुल अयाज अब्दुल रऊफ (रा. चंद्रानगर, बडनेरा) व रेहान खान हमीद खान (रा. अलमास नगर, बडनेरा) हे दोघे फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

आरोपीविरुद्ध प्राणी निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक कायद्यान्वये बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले यांच्यासह गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, नईम बेग, विकास गुडधे, विशाल वाकपांजर आणि योगेश पवार यांनी सहभाग घेतला.

### पत्रकारांच्या व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या

संघ राज्यात जनसामान्यांच्या सेवार्थ व पत्रकारांच्या हितार्थ १९९६ पासून आहे. संघटना लोकशाहीच्या ४ थ्या आधारस्तंभाचे रक्षणार्थ कार्य करीत असतांना प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक्स मिडीया मध्ये व वृत्तपत्र विक्रेत्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे प्रिंट मिडीया व ईले. मिडीया क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांच्या कल्याणाकरीता पत्रकार महामंडळ व वृत्तपत्र विक्रेता महामंडळ स्थापन करण्यात यावे. तसेच जिल्हा व तालुका स्तरावर पत्रकार भवनाचे बांधकाम करण्यात यावे. अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने, राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसूफ खान, राष्ट्रीय नियोजन समितीचे अध्यक्ष सुरेश सावळे, राष्ट्रीय संघटक तथा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, राष्ट्रीय सरचिटणीस राजेंद्र भुरे , राष्ट्रीय चिटणीस अशोक पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रदीप जोशी, रविंद्र मेंढे, प्रदेशाध्यक्ष महिला मंच कंचन मुरके, राष्ट्रीय प्रसिद्धी प्रमुख सागर सवळे, प्रदेश सरचिटणीस महाराष्ट्र राज्य राजेंद्र ठाकरे, जिल्हा अध्यक्ष अमरावती (पश्चिम) सुधाकर टिपरे, जिल्हा अध्यक्ष अमरावती (पूर्व) संतोष वाघमारे आदींसह पत्रकार संघाद्वारे संलग्नित विविध समितीचे पदाधिकारी व सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

### आयआरबीची मनमानी; दगडी

नागरिकांना तब्बल तीन किलोमीटरचा अतिरिक्त फेरा मारून गावात प्रवेश करावा लागत होता. विशेष म्हणजे कोणतीही पर्यायी व्यवस्था किंवा नागरिकांना पूर्वकल्पना न देता हा निर्णय घेतल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. शनिवारी सायंकाळी संतप्त ग्रामस्थांनी एकत्र येत थेट टोल नाक्यावर धडक दिली. 'गावकऱ्यांना वेठीस धरण्याचा अधिकार आयआरबीला कोणी दिला?' असा सवाल उपस्थित करत नागरिकांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. वाढता रोष आणि आंदोलनाचा इशारा पाहून आयआरबी प्रशासनाची चांगलीच भंबेरी उडाली. अखेर नागरिकांच्या दबावापुढे झुकत आयआरबीने रात्री उशिरा दगडी बॅरिकेट्स हटवून रस्ता पूर्ववत खुला केला. या घटनेमुळे परिसरात आयआरबीच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात असून 'गावकऱ्यांच्या सोयीपेक्षा टोल वसुली महत्त्वाची का?' असा सवाल आता उपस्थित होत आहे.

**आयआरबी प्रशासनाची मनमानी-**

दिवसेंदिवस आयआरबी प्रशासनाची मनमानी आणि मुजोरी सुरू असून नवनवे नियम बनवून विनाकारण नागरिकांवर लादल्या जात आहे. गावाच्या विकासापेक्षा स्वतःचे हित साधण्यास ही कंपनी अग्रेसर असून अशीच मनमानी सुरू राहली तर टोल नाक्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला जाईल असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

### नांदगाव पेठ पोलिसांची केबल

कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले होते. परिसरात केबल चोरीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तपास सुरू केला. तांत्रिक पुरावे आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी नांदगावपेठ ते कठोरा गांधी रोडदरम्यान सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अंकितकुमार फुलसिंगकुमार (वय २९, रा. मुरैय्या बु., जि. कन्नोज, उत्तरप्रदेश) असे आहे.

पोलीस चौकशीत आरोपीने नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण आठ चोरीच्या घटना आणि एका गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीतील अंदाजे पाच हजार रुपयांचा तांब्याचा तार जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक गणेश राऊत यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण पथकातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

### चांदूर बाजारात एमडी ड्रग्जविरोधात

मोहीम राबविण्यात आली होती. यावेळी अमरावती ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार हे पथकासह चांदूर बाजार परिसरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली की, 'राजा', 'साद' आणि 'अनवेज' नावाचे तीन तरुण अमरावतीहून एमडी ड्रग्ज घेऊन चांदूर बाजारकडे येणार आहेत.

माहितीची खातरजमा करून पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम खरवाडी फाटा, चांदूर बाजार-वलगाव रोड येथे सापळा रचला. पहाटे सुमारे २ वाजताच्या दरम्यान एका बजाज पल्सर मोटारसायकलवरून येणाऱ्या तिघांना अडवून पंचासमक्ष झडती घेण्यात आली. यामध्ये आरोपींकडून ७.१९० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासणीत सदर पदार्थ मेफेड्रोन असल्याचे स्पष्ट झाले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये अनवेज शहा शरीफ शहा (वय १८), फिदा हुसेन उर्फ राजा झाकीर हुसेन (वय २२) आणि साद अहमद मुस्ताक अहमद (वय १८) यांचा समावेश आहे. तिन्ही आरोपी हे चांदूर बाजार परिसरातील रहिवासी आहेत. कारवाईदरम्यान पोलिसांनी अंदाजे २८,८७० किमतीचा एमडी पदार्थ, ७० हजार किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल तसेच विवो आणि रिअलमी कंपनीचे दोन मोबाईल असा एकूण १ लाख १८ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चांदूर बाजार पोलीस स्टेशनमध्ये एनडीपीएस कायद्यान्वये कलम ८(क), २२(ब), २९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सागर भामरे, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पार पडली.

### अमरावतीत दोन ठिकाणी

आलुडे यांनी आग आटोक्यात आणली. या घटनेत अंदाजे ७० ते ८० हजार रुपयांचे नुकसान झाले असून आजूबाजूची दुकाने व परिसर वाचवण्यात यश आले. दरम्यान, भातकुली तालुक्यातील बोरगाव पोस्ट पल्लम येथे असलेल्या इंटरप्राईजेस कंपनीमध्ये शुक्रवारी दुपारी भीषण आग लागली. घटनेची माहिती अनिरुद्ध धवणे यांनी अग्निशमन विभागाला दिल्यानंतर बडनेरा उपकेंद्रासह मुख्यालय आणि प्रशांत नगर उपकेंद्रातून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पाठविण्यात आल्या. केंद्रप्रमुख वैभव गजभारे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल आठ तासांच्या प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आणण्यात आली. या आगीत रॉ मटेरियल, हॅमर मशीन कन्व्हर, ऑटो स्प्रेडर स्टोन मशीन, ब्रिकेट मशीन आणि पॅलेट मशीन जळून खाक झाले. कंपनीचे संचालक सोहित श्यामसुंदर चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार या दुर्घटनेत अंदाजे ३ ते ४ कोटी रुपयांचे नुकसान झाले. मात्र अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे सुमारे ५० लाखांचे साहित्य व मशिनरी वाचवण्यात यश आले. मशिन्सचे तापमान वाढल्यामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या दोन्ही घटनांवर अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे यांनी लक्ष ठेवून आवश्यक सूचना दिल्या.

### सातेगावात अवैध देशी दारूचा साठा

दारू वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार १६ मे रोजी पोलीस उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर हे पथकासह अंजनगाव उपविभागात नाकाबंदी व कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान, गोपनीय माहितीदारामार्फत ग्राम गावंडगाव-धुडकी मार्गावरून सातेगावकडे एक इसम मोटरसायकलवरून पोत्यात देशी दारू घेऊन येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने सातेगाव येथे सापळा रचला. काही वेळात संशयित मोटरसायकलवरून येताना दिसताच पोलिसांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांना पाहताच आरोपीने मोटरसायकल व दारूचा माल जागीच टाकून काटेरी जंगलाचा फायदा घेत पसार झाला. पोलिसांनी घटनास्थळाची झडती घेतली असता ६७४ देशी दारू पाऊच, किंमत ४० हजार ४०० रुपये आणि होंडा लिवो मोटरसायकल, किंमत ६० हजार रुपये असा एकूण १ लाख ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी फरार आरोपी योगीराज मेश्राम रा. दहिगाव रेचा, ता. अंजनगाव सुर्जी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोउपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर, सुधीर बावणे, मंगेश लकडे तसेच चालक नईम शहा यांच्या पथकाने केली.

### सर्वेक्षण केले तर मुख्यमंत्री म्हणून

नस बच्चू कडू यांना ओळखता आली नाही. त्यांना महाराष्ट्राची नस कधीपासून समजायला लागली? महाराष्ट्राच्या जनतेचे म्हणणे कधीपासून समजायला लागले? बच्चू कडू तुमची नोकरी गेली होती. तुमचा कामधंदा गेला होता. आता ज्या मालकाने तुम्हाला नोकरी दिली, त्या मालकाचे गुणगान तुम्ही करणारच आहात. आमच्या देवाभाऊंची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लोकप्रियता किती आहे, हे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील शेंबडे पोरही सांगेल. पण, ती लोकप्रियता तुम्हाला दिसणार नाही. शिवसेनेकडून विधान परिषदेची आमदारकी मिळाल्यानंतर बच्चू कडू यांनी स्वागत मिरवणुकीदरम्यान, एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे वक्तव्य केले होते. राजकीय वर्तुळात त्यांच्या या वक्तव्याची चांगलीच चर्चा रंगली. होती. एक शिवसैनिक म्हणून मी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत, हेच स्वप्न पाहील. दुसरीकडे, देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री रहावेत, असा विचार भाजपचे कार्यकर्ते करतील. मी देवेंद्र फडणवीस यांचा विचार कसा काय करू शकेल?, असे कडू म्हणाले होते.

### मंत्री डॉ. अशोक उईके यांचा

आयुक्त, आदिवासी विकास अमरावती आणि धारणी प्रकल्प अधिकारी कार्यालयाची आढावा बैठक घेतली जाईल. दुपारी १.३० वाजता महाराष्ट्र राज्य आदिवासी सहकारी विकास महामंडळ (नाशिक) आणि शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कामांचा आढावा व मेळाव्याला ते उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता खंडवा (मध्य प्रदेश) कडे रवाना होतील.

### युवतीसेना उपजिल्हाप्रमुख तेजस्विनी

ताकद अधिक मजबूत होणार आहे. शिवसेना नेते स्वर्गीय दिनेशनाना वानखडे यांचा राजकीय वारसा तेजस्विनी वानखडे समर्थपणे पुढे नेत आहे. स्वर्गीय दिनेश नाना यांच्यासह राजकीय क्षेत्रात मार्गक्रमण करीत असताना आज त्यांच्या कन्या भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करीत आपल्या पुढील राजकीय वाटचाल करणार असल्याचे नमूद करीत त्यांनी सक्षमपणे भारतीय जनता पक्षात कार्य करून पक्ष संघटनेला अधिक बळ द्यावे. येणाऱ्या काळात त्यांच्या कार्यक्षमते नुसार त्यांना जबाबदारी देऊन त्यांच्या क्षमतेचा पक्ष विस्तारात पुरेपूर विनियोग करण्यात येणार असल्याचे राजेश वानखडे यांनी याप्रसंगी नमूद केले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा विदर्भ समन्वयक आमदार संजय कुटे, दिनेश सूर्यवंशी, रविराज देशमुख, नितीन गुडदे, अजय गुल्हाणे, आरती राजेश वानखडे, छाया दांडाळे, मयुरी राऊत यांच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने कार्यकर्ते, युवा वर्ग, महिला पदाधिकारी तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात आमदार कुटे यांनी सर्व नवप्रवेशितांचे स्वागत करत पक्षाची विचारधारा, विकासाचे धोरण आणि तिवसा मतदारसंघाच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. प्रवेशकर्ते मध्ये तेजस्विनी वानखडे, राजकुमार ठाकरे, विलास खेडकर, नंदकिशोर देशमुख , विवेक वानखडे, प्रफुल रत्नाकरराव वानखडे, अमोल गंधे, अमोल गोहत्रे, भूषण देशमुख, बबुल मुकुंदराव ठाकरे, घनश्याम वानखडे, प्रवीण मामुद्रे, पप्पू मारबदे, निलेश मारोटकर, निशांत नेरकर, सुरज सहारे, अतुल ठाकरे, चेतन हिवे, अक्षय वानखडे, प्रथमेश वानखडे, अभय वानखडे, शैलेश वानखडे, अमित ठाकरे, वैष्णवी राजकुमार ठाकरे, सपना शैलेश वानखडे, प्रवीण वानखडे, सुरेंद्रजी शेंडगे, रोषण गोरडे, पंकज खेडकर, आशिष फरकाडे, अमित धानोरकर, गिरीधर राऊत, मनोज वानखडे यांचा समावेश आहे.

### पारा 46°C वर अमरावती

गेल्या सव्वाशे वर्षांत तापमानात प्रचंड वाढ झाली आहे.

हवामानतज्ज्ञ प्रा. अनिल बंड यांच्या मते, या वाढत्या पाऱ्याला निसर्गासोबतच मानवी चुका जबाबदार आहेत. शहरात विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली गेली आहेत, ज्यामुळे 'ग्रीन कव्हर' (वृक्षआच्छादन) वेगाने कमी झाले आहे. शहराला प्राणवायू पुरवणाऱ्या नजीकच्या जंगलांमध्ये मानवी हस्तक्षेप वाढल्याने पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. अमरावतीला या भीषण उष्णतेपासून वाचवण्यासाठी आता शहरात आणि परिसरात वृक्षारोपण करून हिरवळ वाढवणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

### मालखेड रोडवर चांदूर रेल्वे पोलिसांची

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १७ मे २०२६ रोजी चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील मालखेड परिसरात एक इसम गांजा घेऊन येणार असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तातडीने सापळा रचत अंजनगाव बारी ते मालखेड रोडवर नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान हिरो होंडा डिओ मोटारसायकल (एमएच २७ बी यू ३५९८) वर एक संशयित इसम पांढऱ्या रंगाची प्लास्टिक बोरी घेऊन जाताना आढळून आला. पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली असता त्याने आपले नाव शहदुल्ला खान अब्दुल्ला खान (वय ६३, रा. नई बस्ती, बडनेरा, अमरावती) असे सांगितले.

राजपत्रित अधिकारी, पंच आणि वजन माप अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या तपासणीत बोरीमध्ये गांजा आढळून आला. वजन केल्यानंतर त्याचे एकूण वजन २१.५४० किलो इतके भरले. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ५ लाख ३८ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याशिवाय आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल आणि एक अँड्रॉईड मोबाईल फोनही जप्त करण्यात आला. या सर्व मुद्देमालाची एकत्रित किंमत ६ लाख ८ हजार ५०० रुपये इतकी आहे. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ठाणेदार अजय आकरे यांच्या नेतृत्वात पीएसआय वीणा पंडे, रोहित कुदळे तसेच चांदूर रेल्वे पोलीस पथकाने ही धडक कारवाई यशस्वी केली.

# औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद पार्श्वभूमीवर

## - वाशिम जिल्ह्यात औषध पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज
## - केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

*अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी बुधवार, २० मे रोजी देशव्यापी एक दिवसीय बंद पुकारण्यात आला आहे. या बंदच्या काळात जिल्ह्यातील नागरिकांना औषधांचा तुटवडा भासू नये आणि जीवनावश्यक औषधे अखंडपणे मिळावीत, यासाठी वाशिमचे अन्न व औषध प्रशासन सज्ज झाले आहे. प्रशासनाने परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना पूर्ण केल्या आहेत.*



या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गजानन प्रल्हाद धीरके यांच्या अध्यक्षतेखाली वाशिम कार्यालयात केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत बंदच्या काळात जिल्ह्यातील रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी आणि नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मुंबई येथील सह आयुक्तांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील २४ तास सुरू असणारी औषध दुकाने आणि रुग्णालयांना जोडलेली फार्मसी बंद काळात खुली राहतील. तालुका आणि ग्रामीण पातळीवरही रुग्णांना तातडीने औषधे मिळतील, अशी व्यवस्था केली जात आहे.

सर्व संबंधित दुकानांना औषधांचा पुरेसा साठा ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या मोहिमेत जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि इंडियन मेडिकल असोसिएशनसह सर्व खाजगी व निमसरकारी रुग्णालयांची मदत घेतली जात आहे. बैठकीला उपस्थित असलेले केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेश पाटील, अशोक सोमानी, नंदकिशोर अग्रवाल, प्रदीप नागे, शुभम बकाल, सुनील गणेशकर, कृष्णा चौधरी आणि संतोष कोल्हे यांनी या संकट काळात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने जनतेला आश्वस्त केले आहे की औषधांचा तुटवडा होणार नसल्याने नागरिकांनी घाबरून जाऊन औषधांची साठेबाजी करू नये, तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. बंदच्या दिवशी औषध मिळण्यात काही अडचण आल्यास नागरिकांनी थेट वाशिम येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागठाणा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नागरिकांना प्रशासकीय सेवा थेट त्यांच्या दारापर्यंत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम तालुक्यातील नागठाणा येथे १५ मे २०२६ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' उत्साहात पार पडले.

शिबिराचे उद्घाटन व मार्गदर्शन विधानसभा सदस्य आमदार श्याम खोडे , उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या महसूल शिबिरात प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी पुरवठा निरीक्षण अधिकारी मनोज लटारे, वाशिम तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी तसेच ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते. शिबिराला नागठाणा मंडळातील विविध गावांतील ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.



**एकाच छताखाली १५ सेवांचा लाभ**

महसूल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण सेवा या शिबिरात एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, सातबारा उतारा दुरुस्ती तसेच विविध शासकीय योजनांसाठी अर्ज स्वीकारून लाभ वितरित करण्यात आले. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ आणि पैशाची बचत झाली.

यावेळी आमदार श्याम खोडे, उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर यांच्या हस्ते अनेक लाभार्थ्यांना विविध दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी प्रशासनाने जनतेच्या दारी जाऊन सेवा देणे आवश्यक आहे. हाच या समाधान शिबिराचा मुख्य हेतू आहे, असे प्रतिपादन आमदार श्याम खोडे यांनी यावेळी केले.

उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली देवकर यांनी शिबिराच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत विविध शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशिमचे संचालक सुभाष चौधरी, माजी पंचायत समिती सदस्य महादेव सोळंके, जल व्यवस्थापन तज्ज्ञ सुभाष नानवटे, एकनाथ कड तसेच परिसरातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.नागठाणा परिसरातील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

प्रशासनाच्या दप्तरमुक्त व गतिमान कामकाजाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग, नोंदणी व मुद्रांक विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# ८९२२ शेतकरी ७२४३ हेक्टर क्षेत्रावर करीत आहेत नैसर्गिक व सेंद्रिय शेती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्याची नैसर्गिक शेतीच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत असून शेतकरी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत आहेत. आत्मा व कृषी विभागामार्फत परंपरागत कृषि विकास योजना, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत जिल्ह्यात नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्यात येत आहे. या अभियानास जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून पर्यावरणपूरक व खर्चमुक्त शेतीचा नवा आदर्श निर्माण होत आहे.

सदर योजनांअंतर्गत जिल्ह्यातील तब्बल ८९२२ शेतकरी ७२४३ हेक्टर क्षेत्रावर नैसर्गिक व सेंद्रिय शेती करीत आहेत. रासायनिक खत व कीटकनाशकांच्या वाढत्या खर्चाला पर्याय म्हणून शेतकरी आता नैसर्गिक शेतीचा स्वीकार करीत असून उत्पादन खर्चात मोठी बचत होत आहे.

जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या २१ जैविक निविष्ठा संसाधन केंद्रांच्या माध्यमातून जीवामृत, दशपर्णी अर्क, सेंद्रिय खते तसेच इतर जैविक निविष्ठा निर्मितीबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रात्यक्षिके देण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकरी स्वयंपूर्ण होत असून जमिनीची सुपीकता वाढण्यासही मदत होत आहे. तसेच नैसर्गिक व सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे सेंद्रिय प्रमाणीकरण करण्याची प्रक्रिया सुरू असून उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यामुळे ग्राहकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नधान्य उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आत्मा नियामक मंडळ, वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मा व कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नैसर्गिक शेती अभियानामुळे जिल्ह्यातील शेतकरी नैसर्गिक शेतीची कास धरत असून शाश्वत शेतीकडे आत्मविश्वासाने वाटचाल करीत आहेत.

# जनगणना २०२७ : वाशिम जिल्ह्यात घरगणना मोहिमेला उत्स्फूर्त सुरुवात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशातील महत्त्वपूर्ण अशा 'जनगणना - २०२७' अंतर्गत पहिल्या टप्प्यातील 'घर यादी व घरगणना' प्रक्रियेला आजपासून वाशिम जिल्ह्यात उत्साहात सुरुवात झाली आहे.

यंदाची संपूर्ण जनगणना प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

**१४ जूनपर्यंत चालणार मोहीम :** या मोहिमेसाठी नियुक्त केलेले प्रगणक (Enumerators) दि. १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक घराला प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित करणार आहेत. या प्रक्रियेदरम्यान शासनाने निर्धारित केलेल्या जनगणनेसंदर्भातील ३३ प्रश्नांची माहिती नागरिकांना द्यावी लागेल. ही सर्व माहिती प्रगणकांद्वारे जनगणनेच्या अधिकृत वर डिजिटल स्वरूपात नोंदवली जाणार आहे.



**माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय :** घर यादी व घरगणना प्रक्रियेत प्रामुख्याने इमारत व घर क्रमांक, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग व प्रवर्ग, राहण्याच्या खोल्यांची संख्या, विवाहित जोडप्यांची संख्या, उपलब्ध सुविधा, मालमत्ता आणि घरातील साहित्य याविषयी माहिती विचारली जाणार आहे. नागरिकांनी दिलेली ही सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित ठेवली जाणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**'स्वयं-गणना' (Self Enumeration) केलेल्यांसाठी महत्त्वाची सूचना :**

ज्या नागरिकांनी ऑनलाईन पोर्टलद्वारे स्वतःची गणना (एर्त हिंर्ल्सूंदह) आधीच पूर्ण केली आहे, त्यांनी घरभेटीसाठी आलेल्या प्रगणकांना आपल्याकडील 'एं घ्ङ' देणे आवश्यक आहे. प्रगणक हा आयडी तपासून माहिती सबमिट करतील, ज्यामुळे नागरिकांचा वेळ वाचणार आहे.

# पीएम श्री केंद्रीय विद्यालय वाशिममध्ये ११ वी विज्ञान शाखेची प्रवेश प्रक्रिया आजपासून

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक 'पीएम श्री केंद्रीय विद्यालय, वाशिम' येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता इयत्ता अकरावी विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी ऑफलाईन नोंदणी प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. ही प्रक्रिया १८ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून सुरू होणार असून, २२ मे २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येणार आहेत.

केंद्रीय विद्यालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही प्रवेश प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबवली जाणार आहे. यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना किंवा पालकांना विद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागेल. प्रवेशासाठीचे अर्ज विद्यालयात विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले असून, पूर्ण भरलेले अर्ज विहित मुदतीत प्राचार्य कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. असा असेल प्रवेशाचा प्राधान्यक्रम विद्यालयात प्रवेश देताना केंद्रीय विद्यालय संघटनेच्या नियमांनुसार खालीलप्रमाणे प्राधान्य दिले जाईल. स्वतःच्या (वाशिम) केंद्रीय विद्यालयातील उत्तीर्ण विद्यार्थी. शेजारील/जवळच्या इतर केंद्रीय विद्यालयांतील विद्यार्थी. सीबीएसई बोर्डाचे विद्यार्थी. राज्य मंडळ, आयसीएसई व एनआयओएस बोर्डाचे विद्यार्थी.

**जागा रिक्त राहिल्यासच इतरांना संधी**

केंद्रीय विद्यालय संघटना आणि सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा विचार झाल्यानंतर, जागा रिक्त राहिल्यासच राज्य मंडळ, आयसीएसई व एनआयओएस बोर्डाच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

# गुरुदेवांच्या जन्मदिनी मानवतेचा महायज्ञ

## ३५ रक्तदात्यांनी दिले रक्तदान



■ प्रतिनिधी | कारंजा ■

आध्यात्मिक गुरु श्री श्री रवीशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त कारंजा येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कारंजा आणि रक्तदान चळवळ कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात तब्बल ३५ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. विशेष म्हणजे महिलांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत सामाजिक कार्यात आपला पुढाकार सिद्ध केला. या रक्तदान शिबिरात सारिका मांडवगडे, रत्नमाला देशमुख, उमाली हातोले, कुमारी माही खोना, माधुरी क्षार, विनिता मदनकार आणि वैशाली लावारवार या सात महिला रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच सात नवयुवकांनी प्रथमच रक्तदान करत सामाजिक सेवेची प्रेरणादायी सुरुवात केली.

शिबिराला कारंजाचे माजी तहसीलदार धीरज मांजरे तसेच विद्यमान तहसीलदार रवी महाले यांनी भेट देऊन रक्तदात्यांचे कौतुक केले व त्यांचा उत्साह वाढविला. यावेळी युवा नेते देवव्रत डहाके आणि रक्तदान चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते प्रज्वल गुलालकरी यांचा वाढदिवस असल्याने उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा देत अभिनंदन केले.

# सोमठाणा येथे श्रीमद भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तालुक्यातील सोमठाणा येथे जय हनुमान संस्थानच्या वतीने यंदाही भक्तिमय वातावरणात श्रीमद भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील हनुमंतराय कृपेने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हा धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने संपन्न होत असून परिसरातील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सप्ताहास रविवारी दि. १७ मे २०२६ रोजी शुभारंभ झाला असून रविवार दि. २४ मे २०२६ रोजी महाप्रसादाने समारोप होणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी भजन, दुपारी श्रीमद भागवत कथा तसेच सायंकाळी हरिकीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या धार्मिक सोहळ्यास प्रसिद्ध प्रवचनकार ह.भ.प. जनार्दन महाराज खंदारे हे श्रीमद भागवत कथेमधून भक्तांना ज्ञानरूपी संदेश देत आहेत. तसेच विविध नामवंत कीर्तनकार, भजनकार व वारकरी संप्रदायातील मान्यवरांच्या उपस्थितीत सप्ताहाची भक्तिमय रंगत अधिक खुलत आहे.

सप्ताहामध्ये ह.भ.प. तुकाराम महाराज जायभाये, ह.भ.प. गोपाल महाराज जाधव, ह.भ.प. राम महाराज चांदणे, ह.भ.प. गजानन महाराज लोणकर, ह.भ.प. दादा महाराज शिंदे, ह.भ.प. अजय महाराज महाजन, कृष्णा महाराज ढवळे तसेच ह.भ.प. मनोहर महाराज अवचार आदींच्या कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना मिळणार प्रमाणित बियाणे मिनीकीट

## महाडीबीटी पोर्टलवर अर्ज प्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अन्नधान्य व व्यावसायिक पिके अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रमाणित बियाणे संच वाटप म्हणजेच मिनीकीट वितरण करण्यात येणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांनी महाडीबीटी पोर्टलवर तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन वाशिमचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. या मोहिमेची अंमलबजावणी पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे केली जात आहे. लाभार्थी शेतकरी गट, कंपनी किंवा संस्थांची निवड ही प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. त्यामुळे पात्र इच्छुकांनी लवकरात लवकर आपले अर्ज सादर करणे आवश्यक आहे. योजनेच्या अटी व नियमांनुसार, शेतकरी गटांची नोंदणी ३१ मार्च २०२४ पूर्वीची असणे बंधनकारक आहे. तसेच एका गावातून फक्त एकाच शेतकरी गटाची निवड केली जाईल. निवड झालेल्या गटातील सदस्यांची संख्या जास्त असल्यास, त्यापैकी केवळ २५ शेतकऱ्यांनाच या योजनेचा लाभ दिला जाईल. याशिवाय शेतकरी गटातील एका कुटुंबातील केवळ एकाच शेतकऱ्याला या योजनेचा लाभ घेता येईल. लाभ घेणाऱ्या सर्व शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक वर नोंदणी असणे अत्यंत आवश्यक आहे.

या योजनांसाठी अर्ज करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर सुरू करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी व शेतकरी गटांनी लाभ घेण्यासाठी mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, वाशिम**

एस. आर. एन. क्रमांक: WSM/00755/18/26

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:.

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : रिद्धी सिद्धी महिला भजनी मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट शहापूर खु. पो. ता. मंगरुळपीर जि. वाशिम बाबत।

**न्यासाचा पत्ता :** - C/O सुधाकर विश्वनाथ सुर्वे, शहापूर खु., मंगरुळपीर, वाशिम, मंगरुळपीर, शहापूर खु.

**अर्जदार** - गंगाबाई सुधाकर सुर्वे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, वाशिम, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०५-०५-२०२६ रोजी दिली.

शिक्का

**आर. एन. गिऱ्हे**
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय वाशिम

# किशोरवयीन मुला-मुलींच्या समस्यांवर 'मैत्री केंद्र' ठरतेय आधारवड

## मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांचे तरुणाईला लाभ घेण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक टप्पा असलेल्या किशोरवयीन अवस्थेत मुला-मुलींना अनेक शारीरिक, मानसिक व भावनिक बदलांना सामोरे जावे लागते. या वयात निर्माण होणारे ताणतणाव आणि संभ्रम दूर करण्यासाठी वाशिम जिल्ह्यात चार ठिकाणी 'किशोरवयीन मैत्री केंद्र' सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात तब्बल ९ हजार ७९७ मुला-मुलींनी समुपदेशन आणि आरोग्य सल्ल्याचा यशस्वी लाभ घेतला आहे, अशी माहिती आरोग्य प्रशासनातर्फे देण्यात आली.

१० ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी ही उपयुक्त आरोग्य सेवा अत्यंत फायदेशीर ठरत असून, जिल्ह्यातील सर्व किशोरवयीन मुला-मुलींनी व पालकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केले आहे.

**जिल्ह्यात 'या' चार ठिकाणी सेवा उपलब्ध**

जिल्हा आरोग्य प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील खालील चार मुख्य शासकीय रुग्णालयांमध्ये प्रशिक्षित समुपदेशकांच्या माध्यमातून ही सेवा दिली जात आहे :

१. जिल्हा रुग्णालय, वाशिम
२. उपजिल्हा रुग्णालय, कारंजा लाड
३. ग्रामीण रुग्णालय, रिसोड
४. ग्रामीण रुग्णालय, मंगरुळपीर

**मैत्रीपूर्ण वातावरण आणि '१०० टक्के गोपनीयता'**

किशोरवयात अनेकदा मुले आपले प्रश्न कोणाकडे मांडायचे या विवंचनेत असतात. हीच अडचण ओळखून 'मैत्री केंद्रामध्ये' अत्यंत विश्वासार्ह आणि मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करण्यात आले आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक मुला-मुलीची माहिती पूर्णतः गोपनीय ठेवली जाते. त्यामुळे मुले कोणत्याही भीतीशिवाय किंवा संकोचाशिवाय आपल्या मनातील प्रश्न समुपदेशकांसमोर मांडू शकतात. अनेक गंभीर समस्या सुरुवातीच्या टप्प्यातच सोडविणे या केंद्रामुळे शक्य होत आहे.

**'या' विषयांवर मिळते हक्काचे मार्गदर्शन**

मानसिक व शारीरिक बदल: पौगंडावस्थेत शरीरात आणि मनात होणारे बदल. आरोग्य व आहार: योग्य पोषण आणि लैंगिक आरोग्याविषयी शास्त्रीय माहिती. मानसिक ताण: अभ्यासाचा ताण, नैराश्य आणि मैत्रीतील संबंध हाताळणे. व्यसनमुक्ती व इतर: व्यसनांपासून दूर राहणे आणि विवाहपूर्व योग्य मार्गदर्शन.

**सक्षम पिढीसाठी समाजाचे सहकार्य गरजेचे!**

एक आरोग्यदायी, सुदृढ आणि सक्षम पिढी घडविण्यासाठी 'किशोरवयीन मैत्री केंद्र' ही एक महत्त्वाची पायरी आहे, असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी व्यक्त केले. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी या उपक्रमाची माहिती गरजू मुला-मुलींपर्यंत पोहोचवून किशोरवयीन आरोग्य संवर्धनासाठी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य प्रशासनाने केले आहे.

# मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला मराठा समाजातून विरोध

## मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला मराठा समाजातून विरोध



**मुंबई:** मराठा समाजाचा आवाज म्हणून मनोज जरांगे यांच्या कडे मराठा समाज बघत आहे. जरांगे यांच्या इशाऱ्यावर लाखाचे मोर्चे निघाले. जरांगे यांच्या मुंबई मोर्चाने तर मुंबई ठप्प झाली होती. त्याची दखल मुंबई उच्च न्यायालयाला घ्यावी लागली होती. त्याच जरांगे यांना मराठा समाजाकडून विरोध होऊ लागला आहे. काय आहेत कारणे. समाज माध्यमावर या विरोधाचा चांगलाच जोर आहे.

देशात महागाईचा आगडोंब उसळला आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस महाग झाले. कांदा रस्त्यावर फेकून देण्याची वेळ आली. कापसाला कमी भाव मिळाला. साखरेची निर्यात थांबली. ऊस उत्पादक अडचणीत आला आहे. खत, औषधे, बियाणांची टंचाई भासू लागली आहे. प्रचंड तापमान वाढले आहे. पंतप्रधानांनी काटकसरीचा सल्ला दिला. वाहने कमी वापरा असे म्हटले आहे.अशा प्रतिकूल परस्थितीत केवळ 'एका जातीच्या प्रमाणपत्रासाठी' आंदोलन करणे योग्य ठरत नाही, अशा शब्दात मराठा समाजातील तरुणांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला विरोध केला आहे.

मराठा समाज आंदोलक मनोज जरांगे यांनी ३० मे पासून जालना जिल्ह्यातील (तालुका अंबड) अंतरवाली सराटी या त्यांच्या मूळ गावातून पुन्हा उपोषण आंदोलनाचा इशारा दिला आहे. जरांगे यांच्या या आंदोलनावरुन आतापर्यंत त्यांना साथ देणाऱ्या मराठा समाजात दोन गट पडले आहेत. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्या या मागणीसाठी सुरु झालेले हे आंदोलन गेली चार वर्षे सुरु आहे. आरक्षणासाठी आंदोलन आवश्यक आहे, असे मानणारा एक गट आहे. सरकार बरोबर नेहमीच संघर्ष करण्याऐवजी संवादाची भूमिका घेण्याची आवश्यकता आहे असे मानणारा दुसरा एक गट आहे. देशातील सद्यस्थिती पाहता आंदोलनाची ही वेळ नाही, असे म्हणणारा एक वर्ग आहे. मराठा समाजात आता एकमत राहिलेले नाही. आंदोलनामुळे संभ्रम निर्माण झाला आहे.

# केवळ ११ लाख १४ हजार कुटुबांचीच ऑनलाइन स्वगणना नोंदणी




**मुंबई:** यंदा प्रथमच जनगणना मोहिमेअंतर्गत राबविण्यात आलेल्या ऑनलाइन स्वगणनेला राज्यात अल्प प्रतिसाद मिळाला. एकूण १२ लाख ६० हजार ९५० कुटुंबांनीच ऑनलाईन स्वगणना प्रक्रिया सुरू केली. यांपैकी ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी स्वगणना नोंदणी प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली. पुण्यात सर्वाधिक १ लाख ५३ हजार कुटुंबांनी स्वगणना केली आहे. त्या खालोखाल मुंबई उपनगरात १ लाख २१ हजार, ठाण्यात १ लाख १६ हजार कुटुंबांनी नोंदणी केली आहे.

पुणे, ठाणे, मुंबई उपनगर या शहरी जिल्ह्यामध्ये जरी स्वगणनेचे आकडे जास्त असले तरी येथील लोकसंख्येच्या तुलनेत ऑनलाइन नोंदणीची संख्या फारच कमी आहेत. २०११च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात एकूण २.४४ कोटींहून अधिक कुटुंबे होती. यामध्ये ग्रामीण भागात सुमारे १.३२ कोटी आणि शहरी भागात सुमारे १.१२ कोटी कुटुंबे होती. त्यावेळी महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२४ कोटी होती.

ज्या कुटुंबांनी स्वगणना प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे, त्यांनी घरगणनेच्या भेटीदरम्यान गणना कर्मचाऱ्याकडे आपला एच अक्षराने सुरू होणारा ११ अंकी 'स्वगणना ओळख क्रमांक' (एस ई आयडी ) देणे आवश्यक आहे.

# पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद



**नागपूर** - अमेरिका-इराण युद्धाचा जगातील अनेक देशांना फटका बसत आहे. पश्चिम आशियात निर्माण झालेल्या या तणावाचा भारतावर देखील परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र सरकार अधिक सावध भूमिका घेत असून आता उपाययोजना राबवण्यास सुरूवात केली आहे. त्या अनुषंगानेच पंतप्रधान यांनी जनतेला इंधन बचतीच्या काटकसरीचं आवाहन केलं आहे.पंतप्रधान यांनी केलेल्या आवाहनानंतर देशभरात अनेक नेत्यांकडून अंमलबजावणी करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. दरम्यान, आता पंतप्रधान यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अमृता फडणवीस यांनी देखील त्यांचा फ्रान्समधील कान्स फिल्म फेस्टिव्हलचा नियोजित दौरा रद्द केला आहे.

# अपात्र लाडक्या बहिणींना महिला विकास विभागात कागदपत्र सादर करण्याची संधी

## प्रवाशांची वाढती गर्दी

**मुंबई :** भारतीय न्याय व्यवस्थेत'लाखो आपरधी सुटले तरी चालतील पण एखाद्या निरपराध ला शिक्षा होता कामा नये असे म्हणतात.




त्याच धर्तीवर सरकारने लाखो अपात्र बहिणींनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला असेल तरी चालेल पण एक पात्र लाडकी बहीण या योजनेपासून अलिप्त राहता कामा नये यासाठी सरकारने मुदत संपल्या नंतर ही काय निर्णय घेतला आहे ते पहा.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या ई केवायसी करण्याच्या मुदतीत योग्य ती कागदपत्र सादर करु न शकलेल्या लाडक्या बहीणींना जिल्हयाच्या महिला विकास विभागात ही कागदपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. या योजनेतील मार्च व एप्रिल महिन्याचे अनुदान मागील आठवडयात बुधवार पासून देण्यास सुरुवात झाली आहे.

# वाढत्या तापमानाने मोरांची होरपळ; उष्माघाताचा धोका

## पाण्यासाठी करताहेत भटकंती



**छत्रपती सं. –** वाढत्या तापमानाने मोरांची होरपळ होत आहे. पाणवठेही काही ठराविक अंतरावर असल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. या भटकंतीतच उष्माघाताचा धोका असून, तापमानाचा प्रजननावरही परिणाम होत असल्याचे वन्यजीव अभ्यासक सांगत आहेत. बीड जिल्ह्यातील नायगाव येथील राष्ट्रीय मयूर अभयारण्यातील मोर पाण्याच्या शोधार्थ नजीकच्या शिवारामध्ये भटकताना दिसत आहेत.

पाटोदा तालुक्यातील नायगाव हे देशातील एकमेव मयूर अभयारण्य असून, सुमारे २ हजार २०० हेक्टरपर्यंत विस्तारलेले आहे. या अभयारण्यात वनविभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार ४ हजारांवर मोर आहेत. अभयारण्यात अधिकतर ग्लिरिसिडिया किंवा गिरीपुष्पाची झाडे अधिक असून, उन्हाळ्याच्या सुमारासच या झाडांची पानगळ होते. परिणामी मोरांना पाणवठ्यापर्यंत जाताना सावलीही मिळेनासे चित्र असल्याचे वन्यजीव चळवळीतील कार्यकर्त्यांकडून सांगितले जाते.

सध्या मराठवाड्यात ४२ च्या आसपास तापमान असून, १३ मे रोजी बहुतांश भागात ४३ अंशांवर तापमान पोहोचले होते. मोरांना ४० अंशांवरचेही तापमान तापदायक ठरताना दिसत आहे.

मोरांना उष्माघाताचा धोका

मोरांना ४० अंशांवरचेही तापमान सहन होत नाही. बऱ्याचवेळा उष्माघातामुळे बेशुद्ध पडण्याचीही शक्यता असते. सध्या सर्पराज्ञी केंद्रात उष्माघात झालेल्या मोरांची संख्या वाढली आहे. तापमानाचा मोरांच्या प्रजनन क्षमतेवरही परिणाम होतो.

**पशुचिकित्सालयाची गरज**

नायगाव मयूर अभयारण्यात सहा ते सात हजारांवर मोर आहेत.

# नसरापूरच्या नराधमाभोवती फास आवळला

## तीन मुलांची साक्ष महत्वाची असणार



**पुणे:** नसरापूर येथे चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या नराधम भीमराव कांबळेविरोधात १,१०० पानांचे आरोपपत्र पुणे ग्रामीण पोलिसांनी शनिवारी रात्री विशेष न्यायालयात सादर केले. पुण्यासह संपूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या या गुन्ह्याचा अवघ्या १५ दिवसांत तपास पूर्ण करून पन्नासहून अधिक साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही चित्रीकरण, डीएनए चाचणीसह वैद्यकीय व न्यायवैद्यक अहवाल आदी भक्कम पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले.

पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी या गुन्ह्याचा कसून तपास करून आरोपीविरोधात १५ दिवसांत आरोपपत्र दाखल करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले होते. त्यानुसार त्यांनी स्वतः रात्री उशिरापर्यंत न्यायालयात थांबून आरोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. विशेष सरकारी वकील अजय मिसार, तपास अधिकारी निरीक्षक विजयमाला पवार यांच्यासह तपास पथका तील अधिकारी या वेळी उपस्थित होते.

'या संवेदनशील गुन्ह्याचा अत्यंत काटेकोर तपास करून आरोपीविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, 'नॅशनल मिशन फॉर सेफ्टी ऑफ वुमन'अंतर्गत विशेष न्यायालयात या प्रकरणा ची जलदगतीने सुनावणी चाल विण्यात येईल,' असे अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी सांगितले.भोर तालुक्यातील नसरापूर येथे महाराष्ट्र दिनी (१ मे) साडेतीन वर्षांच्या चिमुकली वर लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेचे तीव्र पडसाद राज्यभरात उमटले होते.

# कोकण रेल्वे मार्गावर दहा अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या



## प्रवाशांची वाढती गर्दी

**मुंबई :** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य आणि कोकण रेल्वे प्रशासनाने पनवेल ते सावंतवाडी रोड आणि मडगावसाठी १० अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सावंतवाडी रोडसाठी ८ आणि मडगावसाठी २ विशेष फेऱ्यांचा समावेश आहे.

गाडी क्रमांक ०१००७ विशेष गाडी ६ जूनपर्यंत प्रत्येक शनिवारी पनवेल येथून सायंकाळी ६.१० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१००८ विशेष गाडी सावंतवाडी रोड येथून प्रत्येक शनिवारी सकाळी ७.२० वाजता सुटून त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे पोहोचेल. या रेल्वेगाड्यांना पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ येथे थांबे देण्यात आले आहेत. या विशेष रेल्वेगाडीला एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी डबा, तीन वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे, दोन वातानुकूलित तृतीय श्रेणी इकॉनॉमी डबे, आठ शयनयान डबे, चार सामान्य द्वितीय श्रेणी डबे तसेच गार्ड ब्रेक व्हॅनसह एकूण विविध श्रेणींचे डबे असतील.

# सुनील तटकरे , प्रफुल पटेलांचे राष्ट्रवादीतील भविष्य काय?



**मुंबई:** अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये सुरू असलेल्या अंतर्गत राजकारणाला काहीसा विराम मिळण्याची चिन्हे आहेत. प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे हे अजूनही पदाधिकारी असून त्यांना पदच्युत केलेले नसल्याचे शनिवारी पक्षातर्फे स्पष्ट करण्यात आले. लवकरच केंद्रीय निवडणूक आयोगाला सुधारित पत्र देणार असून त्यानंतर हे गैरसमज निकालात निघतील, असे पक्षाकडून सांगण्यात आले. पक्षाविषयी उलटसुलट चर्चांना विराम मिळावा, यासाठी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचनेनुसार हे स्पष्टीकरण देत असल्याचे पक्षाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी स्पष्ट केले.

अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली. त्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात, प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पक्षातील पदाचा उल्लेख नव्हता. त्यामुळे चर्चांना सुरुवात झाली होती. त्यानंतर, पुन्हा २९ एप्रिल रोजी नवे पत्र पाठवत पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी आणि पदाधिकाऱ्यांची यादी देण्यात आली. यातही पटेल आणि तटकरे यांच्या पदाचा उल्लेख नव्हता. त्यावरून, या दोघांनाही पदावरून हटवले की काय, अशी चर्चा सुरू झाली होती.

# जालन्यात खतांचा काळाबाजार उघड

## डीएपी-युरियासह १८ लाखांचा साठा जप्त



**जालना :** खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची फसवणूक करून खतांची कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा मोठा डाव कृषी विभागाने उधळून लावला आहे.

जालन्यातील नवीन मोंढा परिसरात कृषी विभागाच्या भरारी पथकाने धाड टाकत डीएपी, कडुनिंब वेष्टित युरिया, पोटॅश, जैवखते यांसह विविध प्रकारच्या खतांचा तब्बल १८ लाख ७ हजार १८४ रुपयांचा बेकायदेशीर साठा जप्त केला.या प्रकरणी दोन मुख्य आरोपींसह इतर अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गोपनीय माहितीवरून धाड**

कृषी विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, १५ मे रोजी सायंकाळी विभागीय आणि जिल्हा भरारी पथकाने नवीन मोंढा भागातील एपीएमसी मार्केटमधील गाळा क्रमांक एस.टी. २६ येथे छापा टाकला.

यावेळी एका ट्रकमधून (एमएच.२३ एआर २४००) खताच्या गोण्या उतरवल्या जात असल्याचे आढळून आले.

पथकाने चौकशी केली असता संबंधित गाळ्याचा कोणत्याही अधिकृत परवान्यात उल्लेख नसल्याचे समोर आले. मे. जयभारत ॲग्रो ट्रेडर्सचे प्रोप्रायटर आकाश प्रमोदसिंग बायस यांना या साठ्याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही.

**१२ प्रकारच्या खतांच्या १७६२ गोण्या जप्त**

त्यानंतर पथकाने गोदामाची सखोल तपासणी केली असता, डीएपी, कडुनिंब वेष्टित युरिया, झिंक विरघळणारे जैवखत, पोटॅशसह तब्बल १२ प्रकारच्या खतांच्या १७६२ गोण्या आढळून आल्या.

या खतसाठ्याची एकूण किंमत १८ लाख ७ हजार १८४ रुपये इतकी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.संशयित खतांमधून १३ नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून, संपूर्ण गोदाम सील करण्यात आले आहे.

**शेतकरी आणि शासनाची फसवणूक**

तपासादरम्यान धक्कादायक बाब समोर आली. या गोदामातील खतसाठ्याचा तपशील यापूर्वी हसनाबाद पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या खत प्रकरणातील (गुन्हा क्र. १४४/२०२६) माहितीशी जुळत असल्याचे आढळले. अनुदानित खतांची चढ्या दराने विक्री, कृत्रिम टंचाई निर्माण करणे आणि बेकायदेशीर 'रि-पॅकिंग'साठी खतांचा वापर करणे, हा या संपूर्ण रॅकेटमागील मुख्य उद्देश असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

# संक्षिप्त

## इंधनाच्या तुटवड्यावरून पेट्रोल पंपांवरच जोरदार हाणामारी



**बुलढाणा:** देशात आणि राज्यात सुरू असलेल्या इंधन तुटवड्याचे आता अत्यंत गंभीर आणि हिंसक पडसाद उमटू लागले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांगरा येथील एका पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यावरून मध्यरात्रीच्या सुमारास जोरदार राडा झाला. धक्कादायक बाब म्हणजे, बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांसमोरच २०-२५ जणांच्या टोळीने एका व्यक्तीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकां मधून तीव्र संताप व्यक्त केला- जात आहे.इंधनाचा तुटवडा असल्याने मलकापूर पांगरा येथील पेट्रोल पंपावर वाहनधारकांची मोठी गर्दी झाली होती. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून दोन पोलीस कर्मचारी तिथे उपस्थित होते आणि त्यांच्या देखरेखीखालीच पेट्रोल-डिझेलची विक्री सुरू होती. मात्र, रांगेत उभे राहण्यावरून किंवा डिझेलच्या प्रमाणावरून काही जणांमध्ये अचानक वाद उफाळून आला. या वादाचे रुपांतर काही वेळातच तुंबळ हाणामारीत झाले.

## सीबीएसई शाळांमध्ये यंदापासूनच तिसरी भाषा लागू



**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) २०२६-२७या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांना तिसरी भाषा शिकणे अनिवार्य केले आहे. त्यापैकी दोन भाषा या स्थानिक भारतीय भाषा असणे आवश्यक आहे. तसेच, तिसऱ्या भाषेचे मूल्यमापन शाळा स्तरावरच केले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.'सीबीएसई' च्या शैक्षणिक प्रमुख डॉ. प्रज्ञा सिंग यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. 'सीबीएसई'ने महिनाभरापूर्वी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात इयत्ता सहावीपासून तिसरी भाषा अनिवार्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, आता नव्या परिपत्रकानुसार १ जुलै २०२६ पासूनच इयत्ता नववीला तिसरी भाषा लागू असल्याचे जाहीर केले आहे. परदेशी भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर दोन भारतीय भाषा शिकणे आवश्यक आहे. अन्यथा, चौथी भाषा म्हणूनही परदेशी भाषा शिकता येणार आहे, असे नमूद करण्यात आले आहे.

## भाजपाच्या नगरसेवकांच्या निलंबनासाठी शिंदे गटाचे महापौरांना पत्र




**ठाणे :** ठाणे महापालिकेत भाजप आणि शिंदे गटामध्ये वाद उफाळून आले असतानाच, आता शिंदे गटाच्या नगरसेवकांनी भाजपच्या नगरसेवकांचे निलंबन करण्याचे पत्र महापौर शर्मिला पिंपळोलकर यांना दिले आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी भाजपच्या नगरसेवकांना योग्य तो समज द्यावा अशी मागणी केली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण महासभेत भाजप च्या नगरसेवकांनी पूर्वनियोजन करून गोंधळ घालण्याचे कारस्थान केले आणि चोराच्या उलट्या बोंबा मारून शिवसेना नगरसेवक मनोज शिंदे आणि राजेश मोरे यांनी राष्ट्रगीताचा अपमान केला असा आरोप करून नौपाडा पोलिस स्टेशन येथे त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला आणि यामुळे मनोज शिंदे आणि राजेश मोरे यांची प्रतिमा मलिन करण्याचे काम केले.

## जिल्हा परिषद शाळांमध्ये आता अंगणवाडीचे वर्ग




**पुणे :** शैक्षणिक वर्ष २०२६-२७पासून राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये अंगणवाडीचे वर्ग भरविण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद शाळेतील सुस्थितीत असलेली वर्गखोली अंगणवाडा साठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना शिक्षण विभागाने जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

## कांदाप्रश्नी उत्पादक शेतकरी आक्रमक



**नाशिक :** केंद्र सरकारने कांद्याची खरेदी प्रतिक्विंटल १,२३५ रुपये म्हणजेच १२ रुपये ३५ पैसे प्रतिकिलो दराने करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हा दर अत्यंत तोकडा आणि अपुरा असल्याचा आरोप करीत महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने केंद्र सरकारच्या या निर्णयावर तीव्र शब्दांत टीका केली.किंमत स्थिरीकरण निधीअंतर्गत 'नाफेड' आणि 'राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ' या केंद्रीय यंत्रणांमार्फत ही कांदा खरेदी केली जाणार आहे. बफर स्टॉक (राखीव साठा) तयार करण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी ही प्रक्रिया राबवली जाते.

## विदर्भातील शेती अवशेषांतून इंधन निर्मिती



**नागपूर:** राज्य सरकारने अलीकडेच जाहीर केलेले महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण विदर्भाच्या ग्रामीण आणि औद्योगिक विकासासाठी एक गेमचेंजर ठरणार आहे.विदर्भात कापूस आणि सोयाबीनचे क्षेत्र मोठे असल्याने दरवर्षी मोठ्या प्रमाणात कृषी अवशेष उपलब्ध असतात. या धोरणामुळे हे अवशेष उघड्यावर जाळण्याऐवजी त्यांचा वापर इंधन निर्मितीसाठी केला जाईल.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७० ■ सोमवार, १८ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## हापूसच्या पेटीतून राजकारणाचा गोडवा की मतांची पेरणी!

### -वडेट्टीवारांच्या कन्येच्या लग्नपत्रिकेची जिल्ह्यात खळबळ;

### नगरसेवकांना खास 'हापुस आंबा निमंत्रण' पाठवल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

**वर्धा । रवींद्र लाखे :** मे महिन्यात अधिक मास असल्याने १५ मेपूर्वी जिल्हाभरात लग्नसराईचा धडाका उडाला. अनेक राजकीय, सामाजिक आणि प्रतिष्ठित कुटुंबांतील विवाह सोहळे पार पडले. मात्र, १४ मे रोजी पार पडलेल्या एका भव्य विवाहसोहळ्याने संपूर्ण जिल्ह्यात वेगळीच चर्चा पेटवली आहे. ही चर्चा लग्नाच्या थाटामाटाची नसून, लग्नपत्रिका आणि त्यासोबत पाठवण्यात आलेल्या हापूस आंब्याच्या पेट्यांची आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात आता कुजबुज, संशय आणि तर्कवितर्कांचे वारे वाहू लागले आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्यातील प्रभावशाली चेहरा विजय वडेट्टीवार यांच्या कन्या शिवानी हिचा विवाह उदयपूर (राजस्थान) निवासी अभिसार आग्ने यांच्यासोबत मोठ्या दिमाखात पार पडला. लग्नाला अनेक राजकीय नेते, पदाधिकारी आणि प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. मात्र या विवाहाची खरी रंगत लग्नाच्या आधीच सुरू झाली होती.

सूत्रांच्या माहितीनुसार, जिल्ह्यातील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच विविध नगर पंचायतींतील पदाधिकाऱ्यांना खास हापूस आंब्याच्या पेटीसोबत लग्नपत्रिका पाठवण्यात आली. विशेष म्हणजे, हे निमंत्रण फक्त राजकीय पदाधिकाऱ्यांपर्यंतच मर्यादित राहिल्याची चर्चा रंगू लागली आहे. सामान्य कार्यकर्ते, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी किंवा स्थानिक नागरिकांना अशी विशेष निमंत्रणे देण्यात आली नसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



वर्ध्यातील काँग्रेस शहर अध्यक्ष सुरेश ठाकरे यांच्या माध्यमातून अनेक नगरसेवकांना स्वतः भेटून आंब्याच्या पेट्या आणि पत्रिका देण्यात आल्याचे बोलले जात आहे. एवढेच नव्हे तर, नगरसेवकांना आंब्याची पेटी आणि पत्रिका देतानाचे फोटोही काढण्यात आले आणि ते पुढे वरिष्ठांपर्यंत पोहोचवण्यात आल्याची राजकीय गल्लीतील चर्चा अधिक रंगत आहे.

यामुळे आता प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत की, हा केवळ कन्येच्या विवाहाचा आनंद होता की त्यामागे भविष्यातील राजकीय समीकरणांची चाचपणी सुरू आहे, जिल्ह्यात आधीच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधान परिषदेच्या निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. अशा परिस्थितीत नगरसेवक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना विशेष सन्मानाने निमंत्रित करण्यामागे नेमका हेतू काय, यावर राजकीय तर्कांना उधाण आले आहे.

राजकीय वर्तुळात तर उघडपणे चर्चा सुरू झाली आहे की, 'हापूस आंब्याच्या गोडव्यामागे मतांची गणितं तर नाहीत ना, काहीजण तर विजय वडेट्टीवार यांची आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी तयारी सुरू असल्याचे बोलू लागले आहेत. नगरसेवक आणि स्थानिक सदस्य हे अशा निवडणुकांमध्ये निर्णायक भूमिका बजावत असल्याने या 'आंबा राजकारणा'कडे आता संशयाच्या नजरेने पाहिले जात आहे.

दरम्यान, विरोधकांनीही या प्रकरणावरून खोचक टोलेबाजी सुरू केली आहे. सामान्य कार्यकर्त्यांना विसरून फक्त मतदार प्रतिनिधींनाच हापूसची मेजवानी का असा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. काहींनी तर याला 'आंबा डिप्लोमसी' असे नावही दिले आहे.

विवाहसोहळा संपला असला तरी हापूस आंबा आणि लग्नपत्रिकेच्या या राजकीय चर्चेने मात्र जिल्ह्याच्या राजकारणात नवा रंग भरला आहे. आता या गोड राजकारणातून नेमका कोणाचा 'विजय' होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जगण्याच्या लढाईत चार जीव हरले...

### -वर्धा जिल्ह्यात आत्महत्यांचे सत्र कायम; विवंचना, नैराश्य आणि कर्जबाजारीपणाने घेतले बळी



**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात आत्महत्यांचे काळीज पिळवटून टाकणारे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. गेल्या २४ तासांत चार जणांनी जीवन संपविल्याच्या घटना समोर आल्याने हळहळ व्यक्त होत आहे. यात तिघांनी गळफास घेतला, तर एका शेतकऱ्याने किटकनाशक प्राशन करून जीवनयात्रा संपविली. विवंचना, नैराश्य आणि आर्थिक तणावामुळे हे जीव अकाली निघून गेल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

देवळी तालुक्यातील पुलगाव येथील बरांडा गौतमनगर परिसरातील रोहित वासू सांगोळे (२५) या युवकाने स्वतःच्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. रोजंदारीचे काम करून तो एकटाच राहत होता. काही दिवसांपासून तो मानसिक तणावात असल्याचे परिसरातील नागरिक सांगत होते. १६ मेच्या मध्यरात्री त्याने टोकाचे पाऊल उचलल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. पुलगाव पोलिसांनी या प्रकरणाची नोंद घेतली आहे.

आष्टी शहीद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पंचाळा येथे रामदास किसन ठाकरे (८०) या वृद्धाने गोठ्यात गळफास घेत आत्महत्या केली. वाढते वय आणि नैराश्यामुळे त्यांनी हे पाऊल उचलल्याची चर्चा गावात आहे. या घटनेमुळे पंचाळा परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, आष्टी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साहूर येथे संतोष नामदेव कैलाखे (२६) या युवकाने शेतातील झाडाला गळफास घेत जीवन संपविले. शेतीसोबत इतर कामे करून संसाराचा गाडा हाकणारा संतोष १६ मे रोजी अचानक घरातून निघून गेला होता. काही वेळानंतर त्याचा मृतदेह शेतात आढळून आला. या घटनेने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चौथी घटना वडनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील काचनगाव येथे घडली. बबन श्यामराव माहुरे (६९) या शेतकऱ्याने किटकनाशक प्राशन करून आत्महत्या केली. सात एकर शेती असलेल्या बबन यांनी कपाशी आणि तूर पिकांची लागवड केली होती. मात्र, पीक न आल्याने बँकेचे कर्ज फेडता येत नसल्याची चिंता त्यांना सतावत होती. आर्थिक विवंचनेतून त्यांनी टोकाचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. उपचारासाठी त्यांना आर्वी येथून सेवाग्राम रुग्णालयात हलविण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या सलग घटनांमुळे जिल्ह्यात चिंता व्यक्त होत असून मानसिक तणाव, आर्थिक अडचणी आणि सामाजिक आधाराच्या अभावामुळे अनेक जीव अंधाराच्या गर्तेत जात असल्याचे विदारक वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे.

## शेतकऱ्याच्या घामावर चोरट्यांचा डल्ला; अंगणातूनच ६०० किलो तूर लंपास

**वर्धा जनमाध्यम :** शेतकरी राबराब राबून पिकवतो आणि चोरटे एका रात्रीत घामाची कमाई उचलून नेतात, अशी संतापजनक घटना देवळी तालुक्यातील खर्डा येथे उघडकीस आली आहे. घराच्या अंगणात ठेवलेली तब्बल ६०० किलो तूर अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याने शेतकऱ्याचे सुमारे ३५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

खर्डा येथील शेतकरी विकास रामभाऊ भेंडे यांनी यंदाच्या खरीप हंगामात तूर व सोयाबीनची लागवड केली होती. शेतातील तुरीची काढणी करून मळणीनंतर त्यांनी तूर पोत्यांमध्ये भरून घराच्या आवारात ठेवली होती. प्रत्येक पोत्यात सुमारे ६० किलो तूर होती. मात्र काही दिवसांनी अंगणातील २६ पोत्यांपैकी १० पोती अचानक गायब झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

घराच्या अंगणातूनच शेतमाल चोरीला जात असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवसाढवळ्या शेतीची राखण आणि रात्री घराची रखवाली करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. अखेर भेंडे यांनी देवळी पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. दरम्यान, ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे संरक्षण कोण करणार, असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून विचारला जात आहे.

## कोर्टातील मुद्देमाल चोरीचा उलगडा; आर्वीतून १.२८ लाखांचा ऐवज जप्त

**आर्वी जनमाध्यम :** न्यायालयात जमा असलेल्या मुद्देमालावरच चोरट्यांनी डल्ला मारल्याची घटना उघडकीस आल्यानंतर आर्वी पोलिसांनी तत्पर तपास करत चोरीचा उलगडा केला आहे. या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून १ लाख २८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन आर्वी येथे २७ ऑगस्ट २०२५ ते २५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी न्यायालयातील मुद्देमाल चोरी केल्याची तक्रार दाखल झाली होती. त्यावरून २७ नोव्हेंबर २०२५ रोजी कलम ३०३(२) बीएनएसन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार विशाल उर्फ घनश्याम उर्फ बीडी ज्ञानेश्वर भांगे (वय २४, रा. जनता नगर, आर्वी) याला ताब्यात घेण्यात आले.



चौकशीत आरोपीने अल्पवयीन मुलांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीकडून १० जुने सिलिंग फॅन, एक सबमर्सिबल मोटार पंप, तांब्याच्या तारा, ट्रॅक्टरच्या नऊ मोठ्या बॅटऱ्या तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली ॲक्टिव्हा मोपेड असा एकूण १ लाख २८ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रकांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतिश डेहनकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.

## विश्वासात घेतलं... आणि ४० लाखांचा डल्ला मारला! पेट्रोलपंप मॅनेजरची मालकालाच फसवणूक

**वर्धा जनमाध्यम :** ज्याच्यावर पेट्रोलपंपाची जबाबदारी सोपवली, त्याच मॅनेजरने मालकाच्या विश्वासालाच तडा देत तब्बल ४० लाख रुपयांचा आर्थिक गंडा घातल्याची धक्कादायक घटना समुद्रपूर तालुक्यात उघडकीस आली आहे. ग्राहकांकडून पेट्रोल-डिझेल विक्रीचे पैसे स्वतःच्या, आईच्या आणि मित्राच्या खात्यात वळवत आरोपीने मालकाला अक्षरशः लुटल्याचा प्रकार समोर आला आहे.

वर्ध्यातील हनुमान नगर येथील संघर्ष सिद्धार्थ बुटले यांचा उबदा येथे पेट्रोलपंप आहे. या पंपावर नबील रहेमान खाँ पठाण याला मॅनेजर म्हणून नियुक्त करण्यात आले होते. ग्राहकांकडून ऑनलाईन पद्धतीने येणारी रक्कम अधिकृत खात्यात जमा करण्याऐवजी आरोपीने ती स्वतःच्या तसेच नातेवाईकांच्या खात्यात जमा करून मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे तपासात उघड झाले.

१ एप्रिल २०२५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत आरोपीने तब्बल ४० लाख ५३ हजार ६८ रुपयांची अफरातफर केल्याचे तक्रारीत नमूद आहे. हा प्रकार समोर येताच पेट्रोलपंप व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. विश्वास ठेवायचा तरी कुणावर असा प्रश्न व्यापाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

समुद्रपूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी सुरू आहे. या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचाही तपास पोलिस करीत आहेत.

## रस्त्यात मरा पण शीशीत पेट्रोल मागू नका

### पंपमालकांची मुजोरी शिगेला; अडलेल्या जनतेला नकार, शहरात मात्र बॅरलने काळाबाजार जोरात

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** राज्यभरातील पेट्रोल पंपांवर आता ग्राहक सेवा नव्हे तर पंपमालकांची मनमानीच चालते की काय, असा प्रश्न सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रस्त्यात दुचाकीचे पेट्रोल संपले, परिवारासह गाडी बंद पडली, मदतीसाठी पंपावर धाव घेतली तरी शीशीत पेट्रोल मिळणार नाही, असा फतवाच ऐकायला मिळतो. गाडी उचलून पंपावर आणा, तेव्हाच पेट्रोल देऊ, हा जणू कायदाच राज्यभरातील बहुतांश पंपमालकांनी लागू केला आहे.

विशेष म्हणजे, या मुजोरीमागे सांगितले जाणारे कारणही तितकेच विचित्र आहे. पूर्वी कुणीतरी बाटलीत पेट्रोल नेऊन एखाद्याला जाळले, त्यामुळे मालकांनी शीशीत पेट्रोल बंद केले, अशी ठरलेली टेप प्रत्येक पंपावरील कर्मचारी ऐकवितो. मात्र एखादा प्रवासी रात्री-अपरात्री महामार्गावर अडला असेल, महिलांसह कुटुंब संकटात असेल, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, याचे उत्तर मात्र कुणाकडेच नाही.

एका बाजूला संकटात सापडलेल्या माणसाला अर्धा लिटर पेट्रोल नाकारणारे पंपमालक, दुसऱ्या बाजूला शहरोगावी घराघरांतून बॅरलने सुरू असलेल्या अवैध पेट्रोल विक्रीकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष करतात. प्रशासनाच्या नाकावर टिच्चून हा काळाबाजार सुरू असताना कारवाई मात्र शून्य आहे. नियम फक्त सामान्य माणसासाठीच आहेत का, असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.

पेट्रोल पंपांवर ग्राहकांसाठी आवश्यक असलेल्या सुविधा तर नावालाच उरल्या आहेत. घाणेरडी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची दयनीय व्यवस्था, बंद पडलेल्या हवा मशीन, प्रथमोपचार पेटीचा अभाव, अस्वच्छ परिसरष्ठ पण दर मात्र पूर्ण आकारले जातात. शासनाच्या नियमांना अक्षरशः केराची टोपली दाखवून अनेक पंपमालक बिनधास्तपणे व्यवसाय करत असल्याचे चित्र आहे.

अडलेल्याला पेट्रोल नाही आणि काळाबाजारवाल्यांना बॅरलने पुरवठा, हीच सध्याच्या व्यवस्थेची खरी शोकांतिका ठरत आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की सामान्य जनतेने रस्त्यावरच हेलपाटे खात राहायचे, असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

## कामाच्या शोधात मुंबई गाठली... पण मृतदेह बनूनच गावात परतला

### दीपकचा हृदयद्रावक अंत; गरिबी, मानसिक ताण आणि व्यवस्थेच्या उदासीनतेने घेतला बळी

**समुद्रपूर जनमाध्यम :** पोटाची खळगी भरण्यासाठी घरापासून शेकडो किलोमीटर दूर गेलेल्या एका युवकाचा शेवट इतका वेदनादायी होईल, याची कल्पनाही कुणाला नव्हती. कामाच्या शोधात पुणे आणि नंतर मुंबई गाठलेल्या समुद्रपूर येथील दीपक गिरोले या युवकाचा रेल्वे स्थानकावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. १४ मे रोजी घडलेल्या या घटनेने संपूर्ण परिसर हळहळला असून गरिबी आणि व्यवस्थेच्या उदासीनतेचा आणखी एक बळी गेल्याची भावना व्यक्त होत आहे.

समुद्रपूर येथील प्रकाश गिरोले यांचे कुटुंब अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहे. कुटुंबातील दोन मुलं मतिमंद असून दीपक हा एकटाच मिळेल ते काम करून घराचा आधार बनला होता. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी तो दहा दिवसांपूर्वी पुण्याला कामाच्या शोधात गेला.



तेथे मित्र शशिकांत वझे व कोल्हे यांच्या मदतीने कंपनीत कामालाही लागला. मात्र काही दिवसांतच त्याचे मानसिक संतुलन बिघडल्याचे सांगितले जाते.

कामावर न जाता तो नागपूरला जाण्याच्या उद्देशाने रेल्वेत बसला; मात्र थेट मुंबईत पोहोचला. १३ मे रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे तो रेल्वे स्थानकाच्या छतावर चढला.

पोलिसांनी त्याला खाली उतरविण्याचा प्रयत्न करत असताना तो खाली कोसळला आणि गंभीर जखमी झाला. घाटकोपर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान १४ मे रोजी त्याचा मृत्यू झाला.

खिशातील एटीएम कार्ड आणि मोबाईल क्रमांकावरून त्याची ओळख पटली. मात्र घरची आर्थिक परिस्थिती इतकी बिकट होती की, मृतदेह आणण्यासाठीही कुटुंब हतबल झाले होते. अखेर ही माहिती आ. समीर कुणावार यांना मिळताच त्यांनी तातडीने आर्थिक मदत व रुग्णवाहिकेची व्यवस्था करून दीपकचा मृतदेह रविवारी सकाळी समुद्रपूर येथे पोहोचविला.

कामाच्या शोधात गेलेल्या एका तरुणाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने समुद्रपूर परिसरात शोककळा पसरली असून गरिबाच्या लेकराला जगण्यासाठीही संघर्ष आणि मृत्यूनंतरही संघर्ष, अशी हळहळ व्यक्त केली जात आहे.

## रविवारी रवी कोपला; वर्धा ४६ अंशांनी धगधगला

### सलग दुसऱ्या दिवशी तापमानाचा कहर; उकाड्याने नागरिकांचे हाल बेहाल

**वर्धा जनमाध्यम :** रविवारी सूर्यदेवाने जणू वर्ध्यावर आगच ओकली! जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी कमाल तापमान तब्बल ४६ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने संपूर्ण वर्धा अक्षरशः धगधगत आहे. प्रखर उन्हाच्या झळांनी नागरिकांचे जगणे असह्य झाले असून दुपारच्या सुमारास शहरातील रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळाला.



शनिवारी ४६ अंशांवर गेलेला तापमानाचा पारा रविवारीही कायम राहिल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. भर दुपारी घराबाहेर पडणे म्हणजे जळत्या भट्टीतून चालण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अत्यावश्यक कामासाठी बाहेर पडणारे नागरिक डोक्यावर टोपी, रुमाल, छत्री आणि पाण्याच्या बाटल्या घेऊन उन्हाशी सामना करताना दिसत होते. शहरातील बाजारपेठा, चौक आणि प्रमुख मार्ग दुपारच्या वेळेत ओस पडले होते. उन्हाचा तडाखा इतका तीव्र होता की, वाहन चालकांनाही प्रवास करताना त्रास सहन करावा लागत होता. ग्रामीण भागात शेतकरी व शेतमजुरांचीही अवस्था बिकट झाली असून दुपारच्या वेळी शेतीची कामे थांबवावी लागत आहेत. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका गंभीर बनला आहे. आरोग्य विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत दुपारी १२ ते ४ दरम्यान घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे आणि वृद्ध तसेच लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन केले आहे. एकीकडे तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढत असताना दुसरीकडे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. उन्हाने जगणे मुश्कील झाले आहे, आता फक्त मान्सूनच दिलासा देऊ शकतो, अशी भावना नागरिक बोलून दाखवत आहेत.

रवीच्या प्रखर कोपाने वर्धा होरपळत असताना आता सर्वांच्या नजरा आकाशाकडे लागल्या असून पावसाच्या पहिल्या सरींची आतुरता अधिकच वाढली आहे.

## वन पर्यटनाच्या विकास कामांना गती द्या- पालकमंत्री डॉ.भोयर

### तारेच्या कुंपना ऐवजी बांबू लागवडीवर भर द्या ङ तलावातील गाळ शेतकऱ्यांना नेऊ द्या

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली वन पर्यटन विकासाची कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि विहित मुदतीत पूर्ण करून वन पर्यटनाच्या विकास कामांना कमालीची गती द्या, अशा सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या. वन पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



जिल्हाधिकारी कार्यालयात वन पर्यटन विकास, बोर अभायारण्य येथील रिसार्ट व बॉटनीकल गार्डन आराखडा याबाबत आढावा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. आमदार राजेश बकाने, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपवनसंरक्षक हरवीर सिंग,बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

वन विभागाने पारंपरिक तारेच्या कुंपणाऐवजी निसर्गाला पूरक अशा बांबूच्या फेन्सिंगवर भर दिला पाहिजे. तसेच, आगामी पावसाळा सुरू होण्यापूर्वी च व्यापक वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा. सालोड येथील इको पार्कमध्ये वृक्षारोपणासाठी सावंगी येथील शैक्षणिक संस्थांची मदत घेऊन एक विशेष मोहीम राबवावी आणि जास्तीत जास्त वृक्षलागवड करावी, असे निर्देश पालकमंत्री डॉ. भोयर यांनी दिल्या.

जिल्ह्यातील तलाव खोलीकरणाचे काम करताना त्यातून निघणारा सुपीक गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात नेण्याची परवानगी देण्यात यावी. यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल आणि तलावांची साठवणूक क्षमताही वाढेल. पावसाचे पाणी अधिकाधिक कसे साचवता येईल, यावर यंत्रणांनी लक्ष केंद्रित करावे. केळझर, सालोड व रोठा येथील विकासकामांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करून प्रलंबित निधीसाठी पाठपुरावा करण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले. यावेळी आमदार राजेश बकाने यांनीही विविध विषय मांडले. सोलाड येथील इको पार्क, सारंगपुरी निसर्ग पर्यटन, गिरड येथील प्रस्तावित टायगर सफारी, सेवाग्राम येथील तलाव खोलीकरण, वन क्षेत्रातील मृद व जलसंधारणची कामे, रहाटी व ढगा पर्यटन गेट, वनातील इमारती वनातील मार्ग व पूल, आदीचा पालकमंत्र्यांनी सविस्तर आढावा घेतला.

बोरधरण येथील रिसॉर्ट व बॉटनीकल गार्डनचा आढावा- बोर व्याघ्र पर्यटनाला चालना देण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या रिसॉर्ट व बॉटनीकल गार्डन आराखड्याचा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आढावा घेतला. रिसॉर्ट बुकिंगची सुविधा मुख्य गेटजवळच उपलब्ध असावी. रिसॉर्टच्या देखभाल व दुरुस्तीसाठी व्यावसायिक एजन्सीची नियुक्ती करावी. वन क्षेत्रात आकर्षक मुख्य प्रवेशद्वार आणि सुसज्ज गार्ड रूम तयार करावी. जुन्या रेस्ट हाऊसचे तातडीने नूतनीकरण करण्यात यावे, आदी सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## 'राष्ट्रवादी'तली ढकलाढकल

अन्य कुठल्याही नात्यापेक्षा रक्ताचेच नाते दाट असते, या आशयाच्या इंग्रजीतल्या म्हणीचा प्रत्यय राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांना आला, म्हणूनच त्यांनी बुधवारी संध्याकाळी ज्येष्ठ नेते, खासदार शरद पवार यांची भेट घेतली असावी, असे मानायला जागा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जे सुरू आहे, त्याचा तर्कसंगत अर्थ लावणे सोपे नाही. कारण, पक्ष एक असला, तरी त्या पक्षात जेवढे नेते आहेत, त्या प्रत्येकाचे हितसंबंध वेगवेगळे आहेत. अगदी पवार कुटुंबीय आणि कुटुंबाबाहेरचे अशी ढोबळ विभागणी केली, तरी तीन सदस्यांच्या पवार कुटुंबातल्या सगळ्यांचे हितसंबंध एक नाहीत. त्यामुळे, राजकारणात पूर्वी जसा 'मुद्द्याधारित पाठिंबा' दिला जात असे, तसे इथे प्रत्येक मुद्द्यावर वेगवेगळे नेते एकत्र येतात आणि तेवढ्यापुरता त्यांना 'बाहेरून' पाठिंबाही मिळतो. माध्यमे आपापल्या परीने त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात; पण दर आठवड्याला विश्लेषणाची नवीच दिशा त्यांना 'पकडावी' लागते. हत्ती आणि सात आंधळ्यांच्या कथेतील आंधळ्यांसारखी त्यांची अवस्था झाली आहे. संपूर्ण घडामोडींचे सूत्र आपल्याला गवसले, असे वाटते तेव्हांच नेमके उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांचे एखादे पत्र समोर येते किंवा शरद पवार सुप्रिया सुळे-रोहित पवार यांच्यापैकी कोणाचे तरी भलताच अर्थ निघणारे वक्तव्य होते, त्यामुळे आजवरच्या घडामोडींतले सगळे बिंदू पुन्हा नव्याने जुळवायला घ्यावे लागतात ! एक स्पष्ट आहे, खासदार प्रफुल्ल पटेल आणि तटकरे या दोघांवरही सुनेत्रा पार्थ-जय पवार या कुटुंबाचा विश्वास नाही. पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपद त्यांनी पटेल यांच्याकडून हलकेच काढून घेतले; म्हणजे ते पदच विसर्जित करून टाकले! तटकरे पक्षाचे लोकसभेतले नेते आहेत. पण, महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आहेत की नाही, याविषयी संभ्रम निर्माण केला गेला आहे.मूळ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या हातून पळवताना पटेल यांनी ज्या पदाचा वापर केला, ते पदच खबरदारीचा उपाय म्हणून विसर्जित करण्यात आलं असून पक्ष दुसऱ्यांदा पळवण्याची संधी कोणालाच उपलब्ध होऊ नये, यासाठी सर्व कळीची, संवेदनशील, शक्तिशाली पदे तीन पवारांनी आपापसात वाटून घेतली आहेत. त्या अर्थाने हा पक्ष आता पूर्णपणे पवार कुटुंबाचाच सुरक्षित पक्ष झाला आहे! पटेल आणि तटकरे या दोघा अनुभवी नेत्यांशी विनम्रपणे बोलत राहायचे, तोंडी मानसन्मान द्यायचा, समजूत काढत राहायची, पण कागदावरून या दोघांचाही शक्तिपात करायचा, अशी स्मार्ट खेळी सध्या पवार कुटुंबाकडून खेळली जाते आहे, असे चित्र आहे.पटेल आणि तटकरे या दोघांव्यतिरिक्त छगन भुजबळ, दिलीप वळसे, धनंजय मुंडे हे चर्चेतले आणि हसन मुश्रीफ, अनिल पटेल हे नेहमीच्या चर्चेत न येणारे; पण वजनदार नेते या पक्षात आहेत. अजितदादांच्या दुर्दैवी निधनानंतर सुरुवातीला भुजबळ यांनी पक्षात काही प्रमाणात पुढाकार घेतला. पण, नंतर त्यांनी त्यातून अंग काढून घेतले. भुजबळ यांचा पुढाकार राज्यसभेसाठी होता, अशी पक्षात आजही चर्चा आहे. त्यासाठी त्यांच्या काही अटी होत्या. पण, त्या अटींना पक्षात कोणाचाच पाठिंबा मिळाला नाही. त्यामुळे, भुजबळ तात्पुरते बाजूला झाले आहेत. मुंडे यांच्या अडचणी जगजाहीर आहेत. वळसे नेहमीप्रमाणे 'जेवढ्यास तेवढे' आहेत. त्यामुळे, पक्षातील आमदारांची चांगलीच अडचण झाली आहे. हे सगळे आमदार सत्तेबरोबर राहण्यासाठी शरद पवार यांची साथ सोडून आले आहेत. सत्तेबरोबर राहण्यामध्ये त्यांचे जे हितसंबंध आहेत, ते साध्य होत नसतील तर ते अस्वस्थ होणारच. सतत सुरक्षित छत्राच्या शोधात असणाऱ्या आमदारांचा कल नेहमीच सत्तेतल्या मजबूत पक्षाकडे असतो. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सतत अस्थिरता राहणार असेल, तर त्यांच्या पावलांची दिशा भारतीय जनता पक्षाकडे असेल, हे सांगायला कोणा तज्ज्ञाची गरज नाही. रोहित पवार यांनी परवा पटेल-तटकरे यांच्यावर आरोप करताना त्यांच्यासह २२ आमदार भाजपात प्रवेश करणार असल्याचा आरोप याच आनुषंगाने केला होता. आरोप करणारे किंवा त्यावर जसंच्या तसे भाष्य करणारे राष्ट्रवादीतल्या प्रवाहांचा विचार करतात, तसा भाजपमधल्या मतप्रवाहांचा करत नाहीत. आज राज्याचे राजकारण पूर्णपणे भाजपप्रभावी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हाती एकवटले आहे, यात शंका नाही. त्यामुळे, पक्षात त्यांच्या भूमिकेला महत्त्व आहे. राष्ट्रवादीतले पवार कुटुंब असो, की पटेल-तटकरे-भुजबळ असोत, दोन्ही आघाड्या फडणवीस यांच्याशीच जवळीक ठेवून आहेत. राष्ट्रवादीतल्या उलथापालथी फडणवीस यांच्या भूमिकेवर अवलंबून आहेत, अशी टीका त्यामुळेच होत असते. मध्यंतरी खासदार सुप्रिया सुळे यांनीही काही वादग्रस्त मुद्द्यांवर फडणवीस यांनाच जाहीर समर्थन दिले होते, हे याठिकाणी लक्षात घ्यायला हवे. फडणवीस यांच्या कोण किती जवळ आहे, याबाबत यातल्या कोणालाच दुसऱ्याचा अंदाज नाही. त्यामुळे, प्रत्येक जण आपणच त्यांच्या जास्त विश्वासात राहू, यासाठी धडपडतो आहे, हे सर्वश्रुत आहे. याचा लाभअंतिमतः भाजपलाच होणार हे उघड आहे.अपघाती निधनापूर्वी अजितदादांचा मानस दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाचा होता. पटेल-तटकरे सुरुवातीला हे मान्य करत नव्हते. पण, आता त्यांनीही या गोष्टीला दुजोरा द्यायला सुरुवात केली आहे. दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला या दोघांचा विरोध असल्याचे चित्र त्यांच्या वक्तव्यांनी त्यांनीच उभे केले होतं. अजितदादा असताना ज्यांची एकत्रिकरणाला संमती होती, त्या आमदारांची भूमिका आता वेगळी असू शकते. कदाचित त्यामुळेच या दोघांनी तशी भूमिका घेतली असणे शक्य आहे. रोहित पवार यांच्या '२२' या आकड्याला हा संदर्भअसेल. आता पटेल-तटकरे यांना ज्या गतीने निष्प्रभ केलं जातं आहे, पवार कुटुंबात आजोबा आणि नातवंडांच्या भेटी होत आहेत, त्यामुळे दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाच्या चर्चेने पुन्हा उचल खाल्ली आहे. दोन्ही पक्षांचं एकत्रिकरण आणि सत्तेची ऊब हे दोन्ही साधत असेल, तर आमदारांची भूमिका काय असेल? शरद पवार नेहमीच स्वतःसाठी सगळे मार्ग खुले ठेवत असतात. महाराष्ट्राच्या राजकारणात कोणाची काय गरज आहे, याचा अचूक अंदाज त्यांना असतो. परवाच्या त्यांच्या पत्रकार परिषदेतील पटेल तटकरेंबाबतची त्यांची वक्तव्ये जे शब्दशः घेतील त्यांची फसगत होईल. राष्ट्रवादीत कोण कोणाला कुठपर्यंत ढकलत नेतो, हेच येत्या काळातले त्या पक्षातले राजकारण असणार आहे. पटेल - तटकरे हे अनुभवी मातब्बर आहेत हे खरे; पण पार्थ जय यांना मिळणारे मार्गदर्शनही 'कच्च्या गुरू'चे नाही, एवढा निष्कर्ष तरी आजच्या घडीला नक्कीच काढता येईल.

# भाजपच्या राजकारणाचे बिहारी वळण

**बिहारच्या राजकारणाने आजवर अनेक स्थित्यंतरे अनुभवली आहेत; परंतु सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाचा नुकताच झालेला विस्तार हा सत्तेच्या समीकरणांच्या पलीकडे जात उद्याच्या नव्या राजकीय पर्वाचा प्रारंभ म्हणून पाहिला पाहिजे. अनेक दशकांपासून बिहारच्या राजकारणाची धुरा ज्या नीतीशकुमारकेंद्रीत चौकटीत फिरत होती, तिला छेद देऊन भारतीय जनता पक्षाने आता 'नितीशोत्तर' काळाची तयारी पूर्ण केल्याचे स्पष्ट होत आहे.**




मंत्रिमंडळ विस्तारात माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांच्यासह ३२ मंत्र्यांनी शपथ घेतली आहे. या विस्ताराद्वारे भाजप आणि संयुक्त जनता दलाने राज्यातील जातीय समीकरणे आणि मित्रपक्षांमधील समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या पद्धतीने चेहऱ्यांची निवड आणि खात्यांचे वाटप करण्यात आले आहे, त्यातून २०२९ ची लोकसभा निवडणूक आणि आगामी विधानसभा निवडणुकांसाठी भाजपने आखलेली एक मोठी व्यूहरचना दिसून येते. या मंत्रिमंडळ विस्ताराचा सर्वात मोठा आणि ठळक संदेश म्हणजे भाजप आता बिहारमध्ये केवळ 'धाकटा भाऊ' किंवा 'सहयोगी पक्ष' म्हणून राहण्यास इच्छुक नाही. राज्याच्या राजकारणाची मुख्य धुरा आपल्याकडे असणार आहे, हे यातून भाजपने सर्वच पक्षांना दाखवून दिले आहे. सम्राट चौधरी यांच्यासारख्या आक्रमक आणि युवा नेत्याला मुख्यमंत्री पदाची जबाबदारी देऊन पक्षाने आधीच आपली भूमिका स्पष्ट केली होती; परंतु आता मंत्रिमंडळात नव्या आणि लढाऊ चेहऱ्यांना स्थान देऊन भाजपने आपला स्वतंत्र जनाधार मजबूत करण्यावर शिक्कामोर्तब केले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची या प्रक्रियेतील सक्रिय उपस्थिती या विस्ताराला राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देणारी आहे. पश्चिम बंगाल आणि आसाममधील विजयानंतर पूर्व भारतात आपले वर्चस्व कायम राखण्यासाठी बिहार हे भाजपसाठी सर्वात महत्त्वाचे द्वार आहे आणि सम्राट चौधरी हे यासाठीचा भक्कम आधार म्हणून समोर आले आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळ विस्तारात सोशल इंजिनिअरिंगचा अत्यंत सूक्ष्म विचार करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात ज्याप्रमाणे विविध जाती-समूहांची मोट बांधून यश मिळवण्यात आले, त्याच धर्तीवर बिहारमध्येही आता भाजपकडून प्रयोग केला जात आहे. मंत्रिमंडळात ओबीसी, ईबीसी, दलित, महादलित आणि सवर्ण अशा सर्वच घटकांना अत्यंत संतुलित प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. विशेषतः निषाद, कुशवाहा आणि पासवान या समाजातील नेत्यांना दिलेले स्थान हे एनडीएच्या मतांची टक्केवारी स्थिर ठेवण्यासाठी अत्यंत कळीचे ठरणार आहे. सीमांचल आणि मिथिलांचल यांसारख्या भौगोलिक क्षेत्रांना दिलेले झुकते माप हे भविष्यातील प्रादेशिक वर्चस्वाच्या लढाईत भाजपला बळ देणारे ठरेल.या विस्ताराद्वारे भाजपने सामाजिक न्यायाचा नारा देतानाच हिंदुत्वाच्या मुद्द्यालाही एक नवी धार देण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरीकडे, संयुक्त जनता दलासोबतचे (जेडीयू) नाते टिकवून ठेवताना भाजपने अत्यंत सावध पवित्रा घेतला आहे. मंत्रिमंडळातील ५०-५० टक्के वाटा हा भाजप अजूनही नीतीश कुमार यांचा यथोचित सन्मान राखत आहे, हा संदेश देणारा आहे; मात्र त्याच वेळी भाजप सत्तेची सूत्रे हळूहळू आपल्याकडे वळवत आहे. नितीश कुमार यांच्या राजकीय वारशाचे जतन करत असतानाच त्यांच्याच तोडीचा एक सक्षम नेता म्हणून सम्राट चौधरी यांना प्रोजेक्ट करणे, ही भाजपची एक दीर्घकालीन खेळी आहे. यामुळे जेडीयूच्या मतदारांना आपल्याकडे वळवणे सोपे होणार आहे. ही रणनीती केवळ बिहारपुरती मर्यादित नसून, ती संपूर्ण पूर्व भारताच्या राजकारणावर प्रभाव टाकणारी आहे.प्रशासकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर या विस्तारात केवळ राजकीय सोय न पाहता कार्यक्षमतेवर भर देण्यात आल्याचे दिसते. खात्यांच्या वाटपात दिसून आलेली कल्पकता ही टीम मोदी-शहा-चौधरी यांच्यातील समन्वय दर्शवणारी आहे. बिहारमध्ये प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेले विकासाचे प्रश्न आणि प्रशासकीय जडत्व दूर करण्यासाठी या नव्या जोमाच्या मंत्रिमंडळाकडून मोठ्या अपेक्षा आहेत.युवा आणि अनुभवी अशा दोन्ही पिढ्यांचा संगम या मंत्रिमंडळात पाहायला मिळतो, जो राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक आहे. आक्रमक राजकारण आणि प्रभावी प्रशासन या दोन चाकांवर सम्राट चौधरींचे सरकार धावणार असल्याचे संकेत यातून मिळताहेत. अर्थात, या मंत्रिमंडळ विस्ताराचे फलित हे केवळ सत्ता टिकवण्यात नाही, तर उद्याचा बिहार घडवण्यात दडलेले आहे. सीमावर्ती भागातील आव्हाने, अंतर्गत सुरक्षा आणि विशेषतः पूर्वेकडील राज्यांशी असलेला समन्वय साधण्याच्या दृष्टीने बिहारचे राजकीय स्थैर्य अत्यंत महत्त्वाचे आहे. भाजपने या विस्ताराच्या माध्यमातून आपली भविष्यातील रणनीती स्पष्ट केली असून, विरोधकांसाठी हे एक मोठे आव्हान ठरणार आहे. बिहारच्या राजकारणाचा 'नीतीश युगा'कडून 'सम्राट युगा'कडे होणारा हा प्रवास अत्यंत नियोजित आणि सहेतूक आहे. या नव्या राजकीय समीकरणांमुळे बिहारच्या विकासाला किती गती मिळते आणि आगामी निवडणुकांमध्ये याचे काय परिणाम उमटतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल; मात्र सध्या तरी भाजपने या विस्ताराच्या माध्यमातून बिहारच्या राजकारणाचा पट आपल्या बाजूने वळवण्यात यश मिळवले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**संगीता चौधरी**

# अण्णा द्रमुकमधील अंतर्गत संघर्ष !

१९६७ साली झालेल्या तामिळनाडू (त्यावेळी मद्रास) विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून अण्णा दुराई यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक हा पक्ष राज्यात सत्तेवर आला.१९६९ साली अण्णा दुराई यांच्या निधनानंतर एम.करुणानिधी हे राज्याचे मुख्यमंत्री बनले.पक्षाचे अध्यक्षपदही तेंव्हा एम.करूणानिधी यांच्याकडे होते. सिनेस्टार एम.जी.रामचंद्रन हे त्यावेळी पक्षाचे खजिनदार होते.करूणानिधी हे जरी राज्याचे मुख्यमंत्री असले तरी, सिनेस्टार एम जी रामचंद्रन यांची लोकप्रियता त्यांच्यापेक्षा कितीतरी जास्त होती.करुणानिधी आणि एम जी रामचंद्रन (एमजीआर) यांच्यातील व्यक्तिगत संबंध जरी अतिशय जिव्हाळ्याचे असले तरी एमजीआर यांची लोकप्रियता, करुणानिधी यांना कुठेतरी सलत असावी.त्यावेळी अशी चर्चा होती की करुणानिधी यांनी एकदा एमजीआर यांना अल्टिमेटम दिला होता की, त्यांनी चित्रपट आणि राजकारण या पैकी एकाची निवड करावी.अर्थात एमजीआर यांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही हा भाग वेगळा.एमजीआर यांचे सिनेस्टार म्हणून लाखो फॅन्स होते, आणि याच फॅन्सच्या मदतीने नंतर त्यांनी आपल्या नव्या पक्षाची स्थापना केली.

१९७१ च्या सुमारास करुणानिधी आणि एमजीआर यांच्यातील संबंध बिघडण्यास सुरुवात झाली.एमजीआर यांनी द्रमुक सरकारमधील भ्रष्टाचारा बाबत उघडपणे टीका करायला सुरुवात केली.त्यामुळे करुणानिधी हे प्रचंड नाराज झाले.करूणानिधी यांच्या मंत्रिमंडळातील सदस्य,पक्षाचे आमदार आणि पक्षाचे पदाधिकारी यांनी आपली मालमत्ता सार्वजनिकरित्या जाहीर करावी,अशी मागणी एमजीआर यांनी करुन, प्रचंड खळबळ उडवून दिली.करूणानिधी यांना ही टीका रुचली नाही.करुणानिधी आणि एमजीआर यांच्यातील संघर्षाने नंतर गंभीर रूप धारण केले आणि त्याची परिणती म्हणजे, एमजीआर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली.त्यानंतर ११ ऑक्टोबर १९७२ रोजी एमजीआर यांनी अण्णा द्रमुक या पक्षाची स्थापना केली.पक्षाची स्थापना झाल्यानंतर पाच वर्षांनी म्हणजे १९७७ साली एमजीआर यांच्या नेतृत्वाखाली अण्णा द्रमुक हा पक्ष तामिळनाडूमध्ये सत्तेवर आला आणि एमजीआर हे राज्याचे मुख्यमंत्री बनले.त्यानंतर त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे डिसेंबर १९८७ पर्यंत ते राज्याचे मुख्यमंत्री होते.




एमजीआर यांच्या उत्तराधिकारी सिनेस्टार जे जयललिता यांनी नंतर पक्षाची धुरा सांभाळली.त्यांनी सहा वेळा राज्याचे मुख्यमंत्रीपद भुषवले.डिसेंबर २०१६ मध्ये जयललिता यांचे निधन झाल्यानंतर अण्णा द्रमुक पक्षाच्या घसरगुंडीला सुरुवात झाली.मे २०२१ पर्यंत इ.के.पलानीस्वामी यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद सांभाळले.मात्र २०२१ मध्ये झालेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अण्णा द्रमुकचा पराभव करून एम के स्टॅलिन यांच्या नेतृत्वा खालील द्रमुक हा पक्ष तामिळनाडूमध्ये सत्तेवर आला.एम के स्टॅलिन यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून चांगली कामगिरी केली.मात्र इ.के.पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखालील अण्णा द्रमुक हा पक्ष दिवसेंदिवस कमकुवत होत गेला.२०१९ ची लोकसभा निवडणूक, २०२१ ची तामिळनाडू विधानसभा निवडणुक आणि नुकतीच पार पडलेली २०२६ ची विधानसभा निवडणुक यांमध्ये अण्णा द्रमुकला चांगली कामगिरी करता आली नाही, त्यामुळे इ.के.पलानीस्वामी यांच्या नेतृत्व क्षमते बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.नुकत्याच पार पडलेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत केवळ ४७ जागा जिंकून अण्णा द्रमुक हा पक्ष तिसऱ्या स्थानावर फेकला गेला.विजय नावाच्या सुपरस्टारच्या नेतृत्वाखालील तमिळगा वेत्री कळघम या नवख्या पक्षाने राज्यातील प्रस्थापित अशा द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पक्षांचा पराभव करून, तामिळनाडूच्या राजकारणात खळबळ उडवून दिली.१९६७ पासून २०२६ पर्यंत, गेली ५९ वर्षे राज्यात आलटून पालटून सत्तेवर येणाऱ्या अण्णा द्रमुक आणि द्रमुक या पक्षांची सद्दी अखेर विजयच्या नेतृत्वाखालील टीव्हीके या पक्षाने संपवली.या पार्श्वभूमीवर अण्णा द्रमुक या पक्षामध्ये नुकतीच जी फूट पडली आहे,त्याचा मागोवा घ्यावा लागेल.यशाला सगळेच धनी असतात पण अपयशाला कुणीच धनी असत नाही.या उक्तिप्रमाणे,अण्णा द्रमुकच्या लागोपाठच्या अपयशाचे सारे खापर पक्षाचे नेते इ.के. पलानीस्वामी यांच्या डोक्यावर फोडून, पक्षातील काही नेत्यांनी बंडखोरी केली.पक्षातील वरिष्ठ नेते वेलुमणी आणि शणमुगम यांनी इ.के.पलानीस्वामी यांच्या कार्यपध्दती बाबत टिका करून,आपला वेगळा गृप तयार केला.इ.के.पलानीस्वामी यांच्यावर त्यांनी केलेला मोठा आरोप म्हणजे पक्षाचा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर, इ.के. पलानीस्वामी यांनी मुख्यमंत्री बनण्यासाठी,आपला कट्टर राजकीय शत्रू असलेल्या द्रमुक बरोबर हातमिळवणी करण्याचा प्रयत्न केला.

पडद्यामागून अशा हालचाली सुरू होत्या की सिनेस्टार विजय यांच्या पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी, द्रमुकने आपल्याला बाहेरून पाठिंबा द्यावा,या बाबतची बोलणी इ.के. पलानी स्वामी आणि द्रमुक यांच्यात सुरू होती. नंतर ती बोलणी काही कारणाने फिसकटली.मात्र गेली पाच दशके ज्या पक्षाच्या विरोधात आपण राजकारण केले,त्या पक्षाकडे सत्ता मिळवण्यासाठी इ.के.पलानीस्वामी यांनी पाठिंब्याची मागणी करणे ही गोष्ट वेलुमणी आणि शणमुगम या पक्षातील वरिष्ठ नेत्यांना बिलकुल रुचली नाही.त्यांच्या नेतृत्वा खालील २५ आमदारांनी,पलानीस्वामी यांचा आदेश डावलून, विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने मतदान करण्याचा निर्णय घेतला आणि तो अमलातही आणला.विजय यांनी महत प्रयासाने साध्या बहुमतासाठी लागणाऱ्या आकड्यांची जुळवाजुळव केली होती. मात्र अण्णा द्रमुकच्या बंडखोर गटाने विजय यांना साथ दिल्याने, त्यांनी विश्वासदर्शक ठराव आरामात जिंकला. विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने १४४ मते पडली तर विरोधात २२ मते पडली,ती मते पलानीस्वामी गटाची होती.द्रमुकने विश्वासदर्शक ठरावावर बहिष्कार घातला ( सभात्याग केला ) तर भाजप आणि पीएमके हे पक्ष मतदानापासून दूर राहिले आता पलानीस्वामी हे बंडखोर आमदारां विरोधात काय कारवाई करणार ते पहावे लागेल.पलानीस्वामी यांनी काही बंडखोरांची आणि त्यांच्या नेत्यांची त्यांच्याकडे असलेल्या निरनिराळ्या पदांवरून हकालपट्टी करून आपली चुणूक दाखवली आहे.बंडखोरांचे असे म्हणणे आहे की पलानीस्वामी यांनी आपल्याला चर्चेसाठी बोलावणे गरजेचे आहे.पक्षाला संकटातून वाचण्यासाठी आपण कोणताही त्याग करायला तयार आहोत, असे विधान पलानीस्वामी यांनी केले आहे.मात्र त्यासाठी ते पक्षाचे नेतृत्व सोडायला तयार आहेत का,हा खरा प्रश्न आहे.हा तिढा सोडवता आला नाही तर पक्षाला आपल्या अस्तित्वाची लढाई लढावी लागेल.

**( अभय गोखले )**

## अधिक मुले जन्माला घाला आंध्र प्रदेश सरकारचा अजब निर्णय

नुकताच आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी एक मोठी घोषणा केली आहे. राज्यातील लोकसंख्या कमी होत असल्याने त्यात वाढ व्हावी म्हणून राज्य सरकारकडून पालकांना प्रोत्साहन भत्ता दिला जाणार आहे. तिसऱ्या मुलाला जन्माला घालणाऱ्यांना ३० हजार रुपयांचा तर, चौथ्या मुलाला जन्म देणाऱ्यांना ४० हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जाणार असल्याचे वृत्त आहे चंद्राबाबू नायडू यांनी श्रीकाकुलम जिल्ह्यातील नरसण्णापेटा येथील स्वर्ण आंध्र आणि स्वच्छ आंध्र या स्वच्छता कार्यक्रमाच्या जाहिर सभेत हि घोषणा केली आहे एकीकडे भारत सरकार लोकसंख्या नियंत्रणात कशी राहील हे पहात असताना एका राज्याचे प्रमुख असला विचित्र निर्णय घेणे उचित नाही आज वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे एकेकाळी हेच चंद्राबाबू नायडू लोकसंख्या नियंत्रणाचे समर्थन केले होते तेच आता लोकसंख्या वाढीसाठी प्रयत्न करत आहेत आपल्या देशाची लोकसंख्या दिडशे कोटींकडे वाटचाल होत असून जगातील क्रमांक एकचा देश बनणारे आहे एकेकाळी देशातील हायटेक सीएम म्हणून एन.चंद्राबाबू नायडू यांची ख्याती होती त्यामुळे आंध्र प्रदेश सरकारने अर्थात एन. चंद्राबाबू नायडू यांनी आपल्या राज्याच्या लोकसंख्या वाढीसाठी घेतलेला निर्णय योग्य नसून त्यांनी फेर विचार करणे अपेक्षित आहे

**राजू जाधव**
मांगूर जि. बेळगांव

जनमाध्यम संवाद
वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया, मत-मतांतरे ९८२२६६४०६७ क्रमांकावर पाठवा.

## आरोग्य सेवेबाबतची सार्वजनिक अनास्था दूर होणे आवश्यक

देशामध्ये अद्यापही आरोग्य हा विषय निवडणुकीचा मुद्दा होत नाही. याचाच अर्थ आरोग्य व्यवस्थेत आपल्याकडे सार्वत्रिक घोर अनास्था दिसून येते. इतकेच नव्हे तर राज्य विधिमंडळ सभागृहात किंवा संसदेतदेखील आरोग्य सेवेबाबत सुरु असलेल्या त्रुटींवर स्वसिस्टर चर्चा घडत नाही. मुलस्तच राज्य किंवा केंद्र सरकारकडून आरोग्य सेवेसाठी दिला जाणारा आर्थिक निधी अतिशय तुटपुंजा असतो. त्यामुळेच गावोगावी आरोग्य सेवेचे तीनतेरा वाजल्याचे बघायला मिळत आहे. महानगरांमधील खासगी हॉस्पिटलांची संख्या प्रचंड वाढली आहे. तिथे सामान्य रुग्णांकडून भरमसाठ पैसे आकारले जातात. गोरगरीब जनता खासगी रुग्णालयांकडे सहसा फिरकत नाहीत. कारण त्यांच्या खिशाला तेथील महागडे उपचार परवडणारे नसतात. शहरांमधील शासकीय रुग्णालयांमध्ये वाढत चाललेली प्रचंड गर्दी पाहता शासनाकडून योग्य त्या उपाययोजना होताना दिसत नाहीत. सामान्य जनतादेखील आरोग्याच्या विषयाबाबत आपल्या लोकप्रतिनिधींना ठणकावून प्रश्न विचारताना आढळत नाही. याउलट परदेशातील शहरांमध्ये आरोग्य सेवेबाबत कमालीची सतर्कता बाळगली जाते. तेथील प्रत्येक नागरिकांचा आरोग्य विमा सरकारकडून भरला जातो. त्याचबरोबर त्यांच्या उपचारांची सर्व जबाबदारीदेखील सरकारच उचलत असते.अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री असल्याच्या काळात मोहोल्ला क्लिनिक अतिशय गाजले होते. या योजनेतून सामान्य जनतेला किफायत दरात उत्कृष्ट आरोग्य सेवा बहाल करण्यात आली होती. ज्या योजनेचा जागतिक स्तरावर बोलबाला झाला होता. मात्र, आपल्याकडे सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या योजना दीर्घकाळ चालू दिल्या जात नाहीत. कारण आपला देश खासगीकरणाकडे मोठ्या वेगाने वाटचाल करीत आहे. सर्व क्षेत्रे खासगी क्षेत्राला देण्यास काही हरकत नाही पण शिक्षण आणि आरोग्य यासारख्या मूलभूत क्षेत्रांबाबत शासनाने अतिशय काळजीपूर्वक पावले टाकण्याची गरज आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात ऐंशी टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली असल्याचे सरकारची आकडेवारी आहे. म्हणून आरोग्य सेवेबाबतची सार्वजनिक अनास्था दूर होणे सध्याच्या काळात आवश्यक झाले आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

# ले-आऊट धारकांकडुन झाडांची अवैध कत्तल!
# शासन गप्प, माफिया ॲक्टिव्ह!

## निसर्गाची हत्या थांबवा! अन्यथा उपोषणाला बसु !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : तालुक्यातील पुसद बोरगडी रस्त्यावर असलेल्या पुसद खंड -१ शेत सर्वे नंबर १५/१ व १५/२ मध्ये नवीन ले-आऊट ची निर्मिती करण्याच्या नावाखाली या शेतातील तसेच शेत लगत असलेल्या "नाला" वरिल ले-आऊट धारक पुसद चे नामांकित बिल्डर तथा डॉ.सतिश चिद्दरवार यांनी नगर प्रशासन व वन विभागाची कोणतीही पुर्व परवानगी न घेता पैश्याचा भरवश्यावर उंबराचे,पिंपळाचे,कडु लिंबाचे व इतर हिरवीगार झाडांची बेकायदेशीरपणे कत्तल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही वृक्षतोड वन अधिनियम तसेच विविध पर्यावरण संरक्षक कायद्यांना पूर्णतः डावलून केल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

या अवैध वृक्षतोडीची तक्रार अब्दुल हमीद शेख यांनी दि.१६ मार्च २०२६ व दि.२० एप्रिल २०२६ ,दि.३० एप्रिल २०२६ रोजी देवुन ही मुख्याधिकारी नगर परिषद पुसद व वन परिक्षेत अधिकारी वन विभाग पुसद हे तातडीने कारवाई न करता तक्रारी दाबून ढेवुन वृक्षाची अवैध कत्तल करणारे ले आऊट धारकांना नवीन ले-आऊट ची घाई गडबडीने अंतिम अभिन्यास मंजुरी देण्याच्या तयारीत आहेत.अवैध वृक्ष कत्तल केल्याने ले आऊट धारकावर तातडीने कारवाई करण्यात संबंधी तक्रकर्ता या नात्याने मकरंद लोखंडे,सहायक रचनाकार नगर परिषद पुसद यांना भेटून अवैध वृक्षतोड प्रकरणी कारवाई होई पर्यंत ले आऊट ची अंतिम अभिन्यास मंजुरी देण्यात येवु नये करीता मुलाकात घेतली असता अवैध वृक्षतोड प्रकरणी कारवाई चे अधिकार आम्हाला नाही कारवाई चे अधिकार वन विभागाला आहे.असे उडवा उडवी चे उत्तर दिले आहे.या नंतर संबंधित वन विभाला भेटलो असता तो म्हणते की सदर शेत जमीन नगर परिषद पुसद हद्दीत असल्याने त्यावर कारवाई चे अधिकार नगर परिषदेलाच आहे.असे एकमेका ढकलून अवैध वृक्षाची कत्तल करणारे ले आऊट धारकाची पाठराखण केली जात आहे. तेव्हा तक्रारकर्ता नी अवैध वृक्षतोड करणारे ले आऊट धारकावर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे असल्याने दि.१३ मे २०२६ रोजी पुन्हा तक्रार देवुन कारवाई ची मागणी केली आहे.व अवैध वृक्षतोड झालेल्या फोटो सह तक्रारी ची प्रत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब, प्रधान सचिव नगर विकास, आयुक्त नगर परिषद प्रशासन, नगर रचना विभाग, तसेच वन विभागाची सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यां सह इतर अधिकारी यांना दिले आहे. ही तक्रार "अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समिती"चे पुसद तालुकाध्यक्ष अब्दुल हमीद शेख यांनी सादर केली असून, त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की दोषींवर त्वरित कठोर कारवाई न झाल्यास येथील नगर परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल. पर्यावरणाचे रक्षण करण्याचे ढोल बडवणारेच आज झाडांची कत्तल गप्प पाहत आहेत, ही बाब लोकशाहीस अत्यंत घातक आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. यावर जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ मार्फत जिल्हा सहाय्यक आयुक्त, न.पा.प्र.शाखा यांनी जा.क्र./तो.वि./कावि-२९६/२०२६ दि.०५ एप्रिल २०२६ रोजी मुख्याधिकारी नगर परिषद पुसद ला सदर तक्रार संबंधी आपण चौकशी करावी व केलेल्या कार्यवाहीचा वस्तुनिष्ठ अहवाल तात्काळ या कार्यालयाकडे पाठवण्यात यावे असे आदेशीत केले आहे.तसेच तक्रारदार यांना आपल्या स्तरावरून परस्पर उत्तर द्यावे असा आदेश दिले. असे आदेशीत पत्र मिळुन आज ९ दिवस होऊन ही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही. पर्यावरणाचे नाश थांबवा!" – झाडे केवळ ऑक्सिजन देत नाहीत, तर ही आपली हिरवीगार श्वास आहेत. या बेकायदेशीर वृक्षहत्येवर जर आता कार्यवाही झाली नाही, तर उद्या उशीर झालेला असेल!"व असे कोणी ही मनमर्जी न कुठलेही वृक्षाची कत्तल करणार आहे.शासन कोठीयों रुपये खर्च करून वृक्ष लागवड करुन जिवंत ठेवण्याचा कार्यक्रम आयोजित करीत आहे व ले-धारक भुमाफीया मोठमोठे जिवंत झाडे ची कत्तल करीत आहे व प्रशासन गप्प बसत आहे.



# अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी आरोपीस दहा वर्षाची शिक्षा

## साक्षीदार फितूर ;वैद्यकीय व वैज्ञानिक पुराव्यावर सरकारी पक्षाचा युक्तिवाद ठरला ग्राह्य!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्वपूर्ण निकाल देऊन आरोपीस दहा वर्षाची शिक्षा ठोठावली. सदर प्रकरण १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात पीडित मुलगी, तिचे आई-वडील तसेच नातेवाईक असलेले महत्त्वाचे साक्षीदार कोर्टात फितूर होऊन त्यांनी आपले जबाब बदलले असतानाही, सरकारी पक्षाने सादर केलेल्या भक्कम दस्तऐवजी, वैद्यकीय व वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे पुसद जिल्हा व अतिरिक्त सत्र कोर्टाने आरोपी शुभम प्रभाकर कांबळे यास दोषी ठरवत कठोर शिक्षा सुनावली. या प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. सुनिता शर्मा यांनी दाखविलेल्या प्रभावी न्यायालयीन मांडणी, पुराव्यांचे अचूक विश्लेषण आणि कायदेशीर कसबाची न्यायालयीन वर्तुळात विशेष चर्चा होत आहे.



जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१ मा. एस. एन. शाह यांच्या कोर्टासमोर चाललेल्या या विशेष POCSO खटल्यात सरकारी पक्षासाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे प्रमुख साक्षीदारांचे फितूर होणे होते. पीडित १६ वर्षीय मुलगी, तिचे आई-वडील व नातेवाईक यांनी न्यायालयात पूर्वीचे जबाब बदलल्याने आरोपीस लाभ मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. सुनिता शर्मा यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय प्रमाणपत्र, डॉक्टरांचे साक्षी बयान, रासायनिक विश्लेषण अहवाल तसेच तपास अधिकाऱ्यांनी संकलित केलेले परिस्थितीजन्य पुरावे यांची प्रभावी सांगड घालत गुन्ह्याची अखंड साखळी कोर्टासमोर सिद्ध केली. सरकारी पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांतील सुसंगती, वैज्ञानिक आधार व घटनाक्रमातील सातत्य यावर कोर्टाने विश्वास ठेवत आरोपीविरुद्धचा गुन्हा शंकातीतरित्या सिद्ध झाल्याचे नमूद केले. प्रत्यक्ष साक्षीदार फितूर झाल्यानंतरही तांत्रिक व दस्तऐवजी पुरावे किती निर्णायक ठरू शकतात, याचे हे प्रकरण महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जात आहे. कोर्टाने आरोपीस POCSO कायदा कलम 4 अंतर्गत १० वर्षे सक्तमजुरी व २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली असून दंड न भरल्यास अतिरिक्त ६ महिने सक्तमजुरी भोगावी लागणार आहे. तसेच भारतीय दंड संहिता कलम 506 अंतर्गत १ वर्ष सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून दंड न भरल्यास अतिरिक्त २ महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागणार आहे. न्यायालयाने सर्व शिक्षा एकत्रितपणे (concurrently) चालतील, असे आदेशात स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे, आरोपीस भारतीय दंड संहिता कलम 376 तसेच POCSO कायदा कलम 4 अंतर्गत दोषी ठरविण्यात आले असले, तरी POCSO कायद्यातील कलम 42 च्या तरतुदीनुसार स्वतंत्र शिक्षा न देता POCSO अंतर्गतच मुख्य शिक्षा कायम ठेवण्यात आली. तसेच आरोपीने जमा केलेल्या २५ हजार रुपयांच्या दंडाची रक्कम अपील मुदत संपल्यानंतर पीडितेला देण्याचे आदेशही कोर्टाने दिले आहेत. कायदेशीर क्षेत्रात या निकालाकडे केवळ शिक्षा म्हणून नव्हे, तर प्रतिकूल परिस्थितीतही सरकारी पक्षाने दाखविलेल्या व्यावसायिक तयारी, पुराव्यांवरील पकड, न्यायालयीन रणनीती आणि प्रभावी वकिलीच्या बळावर न्याय मिळवून देणारे आदर्श उदाहरण म्हणून पाहिले जात आहे.

## • वेचक

### शल्यचिकित्सक डॉ. विजय पोटे यांचे निधन



यवतमाळ : येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी असोसिएट प्रोफेसर व सर्जरी विभाग प्रमुख आणि जिल्ह्यातील ख्यातनाम सर्जन डॉ. विजय दत्तात्रय पोटे यांचे रविवार, १७ मे २०२६ रोजी पहाटे ४ वाजता निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी मंजूषा, अभियंता केतन व डॉ. पारिजात ही मुले आणि मोठा परिवार आहे. मूळचे नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथील रहिवासी डॉ. विजय पोटे गेल्या ३५ वर्षांपासून यवतमाळमध्ये स्थायिक झाले होते. यवतमाळ शहरात कॅन्सर शस्त्रक्रिया सर्वप्रथम सुरू करण्याचे श्रेय डॉ. विजय पोटे यांना जाते. कर्करोग संबंधित शस्त्रक्रियांचे तंत्र अवगत करण्यासाठी त्यांनी मुंबई येथील प्रसिद्ध 'टाटा कॅन्सर हॉस्पिटल'मधून विशेष प्रशिक्षण घेतले होते. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी अनेक गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडल्या आहेत. कर्करोगाच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात त्यांचा हातखंडा होता. रुग्णसेवेसोबतच आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातही सक्रिय असलेल्या डॉ. पोटे यांचा येथील कीर्तन महोत्सव आयोजनात मोठा सहभाग असे. आपल्या मनमोकळ्या स्वभावामुळे रुग्णांमध्ये ते अत्यंत प्रिय होते. डॉ. विजय पोटे यांच्या आकस्मिक निधनामुळे यवतमाळकरांमध्ये हळहळ आहे.

### प्रिया डाखोडे यांना महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार




यवतमाळ - ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी फिल्म प्रॉडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने परिवार लॉन्स बकेट हॉल, न्यू रिंग रोड सिटी मार्केट शेजारी पवित्र भूमी शिर्डी येथे महाराष्ट्र साई पदमश्री पुरस्कार सोहळा २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात यवतमाळच्या सुप्रसिध्द लेखिका प्रिया पद्माकर डाखोडे,इंदाणे यांना त्यांच्या लिखाणातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्या बद्दल महाराष्ट्र साई पदमश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.यासाठी त्यांच्यावर सर्वत्र कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.संपूर्ण पुरस्कार सोहळा नेत्रदिपक असा ठरला . आयोजक सुदाम संसारे यांच्या वाढदिवसा निमीत्य लकी-ड्रा ठेवण्यात आला त्यात प्रिया डाखोडे या पैठणीची मानकरी ठरल्या.

# एचटीबीटी कापुस बियाण्याचे १५० पॉकेट जप्त

## २.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त, कृषी व पोलिस विभागाची संयुक्त कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शासनाने प्रतिबंधित केलेल्या एचटीबीटी कापूस बियाण्यांची अवैध विक्री होत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली त्यानंतर कृषी व पोलीस विभागाने संयुक्तपणे सापळा रचत २ लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त करून एका जणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला ही कारवाई कळंब येथे १६ मे रोजी करण्यात आली.



अविनाश मधुकर येंडे रा कळंब असे गुन्हा दाखल झालेल्या इसमाचे नाव आहे कळंब परिसरात शासनाने प्रतिबंधीत केलेल्या एचटीबीटी कापुस बियाण्यांची अवैधपणे विक्री होत असल्याची माहिती पथकाला मिळाली त्यानंतर कृषी विभाग आणि पोलीस यांच्या संयुक्त पथकाने सापळा रचून कारवाई केली. यामध्ये आर: सीओटी ५जी नावाच्या अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांची १५० पाकिटे हस्तगत करण्यात आली. तसेच कारवाईदरम्यान गुन्ह्यात वापरण्यात आलेली एक मोटारसायकल आणि मोबाईल फोनही असा एकुण २ लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. याप्रकरणी फिर्यादी अधिकारी म्हणून प्रवीण जाधव यांनी कळंब पोलिसात तक्रार दिली त्यावरून अविनाश मधुकर येंडे याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीवर बियाणे कायदा १९६६, बियाणे नियम १९६८, भारत सरकार अंतर्गत पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कापूस बियाणे अधिनियम २००९ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, कृषी अधिकारी, गुणवत्ता नियंत्रण कल्याण बेदरकर, कृषी अधिकारी राहुल डाखोरे आणि वरिष्ट लिपिक मोरेश्वर येंबडवार यांनी केली

# लाखो रुपये खर्चून उभारलेले वनतळे कोरडे
## वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - दिग्रस वन विभागाअंतर्गत येणाऱ्या दिग्रस रेंजमधील रोणादेवी, साखरा व गांधीनगर परिसरात वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेले वनतळे सध्या पूर्णपणे कोरडे पडले आहेत. परिणामी, उन्हाच्या तीव्रतेत वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून त्यांच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, वनतळे उभारणीच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची शक्यता असून संबंधित कामांची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. वन विभागाने वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी उभारलेली ही सुविधा प्रत्यक्षात निष्क्रिय ठरत असल्याने वन्यजीवांवर संकट ओढवले आहे. विशेष म्हणजे, उन्हाळ्याच्या काळात वन्यप्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे ही वन विभागाची प्राथमिक जबाबदारी असताना, अनेक वनतळे कोरडी पडल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे वन्यप्राणी पाण्याच्या शोधात गावांकडे वस्तीच्या दिशेने वळत असून मानव-वन्यजीव संघर्षाची शक्यता देखील वाढली आहे. याप्रकरणी संबंधित वनपाल व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून झालेल्या कामांची चौकशी करण्यात यावी, तसेच तातडीने वनतळ्यांमध्ये पाण्याची व्यवस्था करून वन्यप्राण्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# चमेडियानगर येथे ६५ हजारांची घरफोडी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : घरात कोणीही नसल्याची संधी साधून एका संशयीत चोरट्याने दरवाजाचे कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. तसेच कपाटातील चाळीस हजाराचा सोन्याचा ऐवज आणि २५ हजाराची रोख असा एकूण ६५ हजारांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना चमेडिया नगर येथे घडली. अनिल प्रभाकर बेलसरे (५८) रा चमेडिया नगर असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी यवतमाळ शहर पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी संशयीत आरोपी गामा कोठेकर (२५) रा. चमेडिया नगर यवतमाळ याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# यवतमाळात संवैधानिक मूल्यांवर आधारित चित्रपट प्रशिक्षण व अभिनय कार्यशाळेचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - आंबेडकराईट फिल्म मेकर्स असोसिएशन्स, राष्ट्रशक्ती फिल्म प्रोडक्शन मुंबई आणि संकल्पनी क्रिएशन्स पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रभर संवैधानिक मूल्यांवर आधारित चित्रपट प्रशिक्षण व अभिनय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून, यवतमाळ येथील कार्यशाळा दि. २६, २७ व २८ जून २०२६ रोजी पार पडणार आहे. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'सैराट', 'फॅन्ड्री', 'कासव', 'ट्रिपल सीट', 'निळकंठ मास्तर' आणि 'सुरसपाटा' यांसारख्या ६० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्रपटांचे कला दिग्दर्शक, नृत्य दिग्दर्शक आणि दिग्दर्शक मा. संतोष संखद हे उपस्थित राहणार आहेत.



कार्यशाळेमध्ये आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील तसेच चित्रपट क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया शिकविण्यात येणार आहे. एखाद्या चित्रपटाची संकल्पना सुचण्यापासून ते तो रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होईपर्यंतचे सर्व टप्पे प्रशिक्षणाद्वारे समजावून सांगितले जाणार आहेत. तसेच फिल्म, शॉर्टफिल्म, वेबसिरीज, युट्युब सिरीज आणि विविध डिजिटल कंटेन्टच्या माध्यमातून संवैधानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार कसा करावा, याबाबतही विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन दिले जाणार आहे. यवतमाळकरांसाठी ही मोठी सुवर्णसंधी मानली जात असून, चित्रपट क्षेत्रातील ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आणि दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित संतोष संखद यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवसांचे प्रशिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच पुढील काळात विविध चित्रपट आणि डिजिटल प्रोजेक्टमध्ये काम करण्याची संधीही सहभागी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. इच्छुकांनी ९४०५६५६४५१ या व्हॉट्सॲप क्रमांकावर त्वरित नाव नोंदणी करावी, असे आवाहन राष्ट्रशक्ती फिल्म प्रोडक्शन मुंबईचे अध्यक्ष रवि भोंगाडे यांनी केले आहे.

# महाराजस्व समाधान शिबीराचे उद्घाटन
## आ. किसनराव वानखेडे यांचा हस्ते

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : 15/05/2026 रोजी उमरखेड येथील नगर परिषदेच्या मंगल कार्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधीत दैनंदिन प्रश्नाचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी चे निराकरण करणे , तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी उमरखेड तालुक्यातील उमरखेड राजस्व मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजीत करण्यांत आला होता. या कार्यक्रमाचे उद्धघाटन हे उमरखेड विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार मा. आ. किसनरावजी वानखेडे यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन करण्यांत आले. या कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हा समन्वयक मा.नितिनजी भुतडा, नगराध्यक्षा सौ.तेजश्री जैन, उपविभागीय अधिकारी श्री सखाराम मुळे, तहसिलदार श्री राजेश सुरडकर, तहसिलदार श्री रोहित शिंदे, मुख्याधिकारी श्री अजय कुरवाडे, तालुका कृषी अधिकारी श्री वडकुते, भुमीअभिलेख विभागाचे श्री आडे, वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी, महावितरण, एस.टी.महामंडळ चे प्रतिनीधी, पोलीस विभाग, नगर परिषद, ग्रामविकास विभाग, महिला व बालकल्याण व संजय गांधी नायब तहसिलदार श्री राम पंडीत, शेतीनिष्ठ शेतकरी श्री अशोकराव वानखेडे, सर्व नगर परिष्द सदस्य, पोलीस पाटील, सरपंच व सर्व प्रशासकिय विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच पत्रकार बंधु हजर होते. या शिबीरामध्ये सर्व प्रकारचे तिन हजार तिनशे दोन दाखले वितरीत करण्यांत आले तसेच श्रावणबाळ सेवा योजना, संजय गांधी निराधार योजना, रेशनकार्ड, ईमारत व बांधकाम चे कामगार यांना ओळखपत्र, आरोग्य तपासणी, कृषी विभागाच्या योजनांची माहिती, भूमी अभिलेख विभागाच्या योजना ईत्यादी लाभाचे वितरण करण्यांत आले.



# आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. प्रकाश खरात यांना आदरांजली !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : कथा कविता आणि वैचारिक लेखनाने आंबेडकरवादी साहित्याला समृद्धता देणारे साहित्यिक डॉ.प्रकाश खरात यांचे नागरपूर येथे नुकतेच निधन झाले. त्यांच्या चळवळीतील योगदानाला अधोरेखित करण्यासाठी यवतमाळ येथे वैशालीनगरच्या बुद्धविहारात आदरांजली सभा संपन्न झाली.सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी रवींद्र टेंभूर्ण होते.



सुरुवातीला महाकवी वामनदादा कर्डक यांना त्यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या आदरांजली सभेचे प्रास्ताविकातून इंजि.भास्कर चव्हाण यांनी दोन्ही प्रतिभावंतांच्या साहित्य निर्मितीवर प्रकाश टाकला. तर प्रा. अशोक कांबळे म्हणाले की,डॉ. प्रकाश खरातांनी विद्रोहाची पेरणी संयत भाषेतून अभिव्यक्त केली. आंबेडकरी साहित्यात कथाकार म्हणून त्यांचे वेगळे स्थान आहे. संशोधन ग्रंथातून वेगळा आयाम त्यांनी किला.त्यांची यशोधरा कादंबरी तर केवळ व्यक्तिचरित्रात्मक कादंबरी नसून यशोधरेच्या मानवतेचे कारुण्याचे विविध पैलू त्यात आहे. सभेचे अध्यक्ष रवींद्र टेंभूर्णे यांनी महाकवी वामनदादांच्या गीत गझलमधील सांस्कृतिक सामाजिक चळवळीच्या दृष्टीने वेध घेतला. आदरांजली सभेला डॉ.भीमराव ठोंबरे ॲड.दिंडीलता कांबळे, अलका वाघमारे, माधुरीताई रामटेके, चंद्रशेखर गुजर,तामगाडगे,धनराज धवने उपस्थित होते.

## साखरा खेकडी रस्त्यावर सुरू क्रेशर मशीनमुळे शेतक-यांबरोबर नागरिकांचे नुकसान

# रेल्वे ठेकेदार ची दादागिरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - तालुक्यातील साखरा–खेकडी मार्गावर सुरू असलेल्या रेल्वे प्रकल्पातील क्रेशर मशीनमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. संबंधित ठेकेदाराने शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून गावापासून अत्यंत कमी अंतरावर क्रेशर मशीन सुरू केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

क्रेशर मशीनमधून सतत उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ तसेच अन्य आरोग्यविषयक त्रास सहन करावे लागत आहेत. याचबरोबर शेतजमिनीवर धुळीचा मोठ्या प्रमाणात परिणाम होत असून पिकांचे उत्पादन घटण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा देखील करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या पर्यावरणीय नियमांनुसार अशा प्रकारचे क्रेशर मशीन गावापासून सुरक्षित अंतरावर असणे आवश्यक आहे. मात्र संबंधित रेल्वे ठेकेदाराने नियमांची पायमल्ली करून मशीन सुरू केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तातडीने चौकशी करण्यात यावी, शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी तसेच नियमबाह्य सुरू असलेले क्रेशर मशीन त्वरित बंद करून संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिक व शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

# झरी बाजार समितीच्या उपसमित्या गठीत होणार का ?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

झरी - बाजार समितीची निवडणूक सन २०२४ मध्ये पार पडली. समितीच्या अध्यक्षपदी राजू कासावार तर उपाध्यक्षपदी मंगेश मोहितकर यांची निवड करण्यात आली, आणि याला दोन वर्षाचा कालावधी होत आला. पण कृषी उत्पन्न बाजार समितील इतर पाच समित्या अद्यापपर्यंत गठित करण्यात आल्या नाही. निवडणूक झाल्यानंतर काही महिन्यातच उपसमित्या व सभापतीची निवड करणे हे अत्यंत गरजेचे असतानाही त्या उपसमितीवर संचालकापैकी कोणाचीही निवड करण्यात आली नसल्याने संचालकामध्ये नाराजीचे सूर उमटत आहे.

बाजार समिती समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष निवड झाल्यानंतर समितीचा संपूर्ण व्यवहार हा एकाच सही निशी होत असल्याने बाकी संचालकाचे काय काम असाही प्रश्न संचालकामधून बोलल्या जात आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसमित्या गठीत करण्यात आल्या परंतु झरी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये उपसमित्या गठीत का होत नाही की जाणीवपूर्वक केल्या जात नाही असाही प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा जिल्हा सहाय्यक निबंधक यवतमाळ यांनी या विषयाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# ७ घरफोडींचा उलगडा, तिघे ताब्यात

यवतमाळ - शहरासह जिल्ह्यातील सात घरफोडीच्या गुन्ह्यांचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले असून चोरीतील २ लाख २५ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईत दोन आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले. पोलीस अधीक्षक कुमार चिंथा यांच्या मार्गदर्शनाखाली वाढत्या संपत्तीविषयक गुन्ह्यांवर नियंत्रणासाठी विशेष पथक तयार करण्यात आले होते. १६ मे रोजी पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत सुरेश उर्फ जादू नरेंद्र मलांडे (रा. पारवा) व राहुल उर्फ मच्छी वामन वाघाडे (रा. तलाव फेल, यवतमाळ) यांनी यवतमाळ शहर, अवधूतवाडी, ग्रामीण, बाभुळगाव व नेर परिसरातील सहा घरफोडींची कबुली दिली. आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात आली. एका विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून आणखी एका घरफोडीतील मुद्देमाल जप्त करून एकूण सात गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला.

# एक ही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही-आ.प्रवीण तायडे

## पीक कर्ज वाटप आढावा बैठकीत बँकांना तंबा कर्ज माफीच्या प्रतीक्षेत, पीक कर्ज वाटप रखडले

**चांदूरबाजार/वार्ताहर**

बँके कडे पीक कर्ज मागायला येणाऱ्या तालुक्यातील, एक ही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही. याची दक्षता सर्व बँकांनी घ्यावी.अशा स्पष्ट सूचना आ.प्रवीण तायडे यांनी तहसील कार्यालयात आयोजित पीक कर्ज आढावा बैठकीत बँक अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी ते तहसील कार्यालयातील ब्लॉक लेव्हल बँकर्स कमिटीच्या,पीक कर्ज वाटप आढावा बैठकीचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.



बँके अधिकार्यांना पुढे मार्गदर्शन करतांना आ. तायडे म्हणाले की, सततच्या नैसर्गिक आपत्तीने तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत आला आह. परिणामी त्याला आपला येणारा खरीप हंगाम ऊभा करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. त्यामुळे शेतकरी पीक कर्जा साठी बँके कडे येतो.त्यावेळी पीक कर्जासाठी बँकेत येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याच्या अडचणी समजून घेऊन, त्या तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न बँक अधिकाऱ्यांनी करावा. शेतकरी हा शेतीवर अवलंबून असून वेळेत पीक कर्ज मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे कर्ज वाटप प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांना ,कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. याची खबरदारी बँकांनी घ्यावी, पीक कर्ज मिळणे. हा शेतकऱ्यांचा अधिकार आहे.हे लक्षात ठेवून बँकेत पीक मागायला येणाऱ्या, एका ही शेतकऱ्यांस पीक कर्जा पासून वंचित ठेवू नका. अशी तंबी ही त्यांनी या आढावा बैठकीत,बँक अधिकाऱ्यांना दिली. तसेच यावेळी त्यांनी युवकांच्या रोजगाराच्या प्रश्नावरही भाष्य केले. युवकांना स्वयंरोजगारासाठी मुद्रा लोन योजनेअंतर्गत अधिकाधिक कर्ज वाटप करण्यात यावे, बचत गटांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करावा. त्याचं प्रमाणे शासनाच्या विविध योजनांमधून, युवकांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन त्यांनी बँक अधिकाऱ्यांना केले. विकास प्रक्रियेत बँकांची भूमिका महत्त्वाची असून अधिकाऱ्यांनी जबाबदारीची भावना ठेवून काम करावे. असे ही यावेळी आ.तायडे म्हणाले.

या बैठकीला प्रभारी तहसीलदार मनोज सोनारकर, तालुका कृषी अधिकारी प्रवीण मोहोड, मंडळ अधिकारी भारत पर्वतकर यांच्यासह तालुक्यातील विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच भाजपा तालुका अध्यक्ष रमेश तायवाडे, हर्षल धुळे, जिल्हा उपाध्यक्ष मुरली माकोडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. बैठकीमध्ये तालुक्यातील विविध बँकांनी आतापर्यंत केलेल्या पीक कर्ज वाटपाचा आढावा घेण्यात आला. १५ में पर्यंत तालुक्यात एकूण ,९ हजार ८७० शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप करण्यात आले. या कर्ज वाटपात सेंट्रल बँक ऑफ इंडिया आघाडीवर असून ,या बँके ने तालुक्यातील आपल्या विविध शाखां मार्फत ७ हजार ५१७ शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप केले आहे. बँक निहाय तालुक्यात पीक कर्जाचे वाटप झालेल्या शेतकऱ्यांची संख्या पुढील प्रमाणे आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या शिरजगाव बंड शाखेने ११२३, घाटलाडकी शाखेने १२००, करजगाव शाखेने २५२, तोंडगाव शाखेने ४००, चांदूरबाजार शाखेने ९६६ तसेच ब्राह्मणवाडा थडी शाखेने १३०० शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप केले आहे. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र शिरजगाव कसबा शाखेने २५३, बँक ऑफ इंडिया चांदूरबाजार शाखेने ११०० तर बँक ऑफ बडोदा चांदूरबाजार शाखेने १००० शेतकऱ्यांना कर्ज वाटप केल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

## श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप

**नांदगाव पेठ/वार्ताहर**



श्रीरामचंद्र संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बालसंस्कार शिबिराची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली. शिबिराच्या समारोपानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम स्व.हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टचे विवेक गुल्हाने तसेच सप्तरंग एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर सोसायटी, नांदगाव पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. बालसंस्कार शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीवा रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिबिरादरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समारोपाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर शालेय बॅग मिळाल्याचा आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत चांगले संस्कार आणि सकारात्मक विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी गरज असल्याचे मतही मान्यवरांनी व्यक्त केले.कार्यक्रमाला ट्रस्टचे सचिन राऊत, भास्कर राजूरकर, अतुल तलमले, अक्षय मानकर तसेच सप्तरंग संस्थेचे राजेंद्र तुळे, वेद, अरविंद देशमुख, दिनेश चौधरी, बाळा देशमुख आणि अविनाश शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी परिश्रम घेतले.

## विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाने पंधरा एकर जागा दिली आहे. त्या जागेवर इमारत आणि इतर शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा व इतर सुविधा निर्माण करण्यासाठी १० कोटी रूपयांचा निधी सुद्धा शासनाने दिला आहे. परंतू सदर जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते आणि सदर अतिक्रमण काढण्याकरीता विद्यापीठ प्रशासनाला प्रचंड मेहनत घ्यावी लागली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे,



उपकुलसचिव (विधी) श्री मंगेश जायले, उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण व अभियांत्रिकी विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली आणि अतिक्रमण निर्मूलन करण्यात आले.

विद्यापीठाला जागा हस्तांतरीत झाल्यानंतर १४ मे रोजी त्याठिकाणी प्रतापराव जाधव, राज्यमंत्री, आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा राज्यमंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण, भारत सरकार व संजय गायकवाड, विधानसभा सदस्य, बुलढाणा यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचेसह इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती. याकरीता उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल तसेच अनेक वर्षांपासून रखडलेले मॉडेल डिग्री कॉलेजचे काम पूर्णत्वास आणण्याकरीता अथक परिश्रम घेतल्याबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व गुलाब पुष्प देवून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, कार्यकारी अभियंता शशीकांत रोडे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांचेसह अभियांत्रिकी विभागातील अभियंता श्री विजय चवरे, आकाश सोळंके, मालमत्ता अधिकारी एन.पी. देशमुख, उदय वनस्कर, मनिष शास्त्री,पंकज ठाकूर, संजय बाळापुरे, शरद डुकरे आदींचा कुलगुरूंच्या कक्षात सत्कार करण्यात आला.

## आयटीआयची दारे खुली! दहावी नंतर करिअरचा ‘स्किलफुल’ मार्ग सुरू

### गुरुवारपासून प्रवेश अर्ज नोंदणीला सुरुवात

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

दहावीच्या निकालानंतर करिअरच्या दिशेचा विचार सुरू असतांनाच कौशल्याधारित शिक्षणाची वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी खुली झाली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेशासाठी राज्यभरातील वेळापत्रक जाहीर झाले असून २१ मे (गुरुवार) सकाळी ११ वाजल्यापासून ऑनलाईन अर्ज नोंदणीला सुरुवात होत आहे. त्यामुळे ‘हाताला काम आणि करिअरला वेग’ देणाऱ्या आयटीआय शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढणार आहे. नांदगाव खंडेश्वर तालुका व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नांदगाव खंडेश्वर हे अधिकृत अर्ज स्वीकृती केंद्र म्हणून सेवेत राहणार आहे.



राज्यातील आयटीआय शिक्षणाचा विस्तारही लक्षणीय आहे. राज्यभरात एकूण १००४ आयटीआय संस्था असून त्यात ४१८ सरकारी आणि ५८६ खासगी संस्था आहेत. या सर्व संस्थांमध्ये मिळून तब्बल १ लाख ५७ हजार ६६४ जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी ९७,०८८ जागा सरकारी तर ६०,५७६ जागा खासगी संस्थांमध्ये आहेत. विद्यार्थ्यांना https://admission.dvet.gov.in/ या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. अर्ज भरणे, दुरुस्ती करणे, शुल्क भरणे तसेच कागदपत्रांची तपासणी करून अर्ज निश्चित करण्याची प्रक्रिया २१ मे सकाळी ११ वाजता सुरू होणार आहे. त्यानंतर १ जूनपासून पहिल्या फेरीसाठी ट्रेड व संस्थानिहाय विकल्प (प्रेफरन्स) सादर करण्याची प्रक्रिया सुरू होईल. प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी २१ मे पासून आयटीआयमध्ये मोफत मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहे. दहावीची गुणपत्रिका शाळांमार्फत वितरित झाल्यानंतर सविस्तर वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर होणार असल्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

**शंका असल्यास थेट आयटीआयमध्ये संपर्क -** नांदगाव खंडेश्वर आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया, नियमावली, संकेतस्थळ किंवा तांत्रिक अडचणींबाबत विशेष मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी कोणतीही शंका असल्यास संस्थेशी थेट संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य व प्रवेश प्रक्रिया प्रमुख सुरेश मेंढे यांनी केले आहे.

**नांदगाव खंडेश्वर आयटीआय मध्ये उपलब्ध ट्रेड-** नांदगाव खंडेश्वर येथील आयटीआयमध्ये इलेक्ट्रिशियन, वायरमन, फिटर, कोपा, शिट मेटल वर्कर, वेल्डर, प्लंबर, बेसिक कॉस्मेटोलॉजी व फॅशन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी हे ट्रेड उपलब्ध आहे.

## विदर्भात पाणीटंचाईचे सावट

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील वाढत्या तापमानासोबतच अमरावती विभागात पाणीटंचाईचे संकट गडद होऊ लागले आहे. विभागातील ग्रामीण भागांत पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून, सद्यस्थितीत २३ गावांची तहान भागवण्यासाठी प्रशासनाला ३४ टैंकर्स सुरू करावे लागले आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तत्काळ पावले उचलत विभागातील १५० विहिरी आणि कूपनलिका (बोअरवेल) अधिग्रहित केल्या आहेत.यात सर्वाधिक बिकट अवस्था अमरावती जिल्ह्याची असून, येथे सध्या सर्वाधिक १९ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने खासगी जलस्रोतांचे अधिग्रहण करण्यास सुरुवात केली आहे. अमरावती जिल्ह्यातील ७ तहसील अंतर्गत येणाऱ्या ४७ गावांमध्ये पाणीटंचाई निवारणासाठी ३० विहिरी आणि २४ कूपनलिका अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

# प्रचंड उष्णतेमुळे जनतेची लाही लाही

## उष्णतेमुळे चक्कर ,उलट्या, ताप रुग्ण वाढले

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तापमानात प्रचंड वाढ झाल्याने अंजनगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात उष्णतेमुळे रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असून ग्रामीण रुग्णालय व खाजगी रुग्णालयात रुग्णांची संख्या दिसून येत असून प्रचंड उष्णतेमुळे जनतेची लाही लाही झाली आहे.अंजनगाव सुर्जी शहरात तापमान ४५ डिग्री सेल्सिअस पर्यंत गेल्याने आणि वातावरणात उष्णतेची लाट असल्याने लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत संपूर्ण जनताच या



उष्णतेमुळे अतिशय त्रस्त झाली आहे. प्रचंड उष्णतेमुळे चक्कर, उलट्या, ताप तसेच उन्हाळी लागणे यासंबंधीच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून काही रुग्ण ग्रामीण रुग्णालयात तर काही खाजगी रुग्णालयात रुग्णांची उपचारासाठी गर्दी दिसून येत आहे. या उष्णतेच्या लाटेचा परिणाम बाजारपेठेवर सुद्धा दिसून येत आहे. ऊन उतरल्यानंतर सायंकाळीच बाजारपेठेमध्ये खरेदीसाठी एकच गर्दी होत आहे. लिंबू शरबत, उसाचा रस, शीतपेय याची मागणी वाढली असून या दुकानदारांकडे लोकांची गर्दी वाढली आहे. प्रचंड उष्णतेमुळे लहान मुलं सुद्धा त्रस्त झाली आहेत. उष्णतेच्या अधिक प्रमाणामुळे कुलर सुद्धा काम करत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी सुद्धा वातावरणामध्ये गरम हवेचे अधिक प्रमाणा असते. या प्रचंड उष्णतेमुळे संपूर्ण जनताच हैराण झाली आहे.

### नागरिकांनी काळजी घ्यावी

उष्णतेचे प्रमाण अधिक वाढल्याने नागरिकांनी दुपारी बारानंतर घराबाहेर पडू नये. भरपूर पाणी पिणे, लिंबू पाणी किंवा घरगुती थंड पेय याचा वापर करावा. हलके , साहिल फिकट रंगाचे सुती कपडे वापरावे. बाहेर पडायचे असल्यास डोक्याला सुती दुपट्टा बांधवा, डोळ्यावर गॉगल वापरावा. चक्कर, मळमळ किंवा प्रचंड घाम आल्यास तातडीने सावलीत जावे, विश्रांती घ्यावी तसेच ताबडतोब रुग्णालयात उपचारासाठी जावे. विनाकारण घराबाहेर पडू नका उष्णतेपासून नागरिकांनी खबरदारी घ्यावी. ग्रामीण रुग्णालयात उष्माघाताबाबत रुग्णांना योग्य ती सेवा देण्यात येणार असून त्याकरिता वैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहे.

**डॉ. मेघा गिऱ्हेपुंजे**
**अधीक्षक ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुर्जी.**

## संक्षिप्त

### डॉ. सपना धीरज केने सन्मानित



**तिवसा -** प्रकाशदीप बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने आयोजित महाकवी वामन दादा कर्डक यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात डॉ. सपना धीरज केने यांना ‘सावित्रीबाई फुले वैद्यकीय सेवा गौरव पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट सेवा, सामाजिक बांधिलकी आणि रुग्णांप्रती असलेली संवेदनशीलता याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात तिवसा तहसीलदार मयूर कडसे, यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. केने यांना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.यावेळी उपस्थित गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे,साहित्यिक इब्राहिम खान,अनिल भटकर, यासह व्यासपीठावर उपस्थित वैद्यकीय क्षेत्रातील पदाधिकारी व मान्यवरांनी डॉ. सपना केने यांच्या कार्याचे कौतुक करत समाजासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे अभिनंदन केले. वैद्यकीय सेवेसोबत सामाजिक जाणीव जपणाऱ्या व्यक्तींमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर डॉ. सपना केने यांनी हा सन्मान आपल्या कार्याला अधिक प्रेरणा देणारा असल्याची भावना या दरम्यान व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे पती युवा स्वाभिमान पक्षाचे उपजिल्हा प्रमुख व सामाजिक कार्यकर्ते धीरज केने, यांनी अभिनंदन केले असून वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

### शिर्डीत धिरज घायवट यांना ‘महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार’ प्रदान



**आसेगाव पूर्णा-** आसेगाव वीज वितरण केंद्र येथे कार्यरत प्रधान तंत्रज्ञ धिरज कृष्णराव घायवट यांना यंदाचा प्रतिष्ठित ‘महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार’ शिर्डी येथे १७ मे २०२६ ला प्रदान करून सन्मानित करण्यात आले. बी दि चेंज फाउंडेशनच्या वतीने आयोजित भव्य सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला.समाजसेवा, प्रामाणिक कार्यपद्धती, कर्तव्यनिष्ठा आणि उल्लेखनीय योगदानाची दखल घेत. घायवट यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. संजीव कुमार (सुभेदार मेजर, सेवानिवृत्त इंडियन आर्मी) तसेच अरुण उत्तमराव भंडारे (कार्याध्यक्ष, त्रिदल सैनिक संघ नाशिक व सैनिक फेडरेशन नाशिक, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते त्यांना मानचिन्ह, सन्मानपत्र व शाल प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना धिरज घायवट यांनी, ‘हा पुरस्कार माझ्या कार्याची पोचपावती असून, यामुळे समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढली आहे. भविष्यातही अधिक जोमाने कार्य करत राहीन,’ असे मनोगत व्यक्त केले.

### विवेक बिंड यांची बिनविरोध निवड

**चांदूर रेल्वे –** चांदूर रेल्वेपासून सुमारे १७ कि.मी. अंतरावर असलेल्या कुऱ्हा येथील शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाची नवीन कार्यकारिणी निवडणूक नुकतीच एकमताने पार पडली. यामध्ये विवेक बबनराव बिंड आणि अमोल रामदास भागवत यांची अनुक्रमे अध्यक्ष व सचिवपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली.वाचनालयाचे एकूण ११२ आजीव सभासद असून सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी कार्यकारिणी निवडीकरिता एकूण ११ अर्ज प्राप्त झाले होते. इतर कोणतेही अर्ज न आल्यामुळे सर्व पदाधिकारी बिनविरोध निवडून आले.

यामध्ये वाचनालयाचे अध्यक्षपदी विवेक बबनराव बिंड, उपाध्यक्षपदी गजानन लक्ष्मनराव बेहरे, सचिवपदी अमोल रामदास भागवत, सहसचिवपदी निलेश रामभाऊ दारोकार, कोषाध्यक्षपदी नितीन रमेशराव नेरकर, सदस्य म्हणून गिरीधर नथुजी रोडगे, किसन महादेवराव इखार, डॉ. सुनील बापूराव आखरे, मनोज माणिकराव दारोकार, सुधीर रामदास पत्रे, संगीता प्रदीपराव पवार यांची वर्णी लागली आहे.नवीन कार्यकारिणीने वाचनालयाचा सर्वांगीण विकास साधत ग्रामीण भागातील विद्यार्थी व अभ्यासकांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. निवडीनंतर कुऱ्हा महोत्सवाचे अध्यक्ष राजू टेकाडे, सल्लागार ज्ञानेश्वर मानमोडे, नितीन धांडे, राम इखार, श्याम इखार व नागराज पटले यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अल्पवयीन मुलगी फूस लावून पळवली

**बेलोरा-** चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या तुळजापूर गडी येथे १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, येथील विजय प्रल्हादराव पारिसे (वय २४) याचे संबंधित अल्पवयीन मुलीसोबत अनेक दिवसांपासून बोलणे सुरू होते. दोघेही एकाच समाजातील असल्याचे सांगितले जात आहे.१५ ते १६ तारखेच्या रात्रीदरम्यान आरोपी विजय याने मुलीला फूस व आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार फिर्यादीने चांदूरबाजार पोलीस स्टेशन येथे दाखल केली आहे.या प्रकरणी ठाणेदार सागर भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पीएसआय शुभांगी ठाकरे व गणेश हागोले करीत आहेत.



**पाऊस पडतो; पण तो टिकत नाही. कधी वाहून जातो, कधी साचून राहतो, पण शेतीपर्यंत पोहोचत नाही. या परिस्थितीत जलसंवर्धन, जलव्यवस्थापन आणि आधुनिक सिंचन पद्धतींचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने १७ व १८ मे २०२६ रोजी नागपुरात 'जलसंवाद' आणि 'जलक्रांती' या दोन राष्ट्रीय परिषदा होत आहेत.**

# जलसंधारणातून ग्रामसमृद्धी!

ही च जलव्यवस्थापनाची मूळ तत्त्वे आहेत. पाणी वाहून जाऊ देण्याऐवजी ते अडवणे, साठवणे आणि जमिनीत मुरवणे, या तीन गोष्टींवर ग्रामीण समृद्धी अवलंबून आहे. धावत्या पाण्याला चालायला लावणे म्हणजे डोंगरावरून वेगाने वाहणाऱ्या पाण्याचा वेग कमी करणे. चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावणे म्हणजे नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण करून पाण्याचा प्रवाह नियंत्रित करणे. थांबणाऱ्या पाण्याला जमिनीत जिरवणे म्हणजे पाणी साठवून ते भूगर्भात झिरपण्यासाठी आवश्यक संरचना निर्माण करणे. याच माध्यमातून 'गावातील पाणी गावात, घरातील पाणी घरात आणि शेतीतील पाणी शेतीत' अडवून गावाला स्वावलंबी बनवणे, हा लोकसहभागाचा मंत्र प्रत्यक्षात उतरवणे शक्य आहे. जे गाव पाण्याचे नियोजन करते, तेच गाव आर्थिकदृष्ट्या सक्षम बनते. माझ्या दृष्टीने या देशात पाण्याचा अभाव नसून, पाण्याच्या नियोजनाचा अभाव आहे. हा अभाव दूर करण्याच्या दृष्टीनेच काही यशस्वी प्रयोग करण्यात आले आणि ते जलसंधारणाच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरले

गेल्या काही दशकांमध्ये हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. कधी मुसळधार पाऊस, तर कधी दीर्घकालीन दुष्काळ. अशा परिस्थितीत पारंपरिक शेती पद्धतींपुढे मोठे आव्हान निर्माण झाले. अशावेळी वैज्ञानिक पद्धतीने जलसंवर्धन करणे अत्यावश्यक ठरते. नदी-नाले पुनरुज्जीवित करणे, गाळ काढणे, लहान बंधारे बांधणे, भूजल पुनर्भरण करणे आणि पाणलोट विकास करणे या उपाययोजना प्रभावी ठरतात. विदर्भात अशाच प्रयत्नांतून काही पथदर्शी उपक्रम उभे राहिले. नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण, पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन आणि भूजल पुनर्भरण यामुळे अनेक गावांमध्ये जलसमृद्धी निर्माण झाली. अशा उपक्रमांमुळे नाले पुन्हा जिवंत झाले, विहिरींमधील पाण्याची पातळी वाढली आणि शेतीला आधार मिळाला. अनेक ठिकाणी हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आणि हजारो कुटुंबांना त्याचा लाभ झाला. सामूहिक प्रयत्न, तांत्रिक नियोजन आणि लोकसहभाग यांच्या जोरावर दुष्काळग्रस्त प्रदेशही समृद्ध होऊ शकतो, हे सिद्ध झाले. विदर्भासारख्या प्रदेशात जिथे शेती हा मुख्य आधार आहे, तिथे पाण्याचा प्रत्येक थेंब सोन्यासारखा मोलाचा आहे. गेल्या अडीच दशकांपासून विदर्भाच्या याच मातीत जलसंधारणाची एक मूक, पण प्रभावी क्रांती घडत आहे. पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेने आपल्या २५ वर्षांच्या प्रवासात 'जलसंवर्धनातून ग्रामसमृद्धी' हा मंत्र खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात उतरवला आहे. स्व. भैय्यासाहेब मुंडले यांच्यासोबत मिळून मी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. विदर्भातील काळ्या कसदार जमिनीत पाऊस तर भरपूर पडतो; पण जमिनीच्या पोतामुळे तो वेगाने वाहून जातो. हे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीच्या पोटात जिरवणे, हाच या संस्थेचा म्हणजेच चळवळीचा मुख्य उद्देश होता. संस्थेच्या तज्ज्ञ टीमने स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून 'तामसवाडा पॅटर्न' विकसित केला. हा केवळ एक प्रकल्प नसून, शास्त्रीय दृष्टिकोन आणि लोकसहभागाचा एक अजोड मिलाफ आहे.


वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील तामसवाडा नाल्यापासून सुरू झालेला हा प्रयोग आज एका वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. जवळपास १२ किलोमीटर लांबीच्या मृत नाल्याला या पॅटर्नमुळे नवसंजीवनी मिळाली. आज या प्रकल्पाचा सकारात्मक परिणाम विदर्भातील ६० हून अधिक गावांमध्ये दिसून येत आहे. यातून १० हजार हेक्टर (२५ हजार एकर) क्षेत्र ओलिताखाली आले. २४ लाख घनमीटर भूपृष्ठीय जलसाठा निर्माण झाला. भूजल पुनर्भरणाच्या माध्यमातून वार्षिक ६० लाख घनमीटर पाणी जमिनीत जिरवणे शक्य झाले. तर १ लाख लोकांना आणि पाच हजार शेतकरी कुटुंबीयांना त्याचा थेट लाभ झाला. बदलत्या हवामानामुळे शेतीसमोर मोठी आव्हाने उभी आहेत. ही आव्हाने पेलण्यासाठी संस्था आता भूगर्भ शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनात अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. 'माथा ते पायथा' या तत्त्वावर काम करताना सूक्ष्म सिंचन आणि ठिबक सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते. यामुळे कमी पाण्यात अधिक उत्पादन घेणे शेतकऱ्यांना शक्य झाले आहे. 'टीम जल ही जीवन'च्या या प्रामाणिक प्रयत्नांची दखल केवळ राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरच नव्हे, तर जागतिक स्तरावरही घेतली गेली. २०२०मध्ये जलसंवर्धन क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट संस्था म्हणून या संस्थेला जागतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निती आयोगानेही 'तामसवाडा पॅटर्न'चे कौतुक करून हा प्रकल्प देशासाठी मार्गदर्शक असल्याचे म्हटले आहे.

गेल्या २५ वर्षांमध्ये पूर्ती सिंचन संस्थेने केवळ नाल्यांचे खोलीकरण केले नाही; तर हजारो शेतकऱ्यांच्या आयुष्यातील समृद्धीचा मार्गही मोकळा केला आहे. जलसंधारणाच्या याच मालिकेतील एक महत्त्वाचा आणि यशस्वी टप्पा म्हणजे 'बुलडाणा पॅटर्न' होय. बुलडाणा जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या या उपक्रमात पाणलोट क्षेत्राचा सखोल अभ्यास करून जलसंधारणाची कामे करण्यात आली. नाले खोल करणे, पाण्याचा वेग कमी करणे, चेकडॅम उभारणे आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे या उपाययोजनांमुळे अनेक कोरड्या भागांमध्ये पाणी उपलब्ध झाले. या पॅटर्नचा सर्वात मोठा फायदा म्हणजे भूजल पातळीतील वाढ. अनेक ठिकाणी कोरड्या विहिरी पुन्हा जिवंत झाल्या. सिंचनाचे क्षेत्र वाढले आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ झाली.

जलसंधारणाच्या या चळवळीत 'पूलवजा बंधारा' ही संकल्पना एक क्रांतिकारक वळण ठरली. नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमेवर पैनगंगा नदीवर चापडसा गावाजवळ बांधण्यात आलेला २२० मीटर लांबीचा पूल याचे जिवंत प्रतीक आहे. रस्ते वाहतुकीसाठी पूल बांधतानाच, त्याच्या खालच्या भागात बंधारा तयार करून एकाच खर्चात दोन मोठी कामे साध्य करण्यात आली. यामुळे शासनाचा जवळपास ४० टक्के खर्च वाचला असून, आजूबाजूच्या ५० गावांमधील १००० एकर जमीन ओलिताखाली आली आहे. तसेच, 'बुलडाणा पॅटर्न'च्या माध्यमातून राष्ट्रीय महामार्गांच्या कामासाठी लागणारे उत्खनन तलावांमधून केल्यामुळे विनामूल्य जलसाठे निर्माण झाले आहेत. यातून रस्तेही दर्जेदार झाले आणि गावेही पाणीदार झाली. अशा प्रकल्पांमुळेच आज खामगाव आणि शेगावसारखे भाग टँकरमुक्त झाले असून, तिथे उन्हाळी पिकांचे क्षेत्र वाढले आहे.महाराष्ट्रात पूर्वी बांधलेले, पण देखभाल-दुरुस्तीअभावी कुचकामी ठरलेले कोल्हापुरी बंधारे पुन्हा जिवंत करण्यासाठी 'आर्च विअर' हे नवीन तंत्रज्ञान समोर आले आहे. यामध्ये पाण्याचा दाब सहन करण्याची क्षमता साध्या भिंतीपेक्षा ३० टक्क्यांनी जास्त असते. जुन्या पिअर्सचा वापर करून कमी खर्चात या बंधाऱ्यांचे पुनर्वसन करणे शक्य झाले आहे. यामुळे ५० ते ६० टक्के खर्च कमी होतो आणि पाण्याचा साठाही वाढतो. तांत्रिक कौशल्य आणि आर्थिक बचतीचा हा संगम विदर्भातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी मैलाचा दगड ठरत आहे. जिगावसारख्या मोठ्या प्रकल्पांना मिळालेली गती आणि साखळी बंधाऱ्यांची निर्मिती यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आता समृद्धीचे स्वप्न तरळू लागले आहे. ही केवळ पाण्याची साठवणूक नसून, मानवी संस्कृती आणि पर्यावरणाचे रक्षण करणारी एक मोठी सामाजिक चळवळ बनली आहे. 'पालखी मार्गाच्या' कामात मला कमालीचे समाधान लाभले. आळंदी आणि देहू ते पंढरपूर या लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेच्या मार्गांचे, म्हणजेच संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांचे काम करताना आम्ही पर्यावरणपूरक दृष्टिकोन ठेवला. या मार्गाच्या भरावासाठी माती काढताना पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांत ठिकठिकाणी ६६ मोठ्या तलावांची म्हणजेच ह्हणअमृत सरोवरांचीहणहण निर्मिती केली.

या उपक्रमामुळे ५१५१ टीसीएम इतका अवाढव्य जलसाठा निर्माण झाला असून, वारीच्या मार्गावरील गावांनादेखील त्यामुळे मोठा फायदा होत आहे. केवळ पालखी मार्गच नव्हे, तर आता समृद्धी महामार्ग आणि इतर नवीन द्रुतगती मार्गांच्या 'इंटरचेंज'मधील रिकाम्या जागांमध्येही आम्ही अशाच प्रकारचे तलाव निर्माण करत आहोत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या इंटरचेंजच्या लूप्समध्ये साठवलेल्या पाण्यामुळे त्या भागातील भूजल पातळी तर वाढेलच, पण तिथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून ही ठिकाणे 'ग्रीन हब' म्हणून विकसित होतील.

# युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेच्या भूमीवरून





**भाग ४**

२० मे २०२६ अमेरिकेतील महिला कॅनडेस लाइंटनर यांनी रचला इतिहास. अमेरिकेत वाहन चालवताना एका महिलेमुळे मद्यपानावर कठोर कायदा अमेरिकेमध्ये सुरवातीस वाहन चालविताना मद्यपान करण्यावर कुठलीस बंदी नव्हती. कॅलिफोर्निया मध्ये वास्तव्यास असलेल्या कॅनडेस लाईटनर यांची १३वर्षाची मुलगी एका मद्य धुंद चालकाच्या अपघातामध्ये मृत्यू झाला.

कॅन्डेस या महिलेने अत्यंत आक्रमक होऊन मद्यपीविरुद्ध आंदोलन करण्यासाठी मदर्स अगेस्ट ड्रंक ड्रायव्हिंग ही संस्था १९८० मध्ये स्थापन केली. लाईटनर यांनी संपूर्ण राष्ट्रात१९८० पासून जवळपास २०वर्षे आंदोलन उभे केले अखेर अमेरिकन सरकारला १९९८ मध्ये ट्रान्सपोर्टेशन इक्विटी अॅक्ट २१हा कायदा पारित करावा लागला. अशाप्रकारे अमेरिकेतील एक महिला कॅनडेसं लायटनर यांनी आंदोलन करून एक महत्त्वपूर्ण कायदा पारित केलाक्ष्महिलेच्या मनात जर आले तर त्या काय करू शकतात? यांचे कानडेस लाइटनर ह्या महिलेचे इतिहासातील एक उदाहरण आहे.

**अशोक कविटकर**
वनाधिकारी (निवृत्त).
रा.अमरावती ह.मू.ऑस्टिन टेक्सास

# पाण्याची बचत : काळाची गरज

रा ज्यातील तापमानाचा पारा जसा वाढत चालला आहे तसा राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहे. मराठवाड्यात अनेक मोठ्या प्रकल्पात पाणी साठा संपत आला आहे. राज्यातील धरण साठ्यातही सरासरी तीस ते चाळीस टक्केच पाणी शिल्लक आहे. फेब्रुवारीमध्ये राज्यातील पाणी साठा ६९ टक्के इतका होता तो आज ३३टक्क्यांवर आला आहे. राज्यभरातील धरणामधला सुमारे ३६ टक्के उपयुक्त साठा कमी झाला आहे त्यामुळे राज्यातील काही शहरांत चार ते पाच दिवसांतून एकदा पाणी सुटत आहे. राज्यातील ४११ गावे आणि ११९४ वाड्या - वस्त्या टँकरवर अवलंबून आहेत. शासनाकडून ४६६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक आहे. अनेक गावांमध्ये विहिरी आणि बोअरवेल आटल्या आहेत त्यामुळे या गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. काही गावात आठ दिवसातून एकदा टँकर येतो तर काही गावात पंधरा दिवसातून एकदा टँकर येतो. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांवर दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज



हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवला असल्याने पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. यावर्षी पावसाचे आगमन वेळेत होईल असाअंदाज वर्तवण्यात आला असला तरी यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहील असाही अंदाज वर्तवण्यात आल्याने दुष्काळाचे संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. अर्थात हे संकट केवळ पावसाच्या कमतरतेमुळे निर्माण झाले असे नाही तर ती नियोजनातील त्रुटी, भूजलाचा अनियंत्रित उपसा, जलस्त्रोतांचे असमान वितरण आणि पाण्याचा अव्यवस्थित वापर या कारणामुळे देखील हे संकट ओढावले आहे. हे संकट आणखी गडद होऊ द्यायचे नसेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन करायला हवे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आजही २४ तास पाणी पुरवठा केला जातो. २४ तास पाण्याची चंगळ असल्याने कदाचित त्यांना पाण्याचे महत्व माहीत नसेल. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील काही बेजबाबदार घटक पुरेसे पाणी मिळाल्यानंतर पाण्याची नासाडी करताना दिसतात. नळ खुले सोडून पाणी वाया घालवीत असतात. या शहरातील अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी होताना दिसते. त्यामुळे या भागातही आवश्यक तितकेच पाणी सोडायला हवे. शहरातीलच नव्हे तर राज्यातील सर्वच नागरिकांनी पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीर्याने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर ही वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# तापमानवाढ आणि अस्वस्थ भविष्य



वा ढत्या जागतिक तापमानाचे परिणाम मानवी आरोग्य, अन्नसुरक्षा, सामाजिक जीवन आणि संपूर्ण जैवसृष्टीवर त्याचे गंभीर परिणाम दिसू लागले आहेत.जागतिक पातळीवर यावर्षी तापमान खूप वाढले आहे. 'ग्लोबल वॉर्मिंग'साठी कारणीभूत असलेल्या अल निनो या समुद्रप्रवाहाचे तापमान दोन अंशाने वाढण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, काँक्रीटचे रस्ते, ओव्हरब्रिजेस, वातानुकूलन आणि इतर यंत्रांद्वारे होणारे उत्सर्जन अशा असंख्य कारणांमुळे उन्हाळा अधिक तीव्र आहे. वाढत्या तापमानाचे परिणाम साऱ्या सजीवसृष्टीवर होत आहेत. हे परिणाम फक्त पर्यावरणीय न राहता सार्वजनिक आरोग्याशी निगडित आहेत.

### आरोग्याशी संबंधित धोके

तीव्र उष्णतेचे किरण शरीरावर त्वरित परिणाम करतात. उष्माघात, निर्जलीकरण अशा शारीरिक स्थिती प्राणघातक ठरू शकतात. उष्णतेचा संपर्क दीर्घकाळ राहिल्यास हृदयविकार, रक्तदाब वाढणे आणि कमी होणे, तसेच मूत्रपिंडांवर ताण वाढू शकतो. उच्च तापमानामुळे शरीरातील द्रवपदार्थ आणि क्षार यांचे संतुलन बिघडते. परिणामी आजारातील गुंतागुंत वाढते.उष्ण आणि आर्द्र हवामानामुळे माश्यांचे प्रजनन वाढते आणि त्या नवीन भौगोलिक प्रदेशात पसरतात. माश्यांपासून उद्भवणाऱ्या आजारांविरुद्ध प्रतिकारक क्षमता त्या ठिकाणी कमी असते. परिणामी मलेरिया, डेंग्यू, झिका आणि लाईमसारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. वाढती उष्णता आणि हवेचे जमिनीच्या पातळीवरील बदलते स्थैर्य यामुळे वातावरणातील ओझोन कमी होतो आणि इतर प्रदूषके वाढतात. हवेच्या खराब गुणवत्तेमुळे अस्थमा, क्रॉनिक ब्रॉन्कायटिस, सीओपीडी व हृदयविकारांचे प्रमाण आणि त्यांची तीव्रता वाढते. उष्णतेच्या लाटा आणि प्रदूषण या दोन्हींमुळे रुग्णालयांमध्ये दाखल व्हावे लागणाऱ्या लोकांची संख्या वाढते. श्वसनविकार तसेच हृदय आणि रक्तवाहिन्यांचे आजार असलेल्या लोकांसाठी सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्ये हवेच्या गुणवत्तेची नित्य माहिती, त्याचे नियंत्रण आणि त्याबाबतची जनजागृती यांचा समावेश आवश्यक आहे.

### अन्न आणि पाण्याची सुरक्षितता

पिकांचे वाढीचे चक्र, मातीची आर्द्रता आणि कीटकजन्य रोगांमुळे शेतीचे उत्पन्न कमी होते आणि अन्नधान्याची गुणवत्ता घटते. पाण्याच्या उपलब्धतेतील घट किंवा दूषित पाण्याचा प्रसार वाढल्याने पिण्याच्या शुद्ध पाण्याची उपलब्धता कमी होते. त्यामुळे कुपोषण, बालकांमध्ये शारीरिक वाढ खुंटणे असे परिणाम वाढतात. आफ्रिका आणि आशियातील संवेदनशील प्रदेशांमध्ये हे दिसून येते.समुद्रपातळीची वाढ, किनारपट्टी मागे हटणे आणि पर्यावरणीय प्रकोपामुळे लोकांना स्थलांतर करावे लागते. परिणामी त्यांच्या उपजीविकेची साधने नष्ट होतात, सामाजिक संबंध तुटतात आणि शहरी तसेच ग्रामीण पायाभूत सुविधांवरचा ताण वाढतो.

संवेदनशील गटांवरील परिणाम - वृद्ध आणि शिशू : शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची क्षमता कमी असल्याने लहान मुले आणि वृद्ध व्यक्ती उष्णतेच्या ताणाला अतिशय संवेदनशील असतात. त्यांना त्वरित थंड वातावरण, अधिक प्रमाणात द्रवपदार्थ आणि वैद्यकीय मदत आवश्यक असते.किनारपट्टी : समुद्रपातळीतील वाढ आणि किनारे मागे हटल्यामुळे समुद्र किनारी असलेल्या लोकांच्या घरांची आणि शेतीची हानी होते. दीर्घकालीन स्थलांतर आणि आर्थिक नुकसान संभवते.शेत कामगार : शेतांवर आणि उघड्यावर कामे करणाऱ्या कामगारांमध्ये उष्णतेच्या थेट संपर्कामुळे कामाची क्षमता कमी होते.

वनस्पती सृष्टी -वाढते तापमान आणि पर्जन्यातील अनियमिततेमुळे पिकांच्या वाढीचे चक्र, मोहोर किंवा फूल येण्याच्या वेळा आणि परागीभवनाच्या प्रक्रियेत बदल होतात. त्यामुळे कृषी उत्पादनात अनिश्चितता आणि उत्पन्नात घट येते. काही प्रजाती उष्णतेला अनुकूल होऊन वाढतात, तर इतर संवेदनशील प्रजाती नष्ट होतात. त्याचा जैवविविधतेवर परिणाम होतो. मातीची आर्द्रता कमी होणे आणि कीटकजन्य रोगांची वाढ, शेतीसाठी आणि नैसर्गिक वनस्पतींसाठी त्रासदायक ठरते. वनस्पतींच्या बदलत्या पॅटर्नमुळे अन्नसाखळी, जलचक्र आणि कार्बन शोषणाच्या प्रक्रियांवर दीर्घकालीन परिणाम दिसतात.

तापमानवाढीत हस्तक्षेप न केल्यास २०३० च्या दशकापर्यंत कुपोषण, मलेरिया आणि उष्णतेमुळे दरवर्षी होणारे मृत्यू वाढतील. ते कमी करण्यासाठी हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यासाठी जलद आणि विस्तृत प्रमाणावर पावले उचलणे, सार्वजनिक आरोग्य प्रणाली मजबूत करणे, संदेश आणि धोक्याच्या सूचना देणारी प्रणाली, शहरी नियोजन, पाणीसाठा आणि अन्नसुरक्षा कार्यक्रम वाढवणे गरजेचे ठरते. त्यासाठी जनता, सरकार, आरोग्यसंस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये समन्वय आवश्यक आहे. थोडक्यात, उष्णतेच्या वाढीचे परिणाम बहुआयामी आणि परस्परसंलग्न आहेत. त्यात वैयक्तिक आरोग्यापासून सामाजिक आणि आर्थिक संरचनांपर्यंत अनेक गोष्टींचा समावेश होतो. त्वरित आणि समन्वयित कृती न आचरल्यास या परिणामांचे प्रमाण आणि तीव्रता वाढत राहील.

स्थानिक पातळीवरील जागृती वाढवणे आणि जागतिक पातळीवर उत्सर्जन कमी करणे या दोन्ही गोष्टी एकत्र आल्यास भविष्यातील धोके कमी होऊ शकतील.सामाजिक परिणाम उष्णतावाढीमुळे लोकांच्या दैनंदिन सामाजिक व्यवहारात आणि समुदायातील परस्परसंवादात मोठे बदल दिसून येतात. सार्वजनिक कार्यक्रम, उत्सव, लग्न, समारंभ त्याचप्रमाणे बाजारपेठा कमी प्रमाणात किंवा वेगळ्या स्वरूपात आयोजित कराव्या लागतात. त्यामुळे स्थानिक संस्कृती आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होतो.

स्थलांतर आणि आर्थिक नुकसानीमुळे कुटुंबे विखुरली जातात, सामाजिक पाठबळ कमी होते आणि एकाकीपणा व मानसिक ताण वाढतो. शहरी भागात थंड जागांची कमतरता आणि सार्वजनिक शीतलता केंद्रांची अनुपलब्धता सामाजिक असमानता वाढवते. यामुळे गरीब आणि संवेदनशील गट अधिक वेदनादायी ठरतात.तापमानवाढीत हस्तक्षेप न केल्यास २०३० च्या दशकापर्यंत कुपोषण, मलेरिया आणि उष्णतेमुळे दरवर्षी होणारे मृत्यू वाढतील. ते कमी करण्यासाठी हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यासाठी जलद आणि विस्तृत प्रमाणावर पावले उचलणे, सार्वजनिक आरोग्य प्रणाली मजबूत करणे, संदेश आणि धोक्याच्या सूचना देणारी प्रणाली, शहरी नियोजन, पाणीसाठा आणि अन्नसुरक्षा कार्यक्रम वाढवणे गरजेचे ठरते. त्यासाठी जनता, सरकार, आरोग्यसंस्था आणि आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये समन्वय आवश्यक आहे.

थोडक्यात, उष्णतेच्या वाढीचे परिणाम बहुआयामी आणि परस्परसंलग्न आहेत. त्यात वैयक्तिक आरोग्यापासून सामाजिक आणि आर्थिक संरचनांपर्यंत अनेक गोष्टींचा समावेश होतो. त्वरित आणि समन्वयित कृती न आचरल्यास या परिणामांचे प्रमाण आणि तीव्रता वाढत राहील. स्थानिक पातळीवरील जागृती वाढवणे आणि जागतिक पातळीवर उत्सर्जन कमी करणे या दोन्ही गोष्टी एकत्र आल्यास भविष्यातील धोके कमी होऊ शकतील.

**डॉ. अविनाश भोंडवे**

# मुर्तिजापूरात शेतकऱ्यांचा महाप्रचंड ट्रॅक्टर मोर्चा ; विविध मागण्यांसाठी तहसीलवर धडक

## हजारो शेतकरी ट्रॅक्टर, बैलबंड्यांसह रस्त्यावर

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी शुक्रवारी मुर्तिजापूर शहरात ऐतिहासिक ट्रॅक्टर महामोर्चा काढण्यात आला. हजारो शेतकरी ट्रॅक्टर, बैलबंड्या आणि संघटनांचे झेंडे घेऊन रस्त्यावर उतरल्याने शहर परिसर घोषणांनी दणाणून गेला होता. दुपारी १२ वाजताच्या सुमारास निघालेला मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी प्रशासनाला विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.




'किसान तू रहेगा मौन, तो तेरी सुनेगा कौन' अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. तालुक्यातील विविध शेतकरी संघटना, भारतीय किसान संघ, किसान काँग्रेससह अनेक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. पारंपरिक बैलबंड्यांचाही मोर्चात सहभाग असल्याने आंदोलनाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

**पीक विमा, कर्जमाफीसाठी आक्रमक भूमिका**

मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी अपुरा मिळालेला पीक विमा तात्काळ पूर्ण स्वरूपात देण्याची मागणी केली. तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, खरीप हंगामापूर्वी ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी वितरित करावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

दरम्यान, आमदार हरीश पिंपळे यांनी सायंकाळी मध्यस्थी करत सोमवारी, १८ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांसोबत शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिल्यानंतर मोर्चाची सांगता करण्यात आली. मोर्चामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले होते. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**तीन मार्गांनी निघाले मोर्चे**

नियोजनानुसार उड्डाणपूल परिसर, दर्यापूर रोड टी-पॉईंट आणि अकोला रोड रेस्ट हाऊस परिसरातून स्वतंत्र मोर्चे काढण्यात आले. हे तिन्ही मोर्चे जळमकर चौकात एकत्र आले. त्यानंतर हजारोंच्या जनसमुदायासह तहसील कार्यालयाकडे मोर्चाने कूच केली.

**प्रशासनाला दिला इशारा**

तहसील कार्यालयासमोर झालेल्या सभेत शेतकरी नेत्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. 'शेतकरी या देशाचे नागरिक नाहीत का?' असा सवाल उपस्थित करत मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. जनमंच, आंतरभारती, स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि प्रगती शेतकरी मंडळाच्या वतीने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## ...थोडक्यात...

### बाल कीर्तनकार महोत्सवात बालकांचा सहभाग



**अकोला :** अखिल भारतीय कीर्तन संस्थेच्या वतीने मुंबई येथे नुकत्याच संपन्न झालेल्या बाल कीर्तनकार महोत्सवात महानगरातील चार बाल कीर्तनकारांनी सहभाग घेत उत्कृष्ट कीर्तने सादर करीत मुंबईकरांची मने जिंकलीत.अ.भा. कीर्तन संस्थेचे अध्यक्ष माधव खरे यांच्या मार्गदर्शनात मुंबईच्या दादर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहात आयोजित या महोत्सवात नागपूर, पुणे, मुंबई, नेरळ समवेत अनेक जिल्ह्यातील बाल कीर्तनकारांनी सहभाग घेत कीर्तन सादर केले. यात स्थानिक आदर्श गोसेवा किर्तन कुल येथील डॉ अभय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात संगीत अलंकारचे प्रशिक्षण घेणारे बाल विद्यार्थी दीप मंगेश कडू, स्मरण यशवंत देशपांडे, कु आराध्या प्रफुल लक्रस, स्वरांगी परेश व्हरसाळे आदींनी सहभाग घेतला.

### माहेश्वरी वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या इन्फ्लुएंजा लसीकरण शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** समाजकार्य क्षेत्रात सक्रिय असणाऱ्या माहेश्वरी वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या वतीने माहेश्वरी भवनात समाजातील वरिष्ठ सदस्यांसाठी आयोजित चौथ्या इन्फ्लुएंजा लसीकरण शिबीरास समाजातील वरिष्ट नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरात एकूण ४५ सदस्यांनी सहभाग नोंदवला. प्रकोष्ठाचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेत व डॉ. अनूप कोठारी यांच्या मार्गदर्शनात संपन्न या लसीकरण शिबिराचे उदघाटक डॉ. संतोष सोमानी व मंचावर प्रकोष्ठचे मार्गदर्शक भगवानदास तोष्णीवाल व उपाध्यक्ष प्रवीण मोहता उपस्थित होते. दीपप्रज्वलन व अतिथी सन्मानाने या शिबिराचा प्रारंभ झाला. शिबिरात प्रकोष्ठचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी यांनी लसीकरण शिबीराबाबत सविस्तर माहिती दिली.

प्रास्तविक उपाध्यक्ष प्रवीण मोहता यांनी केले. शिबिराचे मार्गदर्शक डॉ.अनूप कोठारी यांनी या महत्त्वाच्या लसीकरण शिबीराबाबत माहिती दिली. उदघाटक डॉ. संतोष सोमानी यांनी आरोग्याबद्दल जागरूक राहण्यासाठी काय करावे याबद्दल मार्गदर्शन केले.

## जाहीर सुचना

ज्याअर्थी सर्वत्र लोकांना या जाहीर सुचनेद्वारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. वृषम मनोज तिवारी, रा. डाबकी रोड, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला यांनी श्री गजानन किसनराव वेले, रा. भारती प्लॉट, बाळापुर नाका रोड, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला हयांच्या नोंदणीकृत खरेदीखत दिनांक १८/०२/१९९९ रोजीचे दस्त कमांक ८३९ / १९९ नुसार मालकी व प्रत्यक्ष ताब्यातील खालील वर्णनाच्या मालमत्तेचा सौदा कायम केला आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :** मौजे अकोला, प्र.ता.जि. र.स.डी. र.डी. जि.प. पं.स. अकोला जि. अकोला, महानगर पालिका, अकोला चे हद्दीतील भारती प्लॉट', बाळापुर नाका, जुने शहर, या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील जुना शेत सर्व्हे नं. २०/२ व सद्याचा नझुल शिट नं. १० मधील नझुल प्लॉट नं. ३/१/३ ज्याचे खरेदीनुसार एकुण क्षेत्रफळ ३७.६३ चौ. मिटर (४०५.०० चौ. फुट) (मालमत्ता पत्रक नोंदीनुसार ३७.६० चौ. मिटर) असुन त्याचे मोजमाप :-

नझुल प्लॉट नं. ३/१/३ चे मोजमाप :- पुर्व बाजु :- ९.१४ मिटर (३० फुट). पश्चिम बाजु :- ९:१४ मिटर (३० फुट) उत्तर बाजु :- ४.११ मिटर (१३.३० फुट) दक्षिण बाजु :- ४.११ मिटर (१३.३० फुट) एकुण क्षेत्रफळ :- ३७.६३ चौ. मिटर (४०५.०० चौ.फुट) (मालमत्ता पत्रक नोंदीनुसार ३७.६० मौ. मिटर) नझुल प्लॉट नं. ३/१/३ च्या चतुः सिमा :- पुर्वेस -यातील उर्वरीत जागा, पश्चिमेस -रूख्मीनाबाई वेले यांचे घर, उत्तरेस -१०.०० फुट रुंदीची सर्विस लाईन दक्षिणेस - २०.०० फुट रुंदीचा रोड.

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या नझुल प्लॉट नं. ३/१/३ वर नगर रचनाकार, नगर रचना विभाग, महानगरपालीका, अकोला यांचा बांधकाम परवानगी प्रकरण क्र. १४-क / २२० / २००१-२००१ दिनांक २२/११/२००६ नुसार घर बांधाकामाची परवानगी घेऊन बांधण्यात आलेले घर ज्याचे बांधकाम लोडवेअरींग पध्दतीने केले आहे. ज्याचे वर्णन :- ज्याचा तळमजला व पहिला मजला मिळून एकुण सुपरबिल्टअप बांधकाम क्षेत्रफळ ६७.५६ चौ. मिटर (७२६.९४ चौ. फुट) असुन, यामध्ये तळमजल्यावर १ ड्रॉईंग हॉल, १ किचन, १ बेडरूम, संडास बाथरूम, युटिलीटी एरिया आणि तसेच पहिल्या मजल्यावर बेडरूम, संडास बाथरूम, युटिलीटी एरियाव ओपन टेरेस असे बांधकाम असून, सदर घरजागेच्या छताच्या पुर्ण मालकी हक्कसहए इले. मिटर-फिटींग, खिडक्या दरवाजे व इतर सर्व तदंगभुत सर्व वस्तुसह घर व जागा.

त्याअर्थी वरील वर्णनाच्या मालमत्ते संबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, मालकी, ताबा, हितसंबंध, गहाण, वारसाहक्क, तसेच इतर कोणत्याही प्रकारची तकार असल्यास ही सूचना प्रसीध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्या सह लेखी हरकत नोंदवावी. जर मुदतीत हरकत नोंदवीली नाही, तर आमचे पक्षकार वरील वर्णनाच्या मालमत्तेची ठरल्यानुसार खरेदीखत नोंदणीकृत करुन घेतील, त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, उजर चालनार नाही. याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. १७-०५-२०२६

**Adv. Rajesh R. Karale**
B.Com, LL.B.
Regd. No. MAH/2561/2000 Indira Colony, Dabki Road, AKOLA (M) 9850314838, 7588962738

## जाहिर हर्रास नोटीस

सर्व गावकरी यांना जाहिरपणे कळविण्यात येते की, श्री कन्हैयालाल ट्रस्ट, अकोला र. नं. अ-१२२ या संस्थानची शेतजमिन जाहिर हर्रासची कार्यवाही करणेबाबत मा. स.ध. आ. - १, अकोला यांचेदिनांक ०५/०५/२०२६ रोजीचे आदेशाच्या अनुषंगाने खालील शेतजमिन -

| मौजे | गट नं. | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| सांगळूद बु. | २९७ | ५ हेक्टर ५५ आर | |

सन २०२६–२७ करीता दि. १९/०५/२०२६ रोजी ग्राम पंचायत, सांगळूद बु. कार्यालयात सकाळी ९.०० वाजता जाहिर हर्रास घेवून लागवणीने दयावयाची आहे. करीता जाहिर हर्रासचे आयोजन करण्यात आले आहे. तरी इच्छुक गावकऱ्यांनी आयोजनामध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे.

**अटी व शर्ती :-**

१. जाहिर हर्रासमध्ये संस्थानची जमिन लागवणीने करण्याकरीता बोली बोलण्याकरीता प्रथम ५,०००/- अमानत रक्कम हर्रासीच्या दिवशी निरीक्षक यांच्याकडे जमा करावी लागेल. अमानत रक्कम जमा केल्याशिवाय जाहिर हर्रास मध्ये बोली बोलता येणार नाही याची नोंद घ्यावी.

२. हर्रासमध्ये संस्थानची जमिन लागवणीने करण्याकरीता सर्वोच्च बोली बोलणाऱ्या व्यक्तीस हर्रासच्या दिवशी २५ टक्के रक्कम जमा करावी लागेल व उर्वरित रक्कम १० दिवसांमध्ये निरीक्षक अथवा संस्थानच्या बँक खात्यात भरणे बंधनकारक राहील.

३. सर्वोच्च बोली बोलणा-या व्यक्तीस संस्थानची शेतजमिन सन २०२६-२०२७ (एक) खरीप व रब्बी हंगामी वर्षाकरीता लागवणीने देण्यात येईल,

४. सर्वोच्च बोली बोलणा-या लागवणदाराने उर्वरित रक्कम वेळेत न भरल्यास अमानत रक्कम संस्थानला पचेल. व सदर जमिनीचा पुन्हा जाहिर हर्रास घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. एक वर्ष संपल्यानंतर सदर शेतजमिनीचा ताबा काळयामातीस संस्थानकडे राहील. ६. जाहिर हर्रासमध्ये लगवणीची रक्कम कमी आल्यास सदर जमिनीचा हर्रास रद्द करण्याचा सर्व अधिकार निरीक्षक यांच्याकडे राखीव राहील.

दिनांक : १३/०५/२०२६

**( आर. एम. गुल्हाने )**
निरीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा युवक काँग्रेसतर्फे सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोर यांच्या मार्गदर्शनाखाली पारस व हातरुन येथे दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेश महासचिव अभिलाष प्रकाश तायडे यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन अभिलाष तायडे यांनी केले. तसेच शिक्षणाच्या माध्यमातून युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजाच्या प्रगतीत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

**प्रदेश महासचिव अभिलाष तायडे यांचा पुढाकार**

कार्यक्रमास बाळापूर विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष स्वप्नील पाठक, राहुल राऊत, आशिक भाई जान, युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते, विद्यार्थ्यांचे पालक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जमाफीवरून किसान काँग्रेसचा सरकारवर हल्लाबोल

### एक तरी लाभार्थी दाखवा; सरकारला बक्षीस देऊ

■ प्रतिनिधी | अकोट ■

राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा करून शेतकऱ्यांची दिशाभूल केली असून, अद्याप एकाही शेतकऱ्याला प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही, असा गंभीर आरोप अकोला जिल्हा किसान काँग्रेसने केला आहे. 'संपूर्ण महाराष्ट्रात कर्जमाफीचा एक तरी लाभार्थी दाखवा आणि बक्षीस मिळवा,' असे खुले आव्हान किसान काँग्रेसने सरकारला दिले.



अकोट येथे आयोजित पत्रकार परिषदेत किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवी पाटील अरबट यांनी केंद्र व राज्य सरकारच्या कृषी धोरणांवर जोरदार टीका केली. खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकरी नव्या पीककर्जापासून वंचित राहत असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जमाफीचे निकष अद्याप स्पष्ट नसल्यामुळे शेतकरी व बँक प्रशासनात संभ्रम निर्माण झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

बी-बियाणे, खते, कीटकनाशके व इतर कृषी निविष्ठांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, शेतमालाला अपेक्षित हमीभाव मिळत नसल्याने शेती व्यवसाय तोट्यात गेला असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांची लूट सुरू असल्याचाही आरोप यावेळी करण्यात आला. एल-निनोच्या पार्श्वभूमीवर पुढील १२ महिने गंभीर ठरणार असल्याचे सांगत पाणीटंचाई, चाऱ्याची कमतरता व संभाव्य दुष्काळाचा धोका निर्माण झाल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. मात्र, सरकारकडून कोणतीही ठोस उपाययोजना दिसून येत नसल्याची टीका किसान काँग्रेसने केली.

'येत्या काळात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढल्यास त्याला सरकार जबाबदार राहील,' असा इशाराही पत्रकार परिषदेत देण्यात आला. संपूर्ण कर्जमाफी, व्याजमाफी, तातडीने पीककर्ज वितरण, शेतीमालाला कायदेशीर हमीभाव आणि दुष्काळी उपाययोजना त्वरित राबविण्याची मागणी यावेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेला अनोक राहणे, सारंग मालानी, प्रमोद चोरे, बाळासाहेब बोंद्रे, महेश गणगणे, प्रशांत गावंडे, संजय आठवले यांच्यासह किसान काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बाल सुसंस्कार शिबिर हि काळाची गरज'- हभप विठ्ठल महाराज

**नि:शुल्क बाल सुसंस्कार शिबीरात विद्यार्थ्यांचा होत आहे सर्वांगीण विकास**

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

आधुनिक काळाचा विचार करता देव देश धर्म संस्कृती व साधुसंताच्या विचाराकडे दुर्लक्ष करुन तरुण पिढी दुर्व्यसनात्त्या आहारी जाऊन आपल आयुष्य मातीमोल करत आहेत कारण संस्काराचा अभाव आपल्या जीवनाच ध्येय लक्षात घेऊन आपल्या मुलांच भविष्य सुख समृद्धी आनंदात जावे या करिता प्रत्येक आईवडीलांच कर्तव्य आहे की मुलांना योग्य वयामध्ये योग्य संस्कार मिळणे अत्यंत गरजेचे आहे या उद्देशाने उन्हाळ्याच्या सुट्टि मध्ये बाल सुसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्वभाविकांनी या विश्वमानव कल्यानात्त्या महायज्ञामध्ये तन मन धनाने सहकार्य करावे असे आवाहन शिबिराचे आयोजक श्री.ह.भ.प.विठ्ठल महाराज तेल्हारकर यांनी केले आहे.



जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज सर्वांगीण विकास बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन हिवरखेड येथील सरकारी दवाखान्यामागील जि. प. प्राथमिक शाळेत दि १ मे ते २० मे २०२६ पर्यंत सुरु आहे. शिबिराचे आयोजन श्री.ह.भ.प. विठ्ठल महाराज तेल्हारकर यांनी केले आहे. शिबिरात प्रामुख्याने देवभक्ती, देशभक्ती, धर्मभक्ती, मातृ-पितृभक्ती, शास्त्रशुध्द सुसंस्कार, कीर्तन, प्राणायाम, योगासने, प्रवचन, भजन, गायन , वादन , मृदंग, टाळ, श्रीमद् भगवद् गिता १५ वा अध्याय व निवडक श्लोक या विषयांचे धडे विद्यार्थ्यांना मिळत आहेत.

## वहाळा बु. येथे घरफोडी; सोन्या-चांदीसह रोख ऐवज लंपास

**मजूर कुटुंबावर चोरट्यांचा डल्ला; चान्नी पोलिसांकडून तपास सुरू**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशन हद्दीतील वहाळा बु. येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे एक ते दीड लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवारी पहाटे उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगेश जगदेव सौंदळे हे शनिवारी रात्री घराच्या स्लॅबवर झोपले होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाट उघडून त्यामधील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरून नेली. सौंदळे हे मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही दिवसांपूर्वी त्यांना घरकुल योजनेचा हप्ता मिळाला होता. त्यासाठी बँकेतून काढलेले सुमारे ७० हजार रुपये तसेच मजुरीतून साठवलेली रक्कम त्यांनी घरात ठेवली होती. चोरट्यांनी याच रकमेवर डल्ला मारल्याने कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे. विशेष म्हणजे, चोरट्यांनी घराबाहेरील लाईट बंद करून शेजारी राहणाऱ्या भावाच्या घरालाही बाहेरून कुंडी लावली होती. त्यामुळे चोरीची घटना घडत असताना कोणालाही संशय आला नाही. घटनेची माहिती मिळताच चान्नी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. सौंदळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



## घुसर येथे खंजेरी भजन, शिवकालीन पोवाड्यांनी रंगली सांस्कृतिक मैफल

### उद्धवसेनेचे आयोजन; अकोला, अमरावती, बुलढाणा जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त घुसर येथे आयोजित खंजेरी भजन व शिवकालीन पोवाडा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाला सुरुवात झाली. विदर्भातील विविध जिल्ह्यांतील भजनी मंडळांनी सादर केलेल्या भजनांनी आणि शिवकालीन पोवाड्यांनी उपस्थितांची मने जिंकली.



दि. १६ ते १८ मेदरम्यान आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांच्या हस्ते वंदनीय बाळासाहेब ठाकरे, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व ऋषी घुसरकर महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अस्थीस्मारकास अभिवादन करण्यात आले. गावकऱ्यांनी पाहुण्यांचे टाळ-मृदंगाच्या गजरात स्वागत करत व्यासपीठापर्यंत जल्लोषात मिरवणूक काढली. यावेळी मेहकर येथील आमदार सिद्धार्थ खरात, दर्यापूर येथील आमदार गजानन लवटे, माजी आ. गजानन दाळू गुरुजी, संजय गावंडे, सहसंपर्कप्रमुख सेवकराम ताथोड, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, मुकेश मुरूमकर, उपजिल्हाप्रमुख योगेश्वर वानखडे, संजय शेळके, दिलीप बोचे, अतुल पवनिकर, सुरेंद्र विसपुते, उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक शंकरराव लंगोटे, जिल्हासंघटक भूषण भिरड, अकोला तालुका प्रमुख ज्ञानेश्वर गावंडे, संजय भांबेरे, ज्ञानेश्वर म्हैसने, अवि गावंडे, गजानन मानतकर, सौरभ वाघोडे, शहरप्रमुख राहुल कराळे (अकोला पूर्व), शहरप्रमुख आशिष गावंडे (अकोला पश्चिम) मनपा गटनेता विजय इंगळे, युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अभय खुमकर, जगन निचळ, गोपाल भटकर, गजानन पुंडकर, विकी इंगळे, दीपक पाटील, अशोक इंगळे, शिवाजीराव म्हैसने, गंगाधर पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास पागृत यांनी केले, तर स्पर्धेचे संचालन शरद बुंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. परीक्षक म्हणून प्रा. विनोद खडसे, छत्रपतीदादा मळसणे आणि ह.भ.प. विठ्ठल महाराज हातोलकर यांनी जबाबदारी पार पाडली.

**सामुदायिक प्रार्थनेने सुरुवात**

स्पर्धेची सुरुवात सामुदायिक प्रार्थनेने झाली. गुरुदेव सेवा मंडळाचे सेवाधिकारी भानुदासजी कराळे, गणेशराव बेले व त्यांच्या संचाने भजन सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. अकोला, अमरावती, वाशीम, बुलढाणा आणि यवतमाळ जिल्ह्यातील महिला व खंजेरी भजन मंडळांनी स्पर्धेत सहभाग घेतला. पहिल्या दिवशी १२ भजनी मंडळांना लॉट्सद्वारे गायनाची संधी देण्यात आली.

# चिखलदऱ्यात रंगली श्री हव्याप्र मंडळाची राष्ट्रीय योगासन स्पर्धा

## -देशभरातील १०४ स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग : योग, शिस्त आणि क्रीडासंस्कारांचा संगम

**अमरावती/ प्रतिनिधी:** शरीर आणि मन यांचा समतोल साधत निरोगी जीवनाचा संदेश देणाऱ्या योगासन क्रीडेला राष्ट्रीय स्तरावर नवे व्यासपीठ मिळाले असून, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती यांच्या वतीने फिजिक्स फेडरेशन ऑफ इंडिया व बृहन्महाराष्ट्र योग परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय योगासन स्पर्धा २०२६ उत्साहात पार पडली. चिखलदऱ्यातील योग केंद्र, अप्पर प्लेटो येथे झालेल्या या स्पर्धेमुळे परिसरात क्रीडामय आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

स्पर्धेचे उद्घाटन १६ मे रोजी सकाळी १० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय योगगुरू तथा माजी प्राचार्य प्रा. डॉ. अरुण खोडसकर उपस्थित होते. उद्घाटक म्हणून महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशनचे टेक्निकल डायरेक्टर प्रा. सतीश मोहगावकर, श्री हव्याप्र मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, स्पर्धा संचालक प्रा. डॉ. विशाल खोडसकर तसेच ज्येष्ठ समाजसेवक अशरफ भाई उपस्थित होते. सकाळी ९ वाजता परीक्षक व पालकांची बैठक पार पडली. त्यानंतर उद्घाटन समारंभास प्रारंभ झाला.





यानंतर महर्षी पतंजली हॉल व स्वामी कूवल्यानंद सभागृह येथे विविध वयोगटांतील योगासन स्पर्धा रंगल्या. ८ ते १५, १५ ते २२, २२ ते ३०, ३० ते ४०, ४० ते ५५ आणि ५५ वर्षांवरील महिला व पुरुष गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये एकूण १०४ स्पर्धकांनी सहभाग घेतला. तामिळनाडू, आंध्रप्रदेश, दिल्ली, उत्तराखंड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्रासह विविध राज्यांतील खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. योगासन ही केवळ स्पर्धा नसून ती शरीराची लवचिकता, मानसिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि शिस्त वाढवणारी जीवनपद्धती असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात युवकांनी क्रीडा व योगाला प्राधान्य देणे गरजेचे असून, अशा स्पर्धांमुळे राष्ट्रीय एकात्मता आणि आरोग्यदायी जीवनशैलीला चालना मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी योगशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनील लाबडे , प्रा. नितीन काळे, प्रा. प्रवीण आनासाने, प्रा. डॉ. विशाल खोडसकर, प्रा. प्रतीक पाथरे, प्रा. अर्चना देशपांडे, प्रा. प्रणय पवार, प्रा. संपदा आगरकर, प्रा. सुषमा शिरभाते, प्रा. प्रतीक कलम्बे, प्रा. आँचल राहते, प्रा. सुकन्या देशमुख, प्रा. संदीप मांदळे आणि प्रा. वैष्णवी जाधव यांनी मोलाचे योगदान दिले.

# तिवसा येथे अनिवासी सुसंकार शिबिराचे उदघाटन संपन्न

**तिवसा/ प्रतिनिधी—** ग्राम जयंती महोत्सवानिमित्त वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या संकल्पनेनुसार अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज आश्रम यांच्या केंद्रीय प्रचार विभागाच्या मार्गदर्शनाखाली तिवसा तालुका प्रचार विभागाअंतर्गत माणिक बाबा श्री. गुरुदेव मंडळ त्रिमूर्ती नगर तिवसा येथे सर्वांगीण सुसंस्कार शिबीर हनुमान मंदिर, अप्पर वर्धा कॉलनी तिवसा येथे दिनांक १६ मे ते २३ मे २०२६ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

शिबिराचे उदघाटन १६ मे रोजी निळकंठ हळदे महाराज आजीवन प्रचारक यांचे हस्ते झाले, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ग्रामगीताचार्य प्रमोद झगेकर तिवसा तालुका सेवाधिकारी हे उपस्थित होते तर प्रमुख पाहूणे गणेश घाटोळ जिल्हा प्रचार सचिव, योगेश वानखडे माजी नगराध्यक्ष, मुकुंद पुनसे माजी सरपंच, योगा प्रशिक्षक रामभाऊ टेकाडे, लाठीकाठी प्रशिक्षक उत्तम केने, शिबीर प्रमुख प्रमोद वाट हे उपस्थित होते.

शिबिरात दैनंदिन ग्रामसफाई, भजनी मिरवणूक, सामुदायिक ध्यान,सामुदायिक प्रार्थना यावर वेगवेगळ्या मान्यवरांचे चिंतन, प्राणायाम, योग, मैदानी खेळ, संगीत, ग्रामगीता व भागवदगीताचे वाचन व पाठांतर घेतले जाणार असून यासाठी वेगवेगळ्या विषयात पारंगत असणाऱ्या प्रशिक्षकांना निमंत्रित केले आहे.





सामुदायिक ध्यानावर गणेश घाटोळ यांनी तर सामुदायिक प्रार्थनेवर प्रमोद झगेकर यांनी चिंतन व्यक्त केले. या उपक्रमामुळे मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो व मुलांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होत असून धार्मिक व सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होत असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी तिवसा शहरातील १० ते १८ वर्षातील जास्तीतजास्त मुलामुलींनी ह्या शिबिरात सहभागी होऊन शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन शिबीर प्रमुख प्रमोद वाट यांनी केले आहे.

# नाविन्यपूर्ण पर्जन्य जलसंचयन कार्यशाळेत जलसंधारण, आधुनिक सिंचन व अल निनो संकटावर मार्गदर्शन

## -कृषी विज्ञान केंद्र घातखेड द्वारे शेतकऱ्यांना सरी-वरंबा पद्धत, संतुलित खत व्यवस्थापन आणि जैविक शेतीचा सल्ला



**अमरावती :** बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची गरज अधोरेखित करत दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर च्या ग्रामीण विकास शाखा व आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पथ्रोट ता. अचलपूर येथे नाविन्यपूर्ण पर्जन्य जलसंचयन प्रणाली या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स, नागपूर स्थानिक केंद्राचे अध्यक्ष डॉ. संदीप शिरखेडकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून कृषि विज्ञान केंद्र घातखेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. अतुल कळसकर, आर्ट ऑफ लिव्हिंग नागपूर चे नरेंद्र अंगल, अशोक तिथिले, महावितरण अचलपूरचे कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, समाजसेवक आनंद संगई, अतुल वाठ, दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य आनंद जवंजाळ, मंगेश सागोले तसेच हरणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अतुल कळसकर यांनी बदलत्या हवामानामुळे शेतीसमोरील वाढत्या आव्हानांकडे लक्ष वेधले. चालू वर्षात अल निनो परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा तसेच पेरणीवेळी सरी-वरंबा पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी पुढे सांगितले की, कृषि विज्ञान केंद्रामार्फत मृद व जल परीक्षण, जैविक निविष्ठा, तसेच सघन व अतिघन कपाशी लागवड तंत्रज्ञान उपलब्ध असून शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा. पिकांच्या अवशेषांचा पुनर्वापर करून गांडूळ खत व कंपोस्ट निर्मितीसाठी सूक्ष्मजीवांचा वापर करण्याचेही त्यांनी मार्गदर्शन केले.

स्वच्छता मोहिमेअंतर्गत गांडूळ खत युनिट उभारणाऱ्या शेतकऱ्यांना विनामूल्य गांडूळ कल्चर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. कार्यशाळा दरम्यान शिंदी बुद्रुक, कासमपुर व परसापूर परिसरातील शेतकऱ्यांनी नदी-नाला खोलीकरण व बंधारे बांधकामामुळे भूगर्भातील जलपातळीत झालेली वाढ, शेती उत्पादनात झालेली सुधारणा आणि ग्रामीण जीवनात झालेला सकारात्मक बदल याविषयी अनुभव कथन केले. ही कार्यशाळा जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा प्रसार करण्यासाठी उपयुक्त ठरल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ च्या संदर्भात प्रा. डॉ. प्रशांत विघे यांची उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा

**अमरावती/ प्रतिनिधी :-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६ च्या पार्श्वभूमीवर शिक्षक, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक प्रश्नांना नव्याने राजकीय केंद्रस्थानी आणण्याच्या उद्देशाने प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी माजी मुख्यमंत्री तथा महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे नेते आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची मुंबई येथील 'मातोश्री' येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान शिक्षक मतदारसंघातील विविध ज्वलंत प्रश्नांवर महाविकास आघाडीचे घटक पक्ष यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२६, शिक्षकांच्या प्रलंबित समस्या, शिक्षण क्षेत्रातील बदलती परिस्थिती, जुनी पेन्शन योजना, उच्च शिक्षणातील वाढती आव्हाने, शिक्षक प्रतिनिधित्वाची गरज, संचमान्यता धोरणामुळे प्रभावित झालेली शिक्षण व्यवस्था तसेच मराठी शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न यावर गंभीर चर्चा झाली.



प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी शिक्षक मतदारसंघ हा केवळ निवडणुकीचा विषय नसून शिक्षण क्षेत्राच्या अस्मितेचा, शिक्षकांच्या न्यायहक्कांचा आणि समाजाच्या बौद्धिक नेतृत्वाचा महत्त्वपूर्ण मंच असल्याचे मत व्यक्त केले. शिक्षण क्षेत्रातील वाढते व्यापारीकरण, ग्रामीण भागातील शाळांची बिकट अवस्था, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवरील अन्याय, अनुदान आणि भरती प्रक्रियेतील विलंब तसेच नवीन शैक्षणिक धोरणांमुळे निर्माण झालेली असुरक्षितता याकडे त्यांनी विशेष लक्ष वेधले.

विशेषतः संचमान्यता प्रक्रियेतील बदलांमुळे अनेक शाळांचे अस्तित्व धोक्यात आले असून हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांवर परिणाम होत असल्याची गंभीर बाब चर्चेत मांडण्यात आली. ग्रामीण व निमशहरी भागातील कमी पटसंख्येच्या शाळांवर बंद होण्याचे संकट निर्माण झाले असून त्याचा थेट परिणाम गरीब, वंचित आणि मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

मराठी शाळा या महाराष्ट्राच्या भाषा, संस्कृती आणि सामाजिक समतेच्या जतनासाठी महत्त्वपूर्ण असल्याने त्या जिवंत राहणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. नवीन शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीत ग्रामीण वास्तव, डिजिटल दरी, शिक्षकांची कमतरता आणि आर्थिक विषमता या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात अभ्यासू, संघर्षशील आणि शिक्षक प्रश्नांशी बांधिलकी असलेले नेतृत्व उभे राहणे आवश्यक असून शिक्षक मतदारसंघाला पक्षीय राजकारणापेक्षा शिक्षण क्षेत्राच्या प्रश्नांचे प्रभावी व्यासपीठ बनविण्याची गरज असल्याचेही चर्चेत अधोरेखित करण्यात आले.

जुनी पेन्शन योजना, शिक्षक भरती, विनाअनुदानित संस्थांचे प्रश्न, उच्च शिक्षणातील रिक्त पदे, विद्यापीठीय प्रशासनातील पारदर्शकता आणि शिक्षक प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर पुढील काळात महाविकास आघाडीचे घटक पक्ष यांच्यासोबत व्यापक संघर्ष आणि सकारात्मक संवाद अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# उज्ज्वल निकम होणार बेवारस दिव्यांगांचे वकिल

## -मुंबईतील काष्ठशिल्प प्रदर्शनात दिली ग्वाही

**अचलपूर-** समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकल्या गेलेल्या दिव्यांग बेवारस मुलांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याला आता ज्येष्ठ विधिज्ञ व खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांची साथ लाभली आहे. यापुढे मी दिव्यांग बेवारस मुलांचा वकिल म्हणून काम करणार, अशी भावनिक आणि ठाम ग्वाही ॲड. निकम यांनी मुंबई येथे दिली. मुंबईतील पु. ल. देशपांडे कला अकादमी येथे वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग बेवारस बालगृहातील दिव्यांग मुलांनी स्वतःच्या हाताने साकारलेल्या अप्रतिम काष्ठशिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन ॲड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. शुक्रवारपासून सुरू झालेल्या या प्रदर्शनाने उपस्थितांच्या डोळ्यांत कौतुकासोबतच संवेदनांची ओल निर्माण केली.



यावेळी बोलताना ॲड. निकम म्हणाले की, पद्मश्री शंकरबाबा पापळकर हे दिव्यांग आणि बेवारस मुलांसाठी करीत असलेले कार्य हे केवळ सामाजिक नव्हे तर ईश्वरी कार्य आहे. या मुलांचे निरागस हास्य समाजाला माणुसकीची खरी दिशा दाखवणारे आहे. अशा मुलांना वयाच्या १८ वर्षांनंतरही बालगृहात राहण्याचा अधिकार मिळायला हवा. त्यासाठी स्वतंत्र कायदा व्हायला हवा आणि त्या लढ्यात मी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन. निकम यांच्या या विधानाने उपस्थितांमध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. दिव्यांग आणि बेवारस मुलांच्या प्रश्नांकडे शासन व समाजाने अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली. या कार्यक्रमाला मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अनिल देशमुख, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालिका मीनल जोगळेकर, जीएसटी खात्याचे कमिश्नर नितीन पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दिव्यांग मुलांच्या हातातील कला, त्यांच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास आणि समाजाकडून मिळालेला सन्मान पाहून उपस्थित अनेक जण भारावून गेले.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात ३० कोटींचे कर्जवाटप

**अमरावती :** सेंट्रल बँक इंडियाच्या वतीने एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रम शनिवार, दि.१६ मे रोजी परतवाडा येथील कंचन टॉवर आणि अमरावती येथील पुंडलिक लॉन येथे पार पडला. यात ३० कोटींचे कर्जवाटप करण्यात आले.

परतवाडा येथील कार्यक्रम ग्राहक उत्पादन वितरण असोसिएशनचे अध्यक्ष पंकज गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अमरावती येथील कार्यक्रमाला सीए असोसिएशनचे उपाध्यक्ष सीए संदीप सुराणा उपस्थित होते. दोन्ही कार्यक्रमाला सेंट्रल बँकेच्या हेड ऑफिसचे जनरल मॅनेजर प्रीति सारस्वत उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना सेंट्रल बँकेच्या कमी व्याज दरावर उपलब्ध असलेल्या कर्जाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

दोन्ही कॅम्पमध्ये ३० कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले. अमरावती क्षेत्रिय प्रमुख सुनील पाण्डेय यांनी प्रास्ताविकातून विविध योजनाची माहिती दिली. श्रीकांत पड़वाड़ यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी आभार मानले.

**नावात बदल**

मी **आयुष प्रमोद बडवईक** घोषणा करतो की, माझ्या वडीलांचे जुने नांव **प्रमोदराव** ऐवजी नवीन नांव **प्रमोद विश्वनाथ बडवईक** आहे.

**-- पत्ता -**
रंगारवासनी, पो.असदपूर
ता.अचलपूर, जि.अमरावती
मो.८७९९८२२३८१

# अंजनगाव सुर्जी येथे व्यापाऱ्याचे अपहरण करून खंडणीचा प्रयत्न

## तीन आरोपींवर गुन्हे दाखल

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधी-** अंजनगाव सुर्जी येथे खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील वादातून एका व्यापाऱ्याचे अपहरण करून त्याच्याकडून मोबाईल, रोख रक्कम व इतर वस्तू हिसकावून घेतल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध खंडणी, धमकी व मनुष्यवधाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी व्यापारी जकीउल्ला खाँ सकीउल्ला खाँ (वय ३५, रा. पथ्रोट, ता. अचलपूर) हे दि. १६ मे रोजी अंजनगाव सुर्जी येथील वृंदावन हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. त्याचवेळी एमएच ३० एमएफ ९०२४ व एमएच२७ बीझेड ४६०६ क्रमांकाच्या दोन चारचाकी वाहनातून आलेल्या आरोपींनी त्यांना अंजनगाव सुर्जी-पांढरी रस्त्यावरील महाराष्ट्र जिनिंगजवळ अडवले. आरोपी तौसिफ अहमद शेख हारुन (३५), मो. आशुर मो. अजीज (२९) व अन्सार अहमद शे. हारुन (२९), सर्व रा. पथ्रोट, ता. अचलपूर यांनी फिर्यादीच्या गाडीची चाबी काढून घेत त्यांना जबरदस्तीने आपल्या चारचाकी गाडीत बसवले. त्यानंतर त्यांचा मोबाईल हिसकावून परतवाडा मार्गे



धारणी रोडच्या दिशेने नेण्यात आले.गाडीत असताना आरोपी अन्सार अहमद याने हॉकीस्टीक व सुरीसारखे हत्यार दाखवून फिर्यादीकडे व्यवहारातील दोन लाख रुपयांची मागणी केली. 'तू पैसे देताच तुला सोडून देतो. पैसे न दिल्यास तुला जीवाने खतम करून टाकीन व तुझी बॉडी येथेच जाळून टाकू, कुणालाही पत्ता लागणार नाही,'अशी धमकी त्याने दिली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यावर आरोपींनी त्यांना धमकावून त्यांच्याकडील वस्तू जबरदस्तीने काढून घेतल्या.या प्रकरणी जकाउल्ला खाँ यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०८(४),१२७(२),३५१(२), ३(५) तसेच भा.न्या.सं. कलम ३८६, ३४२, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला.प्रकरणात ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. विनोद धाडसे व कर्मचारी अधिक तपास करीत आहेत.

# कौशल्या देवी जगन्नाथजी मालपाणी ट्रस्टद्वारे प्रा. गजानन कोरे यांचा सत्कार

**खल्लार/ प्रतिनिधी-** दर्यापूर तालुका व जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत स्थान मिळवून देत शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणारे प्राध्यापक गजानन कोरे यांचा कौशल्या देवी जगन्नाथजी मालपाणी ट्रस्टच्या वतीने सत्कार करण्यात आला.



शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. प्रा. गजानन कोरे यांनी आपल्या बहुजन राष्ट्र निर्माण करिअर अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे दर्जेदार मार्गदर्शन उपलब्ध करून दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक, लिपिक, शिक्षक तसेच विविध शासकीय विभागांमध्ये यश संपादन करत आपले स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही कोरे यांच्या विषयी विशेष विश्वास व आदराची भावना निर्माण झाली आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २४९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**जाहीरनामा/सायटेशन**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र. २९६/२०२६ ने.ता.११.०६.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती शारदा सुनिल जामठे
वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम
२. अनुसया पुंडलिकराव जामठे
वय ८३ वर्षे, धंदा - घरकाम
दोघेही रा.रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे.प्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ हिचा मुलगा **नामे सुनिल पुंडलिकराव जामठे** हे दि.**०३.०२.२०२२** रोजी रिध्दपूर, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २१.०४.२०२६

आदेशानुसार,
शिक्का
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

# फेक न्यूजच्या नरभक्षक टोळयांचा सोशल मीडियावर उच्छाद!

## एआयच्या आडून लोकशाहीवर डिजिटल हल्ला; मोदी-इंदिरा तुलना, फडणवीसांवरील बनावट कात्रणांनी गाठला विकृतपणाचा कळस

**वर्धा।रवींद्र लाखे**
सोशल मीडियावर सध्या सुरू असलेला 'फेक न्यूज'चा धुमाकूळ हा केवळ अफवांचा खेळ नसून लोकशाही, पत्रकारिता आणि जनतेच्या विश्वासावर चालवलेला सुनियोजित डिजिटल दहशतवाद असल्याची संतप्त भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या माध्यमातून बनावट वर्तमानपत्रांची कात्रणे तयार करून समाजात संभ्रम, द्वेष आणि राजकीय विष पसरवण्याचा उद्योग खुलेआम सुरू असताना शासन आणि सायबर यंत्रणा मात्र अजूनही झोपेत असल्याचा आरोप होत आहे.


एकाच वेळी ३५ पुरणपोळ्या खाऊन देवेंद्र फडणवीसांनी विश्वविक्रम केला!
११ वर्षीय देवेंद्र ने केली कमाल! तब्बल ३५ पुरणपोळ्या, किलोभर तूप खाऊन विश्वविक्रम केला !!
सोना मत खरीदिए
प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी की देशवासियों से अपील
Don't buy gold, Indira tells people; appeals for 'national discipline'
Foreign exchange position still critical: Govt.

काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी आर्थिक परिस्थिती लक्षात घेता नागरिकांना सोन्याच्या खरेदीबाबत संयम पाळण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर काही विकृत समाजकंटकांनी ६ जून १९६७ च्या एका जुन्या इंग्रजी वर्तमानपत्राचे बनावट कात्रण तयार करून माजी पंतप्रधान इंदिरा गांधीं यांनीही अशाच प्रकारचे आवाहन केल्याचा खोटारडा दावा सोशल मीडियावर पसरवला. उद्देश एकच मोदी आणि इंदिरा गांधी यांच्यात कृत्रिम समानता निर्माण करून जनतेच्या मनात संभ्रम पेरणे, या फेक मोहिमेचा विळखा इतक्यावरच थांबला नाही. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ११ वर्षांचे असताना ३५ पुरणपोळ्या खाऊन विश्वविक्रम' केल्याची हास्यास्पद आणि निर्लज्ज बनावट बातमी १५ जून १९८२ च्या एका सुप्रसिद्ध मराठी वर्तमानपत्राच्या नावाने व्हायरल करण्यात आली. जुन्या वर्तमानपत्राचा फॉन्ट, पिवळसर कागद, संपादकीय मांडणी आणि छपाईची शैली हुबेहुब उभी करून सामान्य जनतेला फसवण्याचा हा थरारक प्रकार उघड झाला आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अशा फेक बातम्या तयार करणाऱ्या टोळ्या दिवसाढवळ्या सक्रिय असून त्यांच्यावर कारवाई करण्याची हिंमत प्रशासन दाखवत नाही. 'सायबर सेल' नावापुरती उरली आहे का असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. कारण आज राजकीय व्यक्तींविषयी बनावट बातम्या तयार होत आहेत; उद्या एखाद्या धार्मिक दंगलीची खोटी बातमी, एखाद्या अधिकाऱ्याचा बनावट आदेश किंवा एखाद्या नेत्याचा खोटा व्हिडीओ व्हायरल झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार?

फेक न्यूजचा हा बाजार थांबवायचा असेल तर केवळ आवाहन करून चालणार नाही. अशा डिजिटल गुन्हेगारांवर देशद्रोहासारखे कठोर गुन्हे दाखल करून त्यांना थेट तुरुंगात डांबण्याची मागणी जोर धरू लागली आहे. सोशल मीडियाच्या आडून लोकशाहीला पोखरणाऱ्या या 'कीबोर्ड माफियांना' वेळीच आवर घातला नाही तर उद्या सत्य आणि असत्य यातील सीमारेषाच पुसली जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे. सरकारविरोधातील खरी माहितीही उद्या 'फेक' म्हणून दाबली जाईल का हा प्रश्न आता जनतेच्या मनात धगधगू लागला असून प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई न केल्यास जनक्षोभ उसळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# मराठीला डावलून इंग्रजीचे लाड कशासाठी

## वर्धा नगरपालिकेवर नगरसेवक यशवंत झाडे यांचा हल्लाबोल; मराठीत कामकाज करा, नाहीतर मराठी अंकलिपी भेट देऊ,

**वर्धा । जनमाध्यम**
नगर परिषद मध्ये आजही इंग्रजीचा अट्टाहास सुरू असल्याचा गंभीर आरोप करत प्रभाग क्र. १३ कृष्णनगर-पोद्दार बगीचा येथील नगरसेवक यशवंत झाडे यांनी प्रशासनावर जोरदार तोफ डागली आहे. राज्य शासनाने मराठी भाषा अनिवार्य केली असताना नगरपालिकेचे कोट्यवधींचे व्यवहार, कंत्राटे, वर्क ऑर्डर आणि टेंडर आजही इंग्रजीतच तयार होत असल्याने 'ही मराठीची गळचेपी नाही तर जनतेच्या अधिकारांवर घाला आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. इंग्रज गेले ७५ वर्षांपूर्वीष्ठ पण वर्धा नगरपालिकेच्या फाईलांतून अजूनही इंग्रजीचे भूत उतरायला तयार नाही, अशा शब्दांत झाडे यांनी प्रशासनावर हल्लाबोल केला. यापुढेही इंग्रजीचा वापर सुरू राहिला तर मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षांना 'मराठी अंकलिपी' भेट देण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.




नगरपालिकेतील कंत्राटी कामगार पुरवठा, घंटागाडी, ट्रॅक्टरद्वारे कचरा उचलणे, इसापूर कचरा डेपो प्रक्रिया, बांधकामांची वर्क ऑर्डर आणि कोट्यवधींची ?ग्रीमेंट्स इंग्रजीत तयार केली जात असल्याने सामान्य नागरिक तर दूरच, अनेक नगरसेवकांनाही त्याचा अर्थ समजत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे या करारांवर साक्षीदार म्हणून नगरसेवकांच्या सह्या घेतल्या जातात, मात्र त्यांना कराराची प्रतही दिली जात नसल्याची चर्चा रंगली आहे. कंत्राटदार स्वतःच्या बाजूने हुशार वकिलांकडून करार तयार करून आणतात आणि प्रशासन डोळेझाक करून सही करते. प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच इंग्रजी समजत नाही, मग नगरपालिकेचे हित कसे जपले जाणार असा प्रश्न झाडे यांनी उपस्थित केला. याच निष्काळजीपणामुळे कंत्राटदार कोर्टात जाऊन कोट्यवधींची बिले आणि व्याज वसूल करतात, परिणामी सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला राज्यभर न्यायालयीन निर्णय मराठीत दिले जात असताना वर्धा नगरपालिकेला मराठीचा एवढा बाऊ का असा प्रश्न आता शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. १२ मे २०२६ रोजी नगरसेवक झाडे यांनी लेखी निवेदन देत यापुढे सर्व टेंडर, करार, वर्क ऑर्डर आणि आदेश मराठीतच जारी करण्याची मागणी केली आहे. या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी आणि नगराध्यक्ष यांनाही देण्यात आल्या असून आता प्रशासन इंग्रजीचा मोह सोडणार की मराठी अंकलिपीची भेट स्वीकारणार, याकडे संपूर्ण वर्धेकरांचे लक्ष लागले आहे.

# तोंडाच्या कर्करोगावर 'पोटाच्या त्वचे'ची किमया

## वर्ध्यात प्रथमच अत्याधुनिक प्लास्टिक सर्जरी यशस्वी

**वर्धा जनमाध्यम-** आचार्य विनोबा भावे रुरल हॉस्पिटल अंतर्गत सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये तोंडाच्या कर्करोगावर पोटाच्या त्वचेचा वापर करून अत्याधुनिक प्लास्टिक सर्जरी यशस्वीरीत्या करण्यात आली. वर्धा आणि विदर्भातील ही पहिलीच अशी शस्त्रक्रिया ठरली आहे.

वर्धा जिल्ह्यातील आडेगाव येथील एका रुग्णावर ही दुर्मीळ शस्त्रक्रिया करण्यात आली. गालाच्या कर्करोगामुळे चेहऱ्याचा मोठा भाग बाधित झाल्याने कर्करोगग्रस्त त्वचा व आतील गाल काढावा लागला होता. त्यामुळे रुग्णाला खाणे, बोलणे आणि चेहऱ्याचा आकार टिकवणे कठीण झाले होते.

या दोषाच्या पुनर्निर्माणासाठी मायक्रोव्हॅस्क्युलर 'DIEP फ्लॅप' तंत्राचा वापर करण्यात आला. विशेष म्हणजे पाय किंवा मांडीऐवजी पोटाची त्वचा आणि चरबी तिच्या सूक्ष्म रक्तवाहिन्यांसह चेहऱ्यावर प्रत्यारोपित करण्यात आली. सूक्ष्मदर्शकाच्या सहाय्याने १ मिमीपेक्षा कमी आकाराच्या रक्तवाहिन्या जोडण्यात आल्या.



कर्करोगाची शस्त्रक्रिया डॉ. चेतन गुप्ता यांनी डॉ. नितीन भोला यांच्या मार्गदर्शनाखाली केली. पुनर्निर्माण शस्त्रक्रिया प्लास्टिक आणि मायक्रोव्हॅस्क्युलर सर्जरी विभागप्रमुख डॉ. फिरोज राजीव बोरले यांनी केली. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. अमोल सिंगम यांनी जबाबदारी सांभाळली.

डॉ. बोरले यांनी सांगितले की, आधुनिक प्लास्टिक सर्जरीमुळे रुग्णाला केवळ रूपच नव्हे तर खाणे, बोलणे आणि सामान्य जीवन जगण्याची क्षमता पुन्हा मिळू शकते. वर्ध्यात अशा सुविधा उपलब्ध झाल्याने विदर्भातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# दिव्यांगांना स्वावलंबनाचे पंख; नवक्षितिज ट्रस्टचा माणुसकीचा हात

## सहानुभूती नव्हे, संधी द्या; साहित्य वितरणातून उभा राहिला सामाजिक बांधिलकीचा आदर्श

**वर्धा जनमाध्यम :** समाजातील दिव्यांग बांधवांना केवळ सहानुभूतीची नव्हे, तर स्वाभिमानाने जगण्यासाठी आधार आणि संधीची गरज आहे. त्यांना स्वावलंबनाचे पंख देणे हेच खरे मानवी कर्तव्य असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल यांनी केले.

स्थानिक गजानन महाराज देवस्थान मंदिर सभागृहात नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई शाखा वर्धा यांच्या वतीने स्व. बिसन जानु कुमरे व स्व. मारग्या कुमरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिव्यांग व्यक्तींना व्हीलचेअर, वॉकर आणि वॉकिंग स्टिक यांसारख्या आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे



उद्घाटक म्हणून बोलताना मोहन अग्रवाल यांनी समाजाने दिव्यांगांकडे दयेने नव्हे, तर कुटुंबातील सदस्य म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित केली.

ही साधने केवळ वस्तू नाहीत, तर दिव्यांगांच्या आत्मविश्वासाचा आणि स्वातंत्र्याचा आधार आहेत. या मदतीमुळे ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होऊन आपली स्वप्ने पूर्ण करू शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष सुधिर पांगुळ होते. प्रमुख अतिथी म्हणून नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सुनील कुमरे, ज्येष्ठ समाजसेवक श्यामसुंदर राठी, विभागीय व्यवस्थापक राजेश बगाडे, ज्येष्ठ पत्रकार रविंद्र चांदेकर, पत्रकार प्रविण धोपटे, एनसीसी अधिकारी मोहन गुजरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. नगराध्यक्ष सुधिर पांगुळ यांनी आपल्या भाषणात समाजाने दिव्यांगांकडे केवळ सहानुभूतीने पाहून चालणार नाही, तर त्यांना सक्षम करण्यासाठी प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. समाजाने त्यांना स्वीकारले, तरच खरा बदल घडेल,असे ते म्हणाले. नवक्षितिज चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सुनील कुमरे यांनी शासन विविध योजनांमधून साहित्य उपलब्ध करून देत असले तरी समाजातील दानशूर व्यक्तींनीही पुढाकार घेऊन गरजूंना मदत करणे हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाची प्रस्तावना इमरान राही यांनी केली.

सूत्रसंचालन हरीष तांदळे यांनी तर आभार प्रदर्शन अमोल मानकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजेश धोपटे, नरेश कुमरे, दीपक अग्रवाल, साहिल वाघ, विक्रांत गव्हाने, मिहीर वाघ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शिवकालीन युद्धकलेतून स्वसंरक्षणाचा मंत्र'; वर्ध्यात शिबिराचा उत्साहात समारोप

**वर्धा जनमाध्यम :** आधुनिक जीवनशैलीमुळे मैदानी खेळ आणि पारंपरिक युद्धकला मागे पडत असताना वर्ध्यात भरविण्यात आलेल्या शिवकालीन युद्धकला व स्वसंरक्षण शिबिराने युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. मुलांनी अभ्यासासोबत रोज व्यायाम, शारीरिक ?क्टिव्हिटी आणि मैदानी खेळांना वेळ दिला पाहिजे. शरीर सक्षम असेल तरच समाज आणि परिसराचे संरक्षण करण्याची ताकद निर्माण होते, असे प्रतिपादन क्रीडा भारतीचे प्रांत सहामंत्री संजय खळतकर यांनी केले.

वर्धा जिल्हा क्रीडा भारतीच्या वतीने आर्वी मार्गावरील मुंडले परिसर येथे आयोजित शिवकालीन युद्धकला व स्वसंरक्षण शिबिराचा समारोप उत्साहात झाला. या कार्यक्रमात संजय खळतकर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी क्रीडा भारती विदर्भ



प्रांत प्राचीन युद्धकला प्रमुख हितेश डफ होते. व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष हरीश गांधी उपस्थित होते. घराघरात शिवराय' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची गरज आज आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी बल आणि बुद्धीच्या जोरावर स्वराज्य उभे केले.

त्यांचे विचार, शौर्य आणि शिस्त आपल्या जीवनात रुजविली पाहिजे, असे आवाहन हितेश डफ यांनी केले. शिबिरात शिकविण्यात आलेल्या युद्धकला आणि स्वसंरक्षणाच्या तंत्रांचा दररोज सराव करण्याचेही त्यांनी सांगितले.

# निलगिरी ट्रेकसाठी देवळीच्या दोन एनसीसी कॅडेट्सची निवड

**वर्धा जनमाध्यम :** देवळी येथील एस. एस. एन. जे. महाविद्यालयाच्या दोन एनसीसी कॅडेट्सची तामिळनाडूतील उटी येथे होणाऱ्या 'ऑल इंडिया निलगिरी ट्रेकिंग कॅम्प'साठी निवड झाली आहे. सार्जंट स्नेहा मडकाम आणि कॅडेट पूर्वा कापटे या १८ ते २५ मेदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील या कॅम्पमध्ये सहभागी होणार आहेत.





स्थानिक २१ महाराष्ट्र एनसीसी बटालियन अंतर्गत निवड झालेल्या या दोन्ही छात्र सैनिकांनी महाविद्यालयासह जिल्ह्याचे नाव उंचावले आहे. देशभरातील निवडक एनसीसी कॅडेट्स या कॅम्पमध्ये सहभागी होणार असून त्यांना निलगिरी पर्वतरांगांमध्ये ट्रेकिंगसह विविध साहसी प्राशिक्षण दिले जाणार आहे. कॅम्पदरम्यान रॉक क्लाइंबिंग, रॅपेलिंग, जंगल भ्रमंती, जंगल शोध मोहीम आणि रिव्हर क्रॉसिंग यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. कठीण परिस्थितीत नेतृत्वगुण, शिस्त आणि साहसाची जाणीव निर्माण करण्यासाठी या कॅम्पचे विशेष महत्त्व मानले जाते.स्नेहा मडकाम आणि पूर्वा कापटे यांनी आपल्या यशाचे श्रेय २१ महाराष्ट्र बटालियनचे एनसीसी कमांडंट कर्नल एस. के. सिंग, प्रशासकीय अधिकारी लेफ्टनंट कर्नल जीसांतो, प्राचार्या डॉ. सुनिता सोनारे आणि एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांना दिले आहे. महाविद्यालय परिसरात दोन्ही कॅडेट्सचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या निवडीबद्दल विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**हिंगणघाट :** जाम चौक परिसरात भरधाव मिनी ट्रॅव्हल्सच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. कपिल बंडुजी हिवरकर (वय ३६, रा. कोरेगाव, ता. राळेगाव, ह.मु. जाम) असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कपिल हिवरकर हे नागपूरकडून दुचाकीने जामकडे येत असताना मागून आलेल्या मिनी ट्रॅव्हल्सने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी संबंधित वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## क्षुल्लक कारणातून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**समुद्रपूर :** तालुक्यातील बोथली येथे किरकोळ कारणावरून व्यक्तीस मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. संदीप पुरुषोत्तम धुर्वे यांना गावातीलच पुरुषोत्तम धुर्वे व अक्षय कोडापे यांनी शिवीगाळ करत मारहाण केल्याची तक्रार आहे. या घटनेत संदीप धुर्वे किरकोळ जखमी झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पीडिताने गिरड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी दोघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. गावातील किरकोळ वादातून वाढणाऱ्या अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

## मोबाईल टॉवरमधील कार्ड चोरी

**वर्धा :** सावंगी (मेघे) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील येळाकेळी, सावंगी टी-पॉइंट, सिंदी (मेघे) व सालोड परिसरातील मोबाईल टॉवरमधून कार्ड चोरी झाल्याची घटना घडली. अज्ञात चोरट्याने महागड्या वाहनाने येत मोबाईल टॉवरमधील सुमारे पाच हजार रुपये किमतीचे कार्ड चोरून नेल्याची माहिती आहे.

# वर्धेत सावरकर विचारांचा तेजोमय दीप; स्मारक पाहून भारावल्या उषाताई चाटी

**वर्धा जनमाध्यम :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, त्याग आणि सामाजिक कार्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवणारे वर्धेतील सावरकर स्मारक हे केवळ एक वास्तू नसून राष्ट्रप्रेम जागवणारे प्रेरणास्थान असल्याची भावनिक प्रतिक्रिया नागपूर येथील आरोग्य मंदिर न्यासाच्या कार्यकारी पदाधिकारी श्रीमती उषाताई चाटी यांनी व्यक्त केली. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्ध स्मृतीदिन तसेच रत्नागिरीतील स्थानबद्धतेतून सावरकरांच्या मुक्तता दिनानिमित्त त्यांनी १० मे रोजी वर्ध्यातील सावरकर स्मारकाला भेट दिली. यावेळी त्यांनी स्मारकातील ऐतिहासिक चित्रफलक, सावरकरांच्या जीवनप्रवासाचे लेखी दस्तावेज आणि राष्ट्रभक्ती जागवणारे प्रसंग पाहून समाधान व्यक्त केले. आज राजकीय स्वार्थासाठी काही संस्था आणि मंडळी जाणीवपूर्वक सावरकरांची बदनामी करताना दिसतात. त्यांना 'माफीवीर', 'ब्रिटिशांचे हस्तक' अशा शब्दांत हिणवले जाते. मात्र वर्ध्यातील हे स्मारक पाहिल्यानंतर सावरकरांचे राष्ट्रकार्य, त्याग आणि सामाजिक योगदान किती व्यापक होते, याची जाणीव प्रत्येकाला होईल, असे ठाम मत




उषाताई चाटी यांनी व्यक्त केले. ९५ वर्षीय उषाताई पुढे म्हणाल्या, मी स्वतः सावरकरांना अनेकदा पाहिले आणि अनुभवले आहे. त्यांच्या विचारांची प्रखरता आणि राष्ट्रासाठीची तळमळ जवळून अनुभवली. वर्ध्यातील स्मारकात त्यांच्या जीवनातील प्रसंग अत्यंत प्रभावीपणे मांडले आहेत. हे स्मारक केवळ इतिहास सांगत नाही, तर पुढील पिढ्यांमध्ये राष्ट्रभक्ती आणि सामाजिक एकोपा निर्माण करण्याचे कार्य करते. गांधी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्ध्यात असे प्रेरणादायी सावरकर स्मारक उभे राहणे ही अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. भारतभरात इतक्या अभ्यासपूर्ण आणि बोधप्रद पद्धतीने उभारलेले सावरकर स्मारक कदाचित क्वचितच आढळेल, असेही त्या म्हणाल्या. या प्रसंगी नागपूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक समितीच्या सदस्या भारती दामले, निशिगंधा प्रकाशन संस्थेच्या संध्या लाखे यांची उपस्थिती होती. सावरकर समितीचे अध्यक्ष श्याम देशपांडे यांनी उषाताई चाटी यांचा सत्कार केला. कार्यक्रमाला साहित्य भारतीचे प्रांत पदाधिकारी तथा लाखे प्रकाशनचे संस्थापक चंद्रकांत लाखे, सावरकर स्मारक नागपूरचे कार्याध्यक्ष शिरीष दामले, निखिल दामले, प्रमोद रंगारी आदी मान्यवर उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १७०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ‘फार्मर्स कप गट शेती’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**आसेगाव पूर्णा-** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘फार्मर्स कप गट शेती’ उपक्रमांतर्गत सावळापूर पूर्णा येथे शेतकरी समूहांची स्थापना करण्यात आली. या उपक्रमाला गावातील महिला व पुरुष शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद देत सहभाग नोंदविला. यावेळी शेतकऱ्यांना गट शेतीचे महत्त्व, आधुनिक शेती पद्धती, पाणी व्यवस्थापन, मृदा संवर्धन तसेच सामूहिक शेतीमुळे होणारे आर्थिक फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कमी खर्चात अधिक उत्पादन, बाजारपेठ उपलब्धता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.महिला शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग ग्रामीण भागात सामूहिक शेतीला नवी दिशा देणारा ठरत असल्याचे चित्र दिसून आले. उपस्थित शेतकऱ्यांनी गावाच्या विकासासाठी गट शेतीच्या माध्यमातून एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास कृषी विभागाच्या वानखेडे, पाणी फाउंडेशनचे प्रतिनिधी, प्रगतशील शेतकरी मिलिंद जी. गोदे, ग्रामस्थ, महिला बचत गट सदस्य तसेच परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.



### पर्यावरणपूरक जीवनशैली ही काळाची गरज आहे -चारुदत्त चौधरी

**अमरावती-** आपल्या अर्थार्जनाचे क्षेत्र कुठलेही असो.आपली आर्थिक स्थिती कशीही असो. अचानक बदलणाऱ्या हवामानाचा विचार केला असता पुढच्या पिढीच्या दृष्टिकोनातून प्रत्येकानी आपली जीवनशैली पर्यावरण पूरकच ठेवायला हवी असे ठाम प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे विदर्भ प्रांत सचिव डॉ. चारुदत्त चौधरी यांनी केले. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कर्मभूमीत मोझरी या गावी आयोजित दहा दिवसीय सुसंस्कार शिबिरात ते आपले विचार शिबिरार्थीसमोर मांडत होते. याप्रसंगी ग्रामगीताचार्य मालतीताई गहुकार, योगतज्ञ अक्षय धानोरकर, देवराज शेलोतकर आदी मान्यवर उपस्थित होते. याठिकाणी तन्वी व आराध्या यांना वाढदिवसाच्या निमित्ताने भारतीय पद्धतीने ओवाळून त्यांना शुभेच्छा दिल्या गेल्यात. प्रास्ताविकात शिबिराचे मुख्य आयोजक ग्रामगीताचार्य रायजीप्रभू शेलोटकर यांनी माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अष्टमी शेलोटकर यांनी केले तर आभारप्रदर्शन ललिता शेलोटकर यांनी केले.



### मिलिंद वावूरवाघ यांना पीएचडी पदवी

**नांदगाव पेठ-**जि.प.प्राथमिक शाळा सावर्डी, पंचायत समिती अमरावती येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत असलेले शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व तथा प्रशिक बहुउद्देशीय संस्थेचे माजी अध्यक्ष मिलिंद वावूरवाघ यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने नुकतीच आचार्य (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली.

# अल्पदूष्टी दिव्यांग बांधवांवर सेंट्रल रेल्वे विभागाचा अन्याय

## दिव्यांगाची जिल्ह्यातील दोन्ही खासदारांना हाक

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी**

ज्या अल्पदृष्टी दिव्यांगाचे टक्केवारी ४० टक्केच्या वर आणि ९० पेक्षा कमी असेल अशा हजारो अल्पदूष्टी दिव्यांगांना रेल्वे तिकीट सवलती पासून सेंट्रल रेल्वे बोर्डाने वंचित ठेवले असून या दिव्यांग बांधवांवर रेल्वे विभागाचा फार मोठ्या प्रमाणात अन्याय होत असल्याची बाब अल्पदूष्टी दिव्यांगानी व्यक्त केली आहे.

याबाबत माहिती अशी की, दिव्यांगांना रेल्वे टीकीट मध्ये सवलत दिल्या जाते. अस्थि व्यंग असलेल्या दिव्यांगांना ४% जरी असले तरीसुद्धा भारत सरकारच्या रेल्वे बोर्डा कडून ७५ टक्के रेल्वे तिकीट मध्ये सवलत दिल्या जाते. परंतु डोळ्याने अल्पदृष्टी असलेल्या ४०% च्या वर असलेल्या आणि ९० टक्के पेक्षा कमी असलेल्या दिव्यांगांना भारत सरकारच्या रेल्वे बोर्डाकडून सवलत दिल्या जात नसल्याने हजारो गोरगरीब अल्पदूष्टी दिव्यांग रेल्वे तिकीट सवलती पासून वंचित असून अशा दिव्यांगांना रेल्वेमध्ये पूर्ण टिकीट काढावी लागते. हा फार



मोठा अन्याय भारत सरकारच्या रेल्वे विभागाकडून दिव्यांगावर केल्या जात आहे.दिव्यांग संघटना यांनी वारंवार भारत सरकारच्या रेल्वे विभागाकडे अल्पदृष्टी दिव्यांगांना रेल्वे तिकीट सवलती देण्याबाबत निवेदन दिली परंतु त्याचा उपयोग झाला नसल्याच्या तक्रारी दिव्यांगांच्या आहेत. रेल्वे कन्सेशन देण्यामध्ये भारत सरकारचे रेल्वे प्रशासन विनाकारण भेदभाव करीत असल्याचे आणि जाचक अडचणी निर्माण करीत असल्याचा आरोप दिव्यांगांमध्ये केल्या जात आहे. अल्पदृष्टी दिव्यांगांना सुद्धा रेल्वे तिकीट कन्सेशन मिळालेच पाहिजे दिव्यांगांचा तो अधिकार असल्याचे दिव्यांग बांधवांचे म्हणणे आहे.

### खासदारांनी सभागृहात प्रश्न उपस्थित करावा

अमरावती जिल्ह्यात दोन खासदार असून एक लोकसभेच्या तर दुसरे राज्यसभेचे खासदार आहेत.त्यामुळे त्यांनी अल्पदूष्टी दिव्यांगाप्रती संवेदनशीलता ठेवून दिव्यांगांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी रेल्वे टिकीट कन्सेशन (सवलत) मिळालेच पाहिजे याकरिता लोकसभा आणि राज्यसभा गृहामध्ये प्रश्न उपस्थित करून तसेच संबंधित रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन दिव्यांगांना न्याय मिळून द्यावा अशी दिव्यांगांची मागणी आहे.



### यशोमती ठाकुर यांच्या सत्कार

**अमरावती-**जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री तथा भारतीय काँग्रेस वर्किंग कमेटीच्या सदस्या काँग्रेस पक्षाच्या धगधगणारं नेत्तृत्व यशोमतीताई ठाकुर यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अभिनंदन पेंढारी मित्र मंडळाचे सदस्य अभिनंदन पेंढारी, पुरुषोत्तम मुंदडा, दिपक हुंडीकर, महेंद्र देशमुख, प्रा राधेश्याम यादव, नरेंद्र तायडे, अरुण बनारसे, सतीश देवरे यांनी यशोमतीताईचा मोत्याची माला, दुपट्टा, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करत ताईंना उदंड आयुष्याच्या अनंत कोटी शुभेच्छा दिल्या व सुदृढ आरोग्यासाठी आणि उज्वल यशासाठी मंगलकामना दिल्या.

## भूषण पाटणे यांनी मुलगीच्या वाढदिवसानिमित्त केले रक्तदान

**अमरावती -** वाढदिवस म्हटलं की केक, आनंद आणि उत्सव असे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. मात्र समाजाप्रती आपली जबाबदारी जपत अमरावती येथील भूषण अरविंदराव पाटणे यांनी आपल्या मुलगी आरोहीच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त पी.डी एम.सी येथे रक्तदान करून अनोखा आदर्श निर्माण केला आहे. त्या निमित्त पी.डी एम.सी अधिष्ठाता डॉ ए.टी. देशमुख साहेब, नगरसेविका प्रियंका भूषण पाटणे, अतुल तूपटकर उपस्थित होते.दरवर्षीप्रमाणे यंदाही त्यांनी मुलगी आरोहीच्या वाढदिवशी




रक्तदान केले. ‘माझी मुलगी मोठी होईपर्यंत तिच्या प्रत्येक वाढदिवशी मी रक्तदान करणार असून, ती सज्ञान झाल्यानंतर तिनेही आपल्या वाढदिवशी रक्तदान करावे,’ अशी भावना भूषण पाटणे यांनी व्यक्त केली.समाजात वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा संदेश त्यांच्या या उपक्रमातून दिला जात आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान मानले जाते आणि एका रक्तदानातून अनेकांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे पाटणे कुटुंबाच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तसेच आरोही ची आत्या प्रीती सावरकर आणि मामा निखिल खडेकर यांनी सुद्धा याप्रसंगी रक्तदान केले. अमरावती शहरांमध्ये वाढत्या उन्हामुळे रक्ताचा तुटवडा जिल्ह्यामध्ये निर्माण झाला आहे. करिता नागरिकांनी रक्तदान करून वाढदिवस साजरा करण्याची गरज आहे.‘वाढदिवस साजरा करताना समाजासाठीही काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाने जपली पाहिजे,’ असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## इंधन बचतीसाठी विद्यापीठात ‘नो व्हिकल डे’ व ऑनलाईन बैठक

**अमरावती -** देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ स्तरावर विविध उपाययोजना राबविण्यासंदर्भात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठात सहविचार सभा झाली.

यावेळी कुलगुरूंनी संबोधित करतांना सांगितले, देशाच्या विकास कार्यात आपले योगदान देण्यासाठी आणि समाजासमोर एक आदर्श निर्माण करण्यासाठी विद्यापीठ काही महत्वपूर्ण निर्णय घेत आहे. या निर्णयानुसार विद्यापीठ स्तरावर उपाययोजना करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. ऑनलाईन अध्यापन - विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांचे महिन्यातील सर्व शनिवारचे शैक्षणिक कामकाज ऑनलाई



पध्दतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला. नो व्हिकल डे - महिन्याच्या प्रत्येक शनिवारी विद्यापीठात नो व्हिकल डे पाळण्यात येईल. त्या ठिकाणी परिसरात कोणीही पेट्रोल किंवा डिझेलची वाहने आणणार नाहीत. केवळ सायकल व ई - बाईक आणू शकतील किंवा विद्यापीठात बस ने येता येईल.

यामधून दिव्यांग कर्मचारी यांना वगळण्यात आले आहे.ऑनलाईन बैठका - ऑनलाईन बैठकांसंदर्भात विद्यापीठाच्या विविध विभागांतर्गत होणा-या सर्व समित्या व उपसमित्यांच्या बैठका प्रत्यक्ष घेण्याऐवजी ऑनलाईन किंवा आभासी पध्दतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आलाकारपुलिंग व शेअरिंग - कारपुलिंग व शेअरिंग संदर्भात पुढील सहा महिन्यांसाठी एकाच भागातून येणारे सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी वाहनांचे शेअरिंग किंवा कारपुलिंग करण्याचा प्रयत्न करावा, असाही निर्णय या सभेत घेण्यात आला.

याबाबत विद्यापीठाच्या प्रशासन विभागाकडून तातडीने परिपत्रक काढून सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांना कळविण्यात येणार असून सर्वांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे, अशा सूचना याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दिल्यात.

यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. सहविचार सभेला विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी तसेच शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख व समन्वयक उपस्थित होते.

## नितीन गडकरी यांना ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी दिले निवेदन

**अमरावती-** केंद्रीय मंत्री परिवहन व सडक मार्ग नितीन गडकरी हे सोलापूर दौऱ्यावर विविध विकास कामाच्या उद्घाटन साठी आले असता सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी तातडीने शासन निर्णय काढावेत यासाठी शिफारस करावी बालाजी सरोवर येथे महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी निवेदन देऊन साकडे घातले.

राज्यातील ११९५५ ग्रंथालयात २०३३५ कर्मचारी काम करीत आहेत ग्रंथालयाचे ४०टकके अनुदान वाढ, दर्जा बदल व नवीन ग्रंथालय मान्यता यासाठी ११ डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात मोर्चा काढला होता त्यावेळेस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी शिष्टमंडळाला शब्द दिला की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक आहेत त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनात सर्व मागण्या बाबत निर्णय घेण्यात येतील असे आश्वासन दिले पण निर्णय घेतले गेले नाहीत असे बेडगे यांनी सांगितले.

## शंभूराजांच्या आदर्शांचे स्मरण करत समाजात एकता राष्ट्रभक्तीची भावना दृढ करा- आ.सुलभा खोडके

**अमरावती/का.प्र.**

स्वराज्याचे दुसरे छत्रपती, अपराजित योद्धा, स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा ३६९ वा जन्मोत्सवा निमित्य छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती व शोध प्रतिष्ठान अमरावतीच्या वतीने आयोजित मानवंदना कार्यक्रम व लोक गायक अवधूतजी गांधी यांच्या भक्ती शक्ती संगम सोहळ्याला अमरावतीकरांची हजारोंच्या संख्येने मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य संजय खोडके साहेब तसेच प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सुलभा संजय खोडके तसेच विशेष अतिथी अवधूत गांधी, तसेच शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष यश खोडके, स्मारक समितीचे अध्यक्ष संकेत महल्ले, सचिव आकाश हिवसे, निमंत्रक ऋतुराज राऊत तसेच मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना आ. सुलभा खोडके यांनी सांगितले कि, छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे गौरवशाली व्यक्तिमत्व




आहेत.

त्यांच्या अतुलनीय बलिदानामुळे स्वराज्य अधिक सक्षम झाले आणि त्यांच्या शौर्याने स्वराज्य रक्षणचा सर्वात मोठा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.त्यांच्या शौर्यगाथा आजही तरुण पिढीला प्रेरणा देणाऱ्या आहेत.छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाचे जतन, विचारांचे आणि आदर्शांचे स्मरण करत समाजात एकता, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची भावना दृढ करण्याचा सर्वांनी आजच्या प्रसंगी संकल्प करण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले. दरम्यान महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेता अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या रंगतदार कार्यक्रमातून मराठामोठ्या संस्कृतीचे दर्शन व वारकरी सेवेचा वारसा जपत शिवकालीन घटना व प्रसंगांना उजाळा मिळाला. अवधूत गांधी यांनी सादर केलेले ’देह विठ्ठल..’ तसेच ’पावनखिंड’ चित्रपटातील ’युगात मांडली’ तसेच ’शिवबा राजा’ सारख्या वीर रसात्मक गाण्यांच्या सादरीकरणामुळे या कार्यक्रमात चांगलीच बहर आली. कार्यक्रमाचे संचालन संदीप जुनघरे यांनी केले. या अभूतपूर्व संगीतमय संध्येला अमरावतीकर जनतेची हजारोंच्या संख्येने मोठी उपस्थित होती.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्वनिमित्य आयोजित मानवंदना व भक्ती-शक्ती संगम सोहळ्यांना उपस्थित सर्व मान्यवर अतिथी, शिव-शंभू प्रेमी तसेच अमरावतीकर जनतेचे शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांनी आभार व्यक्त केले.

## देवस्थानांच्या भूमीवर सरकारचा डोळा, मंदिरांच्या अस्तित्वावर संकट

**लेहेगाव/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला ‘देवस्थान इनाम जमीन उन्मूलन कायदा २०२६’ हा मसुदा सध्या राज्यभर चर्चेचा विषय ठरत आहे. या मसुद्यानुसार देवस्थानांच्या मालकीच्या हजारो एकर जमिनींवर कब्जा करून बसलेल्या धारकांना मालकी हक्क देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. शासनाचा दावा आहे की यामुळे जुने वाद मिटतील; परंतु अनेक हिंदुत्ववादी संघटना, मंदिर ट्रस्ट आणि धर्मप्रेमी नागरिक याला मंदिरांच्या अस्तित्वावर मोठा घाला मानत आहेत.

राष्ट्रीय संघटक मंदिर महासंघाचे सुनिल घनवट व मंदिर महासंघचे अनुप जयस्वल यांनी या संदर्भात तीव्र संताप व्यक्त करत सांगितले की, ‘मंदिरांच्या जमिनी या हिंदू समाजाच्या श्रद्धेचे आणि धर्मकार्याचे आधार आहेत. जर त्या खासगी मालकीत गेल्या, तर भविष्यात अनेक मंदिरे आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त



होतील.राज्यातील अनेक प्राचीन देवस्थाने शेकडो वर्षांपासून त्यांच्या इनाम जमिनीवर अवलंबून आहेत. या जमिनींमधून मिळणाऱ्या उत्पन्नावर पूजा-अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, गोशाळा आणि सामाजिक उपक्रम चालतात. आता जर सरकारने त्या जमिनी कायमस्वरूपी इतरांच्या नावे केल्या, तर मंदिरांकडे उत्पन्नाचे साधन उरणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे शासनाने या मसुद्यात काही अतिक्रमणधारकांनाही संरक्षण देण्याचा विचार मांडला आहे. यामुळे ‘जमीन बळकावणाऱ्यांनाच बक्षीस’ मिळणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.एका बाजूला सरकार मंदिर विकास, पर्यटन आणि धार्मिक वारसा जतन करण्याच्या घोषणा करत आहे; तर दुसऱ्या बाजूला मंदिरांच्या जमिनीच कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप होत आहे. अलीकडेच राज्य सरकारने काही मंदिर विकास प्रकल्पांना मंजुरी दिली असली, तरी देवस्थान जमिनींच्या प्रश्नामुळे भाविकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.हिंदू समाजाने आता जागृत होऊन या विषयावर आवाज उठवण्याची गरज आहे. कारण आज जमीन गेली तर उद्या मंदिरांचे स्वातंत्र्य आणि अस्तित्वही धोक्यात येऊ शकते. मंदिरांच्या संपत्तीवर शासनाचा वाढता हस्तक्षेप हा केवळ प्रशासकीय विषय नसून तो हिंदू समाजाच्या श्रद्धा आणि अधिकारांशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.सरकारने कोणताही निर्णय घेण्यापूर्वी मंदिर ट्रस्ट, धर्माचार्य, भाविक आणि हिंदू संघटनांशी सविस्तर चर्चा करावी, अशी मागणी पिंगाळादेवी संस्थानचे अध्यक्ष विनीत पाखोडे. सचिव आशिष मारुडकर केली आहे.



### आगीमुळे संत्रा व शेती उपयोगी साहित्य जळून खाक

**कुऱ्हा-**तिवसा तालुक्यातील मारडा येथील शेतकरी योगेश विठ्ठलराव जिरापूरे,श्रीकृष्ण नागोराव ढोक व किसना जानराव कपिले यांच्या शेतात अचानक आग लागली. वाऱ्याचा वेग जास्त असल्यामुळे आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले.त्यामुळे शेतकरी जिरापूरे २५ संत्र्याचे झाडे व पाईप तर ढोक यांचे १५ संत्र्याचे झाडे व २० पाईप आणि कपिले यांच्या शेतातील १५ संत्र्याचे झाडे व स्टार्टर आणि विहिरीतील मोटरचा केबल जळून खाक झाले.या घटनेची माहिती महसूल विभागाला देण्यात आली होती.यावेळी महसूल अधिकारी येऊन पाहाणी करून गेले.या घटनेमुळे परिसरातील शेतकरी हवालदिल झाले असून, प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### सोनाली पुसदकर (मोरे) यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार

## देशभरातील १०५ शिक्षकांचा गौरव

**अमरावती-** आंतर-विद्यापीठ शिक्षक शिक्षण केंद्र वाराणसी येथे नुकताच ‘राष्ट्रीय आदर्श शिक्षक सन्मान सोहळा २०२६’ अत्यंत भव्य आणि उत्साही वातावरणात घेण्यात आला.या विशेष सोहळ्याचे आयोजन डॉ. राधाकृष्णन शिक्षक स्व-सहाय्यता समूहाद्वार करण्यात आले होते. या सोहळयात हैदराबाद येथील हिंदी शिक्षिका सोनाली पुसदकर (मोरे) यांना सुध्दा पुरस्कार प्राप्त झाला आहे. सोनाली पुसदकर या यवतमाळ येथील सुधीर पुसदकर यांच्या स्नुषा आहेत तर छांगाणी नगर येथील बंडूपंत उपाख्य सत्यदेव मोरे यांच्या त्या कन्या आहेत.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून प्राध्यापक प्रेम नारायण सिंह हे होते. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजीव कुमार



सिंह ’नयन, सेंचालक भोला सिंह कोषाध्यक्ष प्रमोद पाल, व्यवस्थापक संतोष माने, प्राध्यापक धनंजय कुशवाहा, अनिता तोमर, सुमन यादव उपस्थित होते. यावेळी सिंह यांनी मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजीव कुमार सिंह ’नयन यांनी आपले विचार मांडले. या सोहळ्यात समूहाचे संस्थापक डॉ. अजित कुमार चौहान यांनी बोलताना सांगितले की, त्याचे उद्दिष्ट आणि शिक्षकांप्रति असलेले समर्पण सादर केले. त्यांच्या या प्रेरणादायी पंक्तींनी उपस्थित सर्वांची मने जिंकली. ’शिक्षक ही समाजाची सर्वात मोठी शक्ती असून त्यांच्या सन्मानामुळेच आपली शिक्षण व्यवस्था अधिक मजबूत होईल,’ असे ते म्हणाले. यावेळी देशातील जवळपास सर्वच राज्यांमधून निवड झालेल्या १०५ शिक्षकांना शिक्षण क्षेत्रातील त्यांचे उत्कृष्ट योगदान, समर्पित सेवेबद्दल सन्मानित करण्यात आले.


# दर्यापूरात भर दिवसा युवकाची निर्घृण हत्या

## दोन तासातच आरोपी जेरबंद -शहरात भितीचे वातावरण

**खल्लार/प्रतिनिधी :-** दर्यापूर शहरातील पोलीस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या आनंदनगर येथे भर दिवसा २१ वर्षीय युवकाकडून १९ वर्षीय युवकाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली.घडलेल्या निर्घृण हत्याकांडाने संपूर्ण शहर हादरून गेले आहे.

प्रजल देवानंद तायडे (वय १९) या युवकाची आरोपी कुणाल प्रविण गावंडे (वय २१)याने चाकूने भोसकून निर्घृण हत्या केली.ही धक्कादायक घटना आज (दि.१७) दुपारी एक वाजताच्या घडली . या घटनेमुळे शहरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार दोघा मित्रामध्ये वाद आणि गैरसमज निर्माण झाल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरोपीने प्रजल तायडे याच्यावर धारदार चाकूने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. अवघ्या १९ वर्षाच्या युवकाचा अशा क्रूर पद्धतीने जिव घेतल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपासाची चक्रे वेगाने फिरवली. विशेष म्हणजे पोलिसांनी अवघ्या दोन तासांच्या आत आरोपी कुणाल प्रविण गावंडे (वय २१) रा. आनंद नगर दर्यापूर याला अटक करून तत्परतेचे दर्शन घडविले. पोलिसांच्या या जलद कारवाईचे नागरिकांकडून स्वागत होत असले तरी शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दर्यापूरसारख्या शांत शहरात भर दिवसा युवकाची हत्या होणे ही अत्यंत चिंताजनक बाब मानली जात आहे. युवकांच्या हातात वाढती शस्त्रे, किरकोळ कारणांवरून होणारे जिवघेणे हल्ले आणि कायद्याची कमी होत चाललेली भिती यामुळे समाजात अस्वस्थता वाढत असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून ☞(पान २ वर)

# कत्तलीसाठी आणलेल्या ११ गोवंशांना जीवदान

## एक आरोपी अटकेत, दोन फरार; २ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती शहर गुन्हे शाखेने बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर मोठी कारवाई करत कत्तलीसाठी आणून गोठ्यात डांबून ठेवलेल्या ११ गोवंशांची सुटका केली. या प्रकरणी शुएब अहमद अब्दुल आहद याला अटक करण्यात आली असून अब्दुल अयाज अब्दुल रऊफ व रेहान खान हमीद खान हे दोघे आरोपी फरार झाले आहेत. जप्त करण्यात आलेल्या गोवंशांची किंमत अंदाजे २ लाख ६० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी अवैध धंदे, गुन्हेगार तपासणी तसेच बकरी ईद निमित्ताने होणाऱ्या अवैध गोवंश कत्तली रोखण्यासाठी विशेष मोहीम



राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. १६ मे रोजी बडनेरा परिसरात गस्त सुरू असताना गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, चंद्रानगर बैलबाजार मागील पटेल नगर परिसरातील एका टिनशेड गोठ्यात बकरी ईद निमित्त ☞(पान २ वर)

# पत्रकारांच्या व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागण्या प्राधान्याने सोडवू - आ. संजय खोडके

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघांचे आ. संजय खोडके यांना निवेदन

**अमरावती /प्रतिनिधी :-** प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक्स मिडीया क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकार, तसेच वृत्तपत्रे विक्रेता व संबंधित कर्मचाऱ्यांच्या कल्याण व सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून प्रभावी उपाययोजना व अंमलबजावणी होण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या न्याय-हिताच्या रास्त मागण्या प्राधान्याने



सोडविणार असल्याचा विश्वास महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य संजय खोडके यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ अमरावतीच्या शिष्टमंडळाने आज दिनांक १७ मे २०२६ रोजी आ.संजय खोडके यांची सदिच्छा भेट घेऊन पत्रकारांच्या व वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मागण्यासंदर्भात निवेदन सादर केले. अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार ☞(पान २ वर)

# आयआरबीची मनमानी; दगडी बॅरिकेटस लावून गावात जाणारा रस्ता केला बंद

## संतप्त नागरिकांची टोल नाक्यावर धडक; अखेर आयआरबी प्रशासन नमले

**नांदगाव पेठ / प्रतिनिधी-** आयआरबी कंपनीच्या मनमानी कारभाराविरोधात नांदगाव पेठ येथील नागरिकांचा संताप अखेर शनिवारी उफाळून आला. गावात जाणारा महत्त्वाचा रस्ता कोणतीही पूर्वसूचना न देता दगडी बॅरिकेट्स टाकून बंद करण्यात आल्याने संतप्त ग्रामस्थांनी थेट टोल नाक्यावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. गावकऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून अखेर आयआरबी प्रशासनाला माघार घ्यावी लागली आणि दुसऱ्याच दिवशी रात्री बंद केलेला रस्ता पुन्हा खुला करण्यात आला.

टोल नाक्याजवळून नाफडे पेट्रोल पंप च्या बाजूने नांदगाव पेठ गावात जाणारा हा महत्त्वाचा मार्ग असून गावातील मोठ्या प्रमाणावर नागरिक दररोज याच रस्त्याचा वापर करतात. मालवाहू वाहने, दुचाकी, चारचाकी तसेच



घरगुती वापराची वाहने याच मार्गाने ये-जा करतात. मात्र काही वाहने टोल टाळण्यासाठी या मार्गाचा वापर करतात, अशी माहिती आयआरबीकडून भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला देण्यात आली होती.या माहितीच्या आधारावर परवानगी घेत शुक्रवारी अचानक दगडी बॅरिकेट्स उभारून हा रस्ता पूर्णपणे बंद करण्यात आला. त्यामुळे☞(पान २ वर)

# नांदगाव पेठ पोलिसांची केबल चोरट्यावर कारवाई; ८ चोरीच्या घटना उघड

**अमरावती/प्रतिनिधी:** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या नवीन घरांच्या बांधकामावरील इलेक्ट्रिक केबल चोरीच्या मालिकेचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी एका आरोपीला अटक करत तब्बल आठ चोरीच्या घटनांची उकल केली आहे.


नांदगाव पेठ परिसरातील विनोद देशमुख, प्रविण राऊत आणि श्रीराम मुळे या तिघांनी त्यांच्या बांधकाम सुरू असलेल्या घरांवरील बोअरवेलसाठी वापरण्यात येणारे इलेक्ट्रिक केबल अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास चोरून नेल्याची तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या ☞(पान २ वर)



# चांदूर बाजारात एमडी ड्रग्जविरोधात कारवाई

### तीन आरोपी जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधी:** अमरावती ग्रामीण पोलिसांनी विशेष कोंबिंग ऑपरेशनदरम्यान चांदूर बाजार पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज बाळगणाऱ्या तीन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींकडून एमडी ड्रग्ज, मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण १ लाख १८ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशान्वये १६ मेच्या रात्रीपासून १७ मेच्या पहाटेपर्यंत अमरावती ग्रामीण जिल्ह्यात विशेष कोंबिंग ऑपरेशन व गस्त ☞(पान २ वर)

## अमरावतीत दोन ठिकाणी आगीच्या घटना

# बिझी लँडमध्ये पुठ्ठे जळाले, IAC कंपनीत ४ कोटींचे नुकसान

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरासह ग्रामीण भागात शुक्रवारी आणि शनिवारी लागोपाठ दोन आगीच्या घटनांनी खळबळ उडाली. शहरातील बिझी लँड परिसरात ट्रान्सफॉर्मरमुळे लागलेल्या आगीत पुठ्ठ्यांचे मोठे नुकसान झाले, तर भातकुली तालुक्यातील इंटरप्राईजेस कंपनीमध्ये लागलेल्या भीषण आगीत मशिनरीसह कोट्यवधींचे साहित्य जळून खाक झाले. दोन्ही घटनांमध्ये अग्निशमन दलाने वेळेत धाव घेत मोठी हानी टाळली असून सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

अमरावती शहरातील बिझी लँड, एल-६ परिसरात शनिवारी सकाळी ट्रान्सफॉर्मरमधून निघालेल्या स्पार्कमुळे पुठ्ठ्याच्या गठ्ठ्यांना आग लागली. अग्निशमन विभागाला सकाळी ११.२५ वाजता अब्दुल कासम अकबानी यांनी माहिती दिल्यानंतर फायर लॉरी तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आली.

वाहन चालक नितीन इंगोले तसेच फायरमन राजेश गजबे आणि रोशन ☞(पान २ वर)

# सातेगावात अवैध देशी दारूचा साठा जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## आरोपी जंगलात फरार; एक लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधी:** स्थानिक गुन्हे शाखेने अंजनगाव सुर्जी उपविभागातील सातेगाव परिसरात धडक कारवाई करत अवैध देशी दारूचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत ६७४ देशी दारू पाऊच, मोटरसायकलसह एकूण १ लाख ४४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून मुख्य आरोपी फरार झाला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यात अवैध ☞(पान २



# सर्वेक्षण केले तर मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचेच नाव समोर येईल

### - आमदार बच्चू कडू यांचा दावा

**अमरावती/प्रतिनिधी::** महाराष्ट्रात आजही सर्वेक्षण केले, तर मुख्यमंत्रीपदासाठी एकनाथ शिंदे यांचेच नाव समोर येईल, असा दावा शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषदेचे आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. सर्वसामान्य जनतेशी एकनाथ शिंदे यांची बांधिलकी असून उभ्या महाराष्ट्राला एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत, असे वाटते. ते मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी आम्ही थेट जनतेला साकडे घालू, असेही बच्चू कडू म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यावरून वाद उफाळून आला आहे.



प्रसारमाध्यमांशी बोलताना बच्चू कडू म्हणाले, एकनाथ शिंदे हे रात्री दोन वाजताही जनतेसाठी दार उघडतात. सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सुटावेत, अशी त्यांची भावना आहे. त्यांच्या ताकदीचा मुख्यमंत्री व्हावा, असे सर्वांनाच वाटते, केवळ माझ्या एकट्याचीच ही इच्छा नाही, तर सगळ्यांचेच मत आहे. तुम्ही जर आजही सर्वेक्षण केले, तर पुन्हा मुख्यमंत्री हे एकनाथ शिंदे हवेत, असेच लोक म्हणतील. त्यासाठी जनतेला आम्ही साकडे घालू.

शिवराय कुळकर्णी यांची टीका- भाजपचे प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी बच्चू कडू यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेत जोरदार टीका केली. कुळकर्णी म्हणाले, अचलपूर मतदारसंघातील लोकांनी बच्चू कडू नावाची नौटंकी हद्दपार केली. हा त्यांचा स्वत:चा मतदारसंघ होता. त्याची ☞(पान २ वर)

# मंत्री डॉ. अशोक उईके यांचा दौरा

अमरावती : आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके हे सोमवार, दि. १८ मे रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.



या दौऱ्यानुसार, डॉ. उईके यांचे सकाळी १०.३० वाजता धारणी येथील शासकीय विश्रामगृहात आगमन होईल, त्यानंतर बासपाणी रोडवरील बालाजी मंगलम येथे सकाळी ११ वाजता धारणी व मेळघाट परिसरातील कुपोषण, सिकलसेल, थॅलेसेमिया, आणि क्षयरोग यांसारख्या गंभीर आरोग्यविषयक समस्या आणि त्यांवरील उपाययोजनांचा आढावा घेतला जाईल. दुपारी १२.३० वाजता अपर ☞(पान २ वर)

# युवतीसेना उपजिल्हाप्रमुख तेजस्विनी वानखडे यांच्यासह शेकडो शिवसैनिक भाजपमध्ये

## आमदार राजेश वानखडे व आ. संजय कुटे यांच्या उपस्थितीत प्रवेश

**तिवसा/प्रतिनिधी-** तिवसा विधानसभा मतदारसंघातील राजकारणात महत्त्वाची घडामोड घडली असून आमदार राजेश वानखडे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत तिवसा शहरातील शिवसेनेच्या युवतीसेना उपजिल्हा प्रमुख तेजस्विनी दिनेशनाना वानखडे यांनी आपल्या शेकडो सहकारी व समर्थकांसह महाराष्ट्र प्रदेश भाजप सरचिटणीस तथा विदर्भ समन्वयक माजी मंत्री संजय कुटे, भाजप विदर्भ



संयोजक दिनेश सूर्यवंशी यांचे प्रमुख उपस्थिती मध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे तिवसा शहरातील भारतीय जनता पक्षाच्या समर्थनात मोठी वाढ होणार असून भाजपची संघटनात्मक☞(पान २ वर)

# पारा 46°C वर अमरावती सर्वाधिक उष्ण!

**अमरावती:** गेल्या काही दिवसांपासून अमरावतीचा पारा सातत्याने ४५ ते ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने शहरात तीव्र उष्णतेची लाट आली आहे. शनिवारी तर अमरावती देशातील सर्वात उष्ण शहर ठरले. या वाढत्या पाऱ्यामुळे दुपारी रस्ते आणि बाजारपेठांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस डिस्ट्रिक्ट गॅझेटियर्स' मधील १९०६ ते १९०८ या काळातील



ऐतिहासिक नोंदींनुसार, तेव्हा मे महिन्याचे सरासरी कमाल तापमान सुमारे ४१.७ ते ४२.३ अंश सेल्सिअस इतके होते. आजच्या काळात हाच पारा ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे, म्हणजेच ☞(पान २ वर)

# मालखेड रोडवर चांदूर रेल्वे पोलिसांची धडक कारवाई

## २१ किलो गांजासह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधी:** जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात चांदूर रेल्वे पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल २१.५४० किलो गांजा जप्त केला आहे. या कारवाईत गांजा, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, बडनेरा येथील ६३ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांकडून☞(पान २ वर)

